९८३४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८९२

# ...मी विवेकानंद

( ...न--रहस्य )

स्थळ प्रत
सं. निबंध
ठाणे



REFBK-0005243

लेखक

स्वामी गुणातीतानंद.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

# श्रीमत् स्वामी विवेकानंद

## ( जीवन-रहस्य )

लेखक

**स्वामी गुणातीतानंद**

श्रीरामकृष्ण मिशन, खार.

रा. क. ५२४३

शाखा

प्रस्तावना-लेखक,

**न्यायरत्न धुं. गो. विनोद, एम्. ए.**

REFBK-0005243

आक्टोबर १९३५ ] [ किंमत ४ आणे.

प्रकाशक

शा. मु. कोवारकर
सि. चिं. ब्रह्मे
चिटणीस
नरेंद्र-ग्रंथ-संग्रह
राधानिवास
डॉ. भवानीशंकर रोड, दादर.
मुंबई.

सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन

मुद्रक
नरहरि माधवराव यंदे
इंदुप्रकाश छापखाना, नं. ३८०, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

# श्रीमत् स्वामी विवेकानंद.

ब्रम्हविदू ब्रह्मैव भवति । ब्रम्हज्ञानी ब्रम्हच होतो. या श्रुतिसिद्धांताप्रमाणें ब्रम्हज्ञानप्राप्तीनंतर ब्रम्ह होऊनही प्रारब्धवशात् व्यवहार लोकसंग्रहादि करणारा लोकोत्तर महात्मा भगवद्गीतेच्या "आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः । आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥" या श्लोकोक्तीप्रमाणें आश्चर्यवत् होईल तर त्यांत आश्चर्य काय ? उपनिषत्कालापासून उद्दालक श्वेतकेतु, यमधर्म-नचिकेत, जनक-शुक, वसिष्ठ-राम, अवधूत-यदु, संदीपनी-कृष्ण, कृष्ण-उद्धव, कृष्णार्जुन, अशा नरनारायणांच्या, गुरुशिष्यांच्या जोड्या या भारतराष्ट्रांत या शतकांत श्रीरामकृष्ण-विवेकानंदापर्यंत अवतरल्या. यायोगें या सुवर्णभूमीचे आध्यात्मिक भाग्य अखंड राखलें गेलें. एखाद्या गरीब शेतकऱ्यास आपलें शेत नांगरीत असतांना एक सोन्याचें कुलुप असलेली पेटी शेतांत मिळाली व ती उघडून पहातांच आज इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, इटली इत्यादि पाश्चात्य राष्ट्रांतहि दुर्लभ अशा अत्यंत मूल्यवान खऱ्या जवाहिरांनें भरलेली दिसावी म्हणजे त्या शेतकऱ्याच्या आनंदास जसा पारावर रहात नाहीं तसाच खऱ्या धर्माची चाड असणाऱ्या तरुणांना गेल्या व चालू शतकांत होऊन गेलेल्या थोर, विभूतिमान पुरुषांचाच शोध घेतां घेतां शेवटीं श्रीमत्स्वामी विवेकानंदाच्या चरित्रात आपल्या उच्च आकांक्षा पूर्ण झाल्याचें दिसून आल्यानें त्यांच्या आनंदास पारावर नाहींसा झाल्यास नवल काय ? तिशी उलटण्याच्या आत ज्यानें आपली अलौकिक कीर्तिदुंदुभि त्रिखंडांत दणाणून सोडली, आपल्या त्यागपावित्र्यपूर्ण चरित्रानें ओजस्वी दैवीवाणीनें व सर्वव्यापी प्रेमानें आपल्या देशांतल्या, आपल्या राष्ट्रांतल्या नव्हे परराष्ट्रांच्या स्त्रीपुरुषांची देखील मनें आपल्याकडे कौतुकानें आकर्षित करून घेतलीं अशा असामान्य महापुरुष-श्रीमत्स्वामी विवेकानंदाच्या चरित्राविषयीं दादर येथील त्यांच्याच स्मरणार्थ त्यांच्या 'नरेंद्र' नावानें विभूषित झालेल्या 'नरेंद्र ग्रंथ संग्रहालयाच्या' चालकाच्या विनंतीवरून हे चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

श्रीरामकृष्णाश्रम
खार

स्वामी गुणातीतानंद

# GOLDEN WORDS

I want each one of My children to be a hundred times greater than what I could ever be.

Every one of you Must Be A Giant Must that is my word.

(I) Obedience, Readiness and Love for the Cause If you have these three, Nothing can hold you back.

If you are really My children, you will fear nothing, Stop at nothing you will be like Lions.

We must rouse India and the whole world.

Swami Vivekanand.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# दोन शब्द

' स्वामी विवेकानंद जीवनरहस्य ' हा छोटासा प्रबंध ' नरेंद्र ग्रंथ संग्रह' ह्या संस्थेमार्फत प्रसिद्ध होत आहे हें पाहून आम्हांला आनंद होत आहे. संस्थेनें प्रचारकार्यास मार्च १९३० मध्यें सुरवात केली. वाङ्मयाचा प्रचार करणें हेंच ध्येय दृष्टीपुढें असल्याकारणानें संस्थेनें प्रथम ग्रंथ संग्रहालय स्थापन करून त्याद्वारें प्रचार कार्यास सुरवात केली. संस्थेतर्फे दर रविवारीं ज्ञानेश्वरीवर प्रवचनें होत असतात. ही प्रवचनमाला गेलीं ५ वर्षें अविरतपणें चालू आहे. संस्थेतर्फे गीता-जयंत्युत्सव, स्वामी विवेकानंद जन्मदिन इत्यादि उत्सव व तशींच महाराष्ट्रांतील विद्वानांकडून व्याख्यानें करविली जातात. संस्थेचीं सर्व कार्यें विनामूल्य करणें हेंच साधन संस्थेनें अंगिकारलें आहे व त्यामुळें कोणावरही वर्गणीचा बोजा पडत नाहीं. संस्थेच्या सर्व कार्यांना विद्वानांचा आशीर्वाद व जनतेची प्रत्यक्ष सहानुभूति अवश्य असते व ती उत्तरोत्तर मिळत आहे ही भाग्याची गोष्ट आहे. श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, न्यायरत्न विनोद, भारताचार्य वैद्य, ह. भ. प. पांगारकर, स्वामी विश्वानंद, सॉ.बाळासाहेब खेर, सॉ. जीनवाला, बॅ. जमनादास मेहता ॲ. माणिकराम तळपदे, डॉ. सावरकर इत्यादि थोर विद्वानांनीं संस्थेच्या कार्यास शुभाशीर्वाद दिले आहेत. त्यांच्याच आशीर्वादानें संस्थेनें हें प्रकाशनकार्य हातीं घेतले व त्या कार्याचें दृश्यफल म्हणजे 'स्वामी विवेकानंद जीवनरहस्य' ह्या छोटेखानी ग्रंथाचें प्रकाशन हें होय. ह्या ग्रंथाचें जनकत्व श्रीरामकृष्णमिशन खार, येथील स्वामी गुणातीतानंद ह्यांच्याकडे आहे. स्वामी गुणातीतानंद हे श्रीभगवान् रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद ह्यांच्या शिकवणींत नुसतें अवगाहन करुन थांबले नाहींत तर त्यांनीं ती पूर्ण आत्मसात् करुन प्रत्यक्ष प्रचार कार्याला सुरवात केली आहे. आपल्या विद्वत्तेनें व गोड वाणीनें स्वामी गुणातीतानंदांनी श्रीरामकृष्ण विवेकानंदांचा दिव्य संदेश महाराष्ट्रांतील कोनाकोपऱ्यापर्यंत पोंहचविण्यास सुरवात केली आहे. स्वामीजींचा व संस्थेचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. संस्थेच्या सुरवातीपासून संस्थेला त्यांची मदत असते व त्यांच्याच स्फूर्तीनें व प्रेरणेनें हें प्रकाशनकार्य घडत आहे. अध्ययन, अध्यापन

व तशीच आश्रमांतील कार्यें असतांनाहीं केवळ संस्थेवरील प्रेमामुळेंच त्यांनीं हा प्रबंध लिहून दिला. प्रबंधाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत स्वामी विवेकानंदाचें चरित्र व दुसऱ्या भागांत शिक्षणकीचें रहस्य आहे, रहस्यावरील कांहीं लेख 'रामकृष्ण निकेतन' मध्यें छापिले गेले होते ते सर्व एकत्रित आणले आहेत. स्वामी गुणातीतानंद व इतर मंडळींचा संस्थेवर अत्यंत लोभ आहे तसाच तो कायम टिको हीच इच्छा आहे.

संस्थेच्या ध्येयाविषयीं व कार्याविषयीं एका अत्यंत थोर व सन्मान्य व्यक्तीनें विषश आपुलकी दाखविली व ती व्यक्ति म्हणजे न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद ही होय. प्रो. विनोदांची कोठल्याहि अडचणीच्या वेळीं मदत नाहीं असें झालेंच नाहीं. त्यांची विद्वत्ता आणि त्यांचा गाढ व्यासंग महाराष्ट्राला अवगत आहेतच. प्रो. विनोदांनीं अनेक अडचणी सोसून व महत्वाचीं कार्यें दूर करून, प्रबंधाला विद्वत्तापूर्ण प्रस्तावना देऊन संस्थेला कायमचे ऋणी करून ठेविलें आहे. त्यांची संस्थेस अशीच मदत मिळत जाईल व त्यामुळें संस्था जास्त कार्यप्रवण होईल अशी इच्छा प्रदर्शित करणें हेंच इष्ट होय. ग्रंथ परिपूर्णतेकरतां कर्नाटक प्रिंटिंग प्रेसमधून प्रकाशित झालेल्या विवेकानंदवाङ्मयांतून कांहीं उतारे घ्यावे लागले आहेत. त्याबद्दल कर्नाटक प्रिंटिंग प्रेसचे मालक रा. मंगेशराव कुळकर्णी ह्यांची संस्था आभारी आहे.

जेथें हा ग्रंथ छापला गेला त्या छापखान्याचे मालक, रा. दा. सा. यंदे यांनीं प्रकाशनाचें कार्य हौसेनें अंगावर घेतलें व ज्ञानमंदिराचा व इतर कार्यांचा प्रचंड व्याप भोंवतीं असूनसुद्धां संस्थेवरील प्रेमामुळेंच अत्यंत कळकळीनें व सुबक काम करून दिलें याबद्दल संस्था त्यांची अत्यंत आभारी आहे.

शेवटीं संस्थेच्या आश्रयदात्यांना व संस्थेवर निरतिशय प्रेम करणारांना नम्र विनंति आहे कीं संस्था कार्यक्षम होण्यास आपल्या सहानुभूतीची अत्यंत आवश्यकता आहे व ती आपणांकडून खात्रीनें मिळेल येवढी सदिच्छा प्रदर्शित करून आपल्या चरणीं ही आभारमाला समर्पण करतों.

आपले नम्र.

शा. मु. कोवारकर
सि. चिं. ब्रह्मे.
चिटणीस.

मरेंद्र ग्रंथ संग्रह
राधानिवास
दादर, मुंबई.

# प्रस्तावना.

'विवेकानंद' या शब्दसमुच्चयाचे घटक विवेक व आनंद हे अन्योन्य-विरोधक आहेत. 'सर्वमेव दुःखं विवेकिनः' हें भगवान् पतंजलींचें सूत्र लक्षांत घेतलें कीं विवेक व आनंद यांचें साहचर्य सामान्यतः कसें असंभवनीय आहे हें स्पष्ट होईल. लोकोत्तर पुरुषांचें वैशिष्ट्य हेंच कीं त्यांच्या ठिकाणीं सर्व विरोधांचा समन्वय झालेला असतो--असंभाव्य घटनांना मूर्तस्वरूप मिळालेलें असतें! स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तित्वामध्यें पूर्व-पश्चिम, अभ्युदय निःश्रेयस, ज्ञान-भक्ति, कर्म संन्यास, काव्य-तर्क, अनुराग विराग, विवेक-आनंद अशा अनेक निसर्गतः भिन्नास्पद असणाऱ्या द्वंद्वांचा अधिवास होता.

विवेकानंद स्वामींच्या, क्षितिजासारख्या संग्राहक तत्वदर्शीमध्यें पूर्व आणि पश्चिम यांचा सांस्कृतिक संयोगसिद्ध झाला होता. पूर्वेची आध्यात्मिक तेजस्विता व पश्चिमेची 'कर्मसु' कुशलता ह्यांचा समन्वय हेंच मानवतेच्या भवितव्याचें परम मंगल व इष्टतम स्वरूप होय; एतदर्थ स्वामिजीनी पाश्चात्यांना अंतर्मुख होण्याचा उपदेश सांगितला आणि भारतीयांना आधिभौतिक कर्मकौशल्याचा आदेश दिला. हिंदुस्थानांतील तरुणांना स्वामीजींची 'बलमुपास्व' ही मुख्य शिक्षा होती. पाश्चात्य राष्ट्रांना निःश्रेयसात्मक कर्मयोग सद्यःकाळीं उपकारक आहे पण शतकानुशतकें दास्यनिरयांत पडलेल्या भारतवर्षाला अभ्युदयात्मक कर्मयोग हाच एक तरुणोपाय आहे, असा स्वामीजींचा विश्वास होता.

हिंदुसमाजाची पुनर्घटना, पाश्चात्यांची सामाजिक परिस्थिती आदर्शभूत सम-जून करितां येण्याजोगी नाहीं. हिंदुसंस्कृतीचे स्वभाव विशेष प्रखर व दृढमूल आहेत. हिंदुसमाजाच्या अन्तःप्रेरणेनें स्वभावतः होणारें विकसन हेंच शेवटीं उपकारक ठरेल असें स्वामीजींचें मत होतें. ते म्हणत कीं आर्यावर्तांत जन्मलेले सर्व धर्मसंस्थापक समाजसुधारकही होते. शंकराचार्य, रामानुज, नानक, चैतन्य, कबीर यांचें धर्मकारण हें स्वरूपतः समाजकारण होतें. त्यांना आर्यसंस्कृतीचें हृद्गत

यथार्थपणें समजलें होतें व म्हणूनच त्यांचें समाजकारण भारतीय समाजाला पथ्यकर ठरलें. मिल्ल व स्पेन्सर यांच्या वाचनानें हिंदुजनतेस समाजसुधारणेचें बाळकडू मिळालें असें नव्हे. भारतीय इतिहासांत सामाजिक व राजकीय अनवस्थेचें व अत्याचाराचें विध्वंसन करणारे तेजस्वी क्रांतिकारक होऊन गेले आहेत. समाजसुधारकांना स्वामीजींचें हें सांगणें असें कीं आपल्या मायसंस्कृतीशीं भिन्न असणाऱ्या पाश्चात्य ध्येयनीं हिंदुसमाजाची दिशाभूल करूं नका— याचा अर्थ असा नव्हे कीं स्वामीजींना हिंदुलोकांच्या कूपमंडूक वृत्तीचा पुरस्कार करावयाचा होता; जीर्ण रूढींच्या दडपणानें जीवनांतील उत्कट मनोवृत्तींना निर्जीव करूं नका असें ते " ऊर्ध्व बाहुर्विरौम्यष " ह्या व्यास=वृत्तीनें हिंदुसमाजाला सांगत होते.

जीवन्मुक्ताच्या भूमिकेवर आरूढ असतांना देखील स्वामीजींच्या देशभक्तीची उत्कंठा अणुमात्र कमी झाली नाहीं, ही विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. स्वामीजीनी स्वतःच्या सर्व शक्तींचा ज्या ध्येयस्थंडिलावर स्वाहाकार केला, ज्या आकांक्षेकरितां स्वामीजींनी त्रिखंड धुंडिलें, ज्या हेतूकरितां त्यानीं स्वतःच्या सर्वस्वाचें समर्पण केलें, ज्या मधुमधुर आशेच्या कवडाशावरोबर त्यांची चित्तदृष्टि सदैव नर्तन करीत होती, भावी यशस्वितेच्या रजतरसांत न्हालेल्या ज्या तेजोगर्भ स्वप्नानें त्यांना वेडेपिसें केलें होतें —तें स्वप्न, तो हेतू, ती आकांक्षा, तें ध्येय, म्हणजे भारतीय पराविद्येचा अखिल मानवजातीकडून सादर स्वीकार व्हावा हें होयः——

" Once more the world must be conquered by India — This is the dream of my life. I am anxiously waiting for the day when mighty minds will be ready to go forth from India to the ends of the world, will teach spirituality and renunciation—those ideas which come from the forests of India will belong to Indian soil alone !! Up, India and conquer the world with your spirituality. "

महापुरुष हे नवयुगाचे निर्माते होत. त्यांना भौगोलिक व सामाजिक परिस्थितीचें फलित समजणें ही बहिर्मुखदृष्टि आहे. बाह्य परिस्थितीनें अन्तःसृष्टि निर्णीत होते हें सामान्य व्यक्तींच्या बाबतींत कांहीं अंशीं खरें आहे. पण लोकविलक्षण विभूतींचें चारित्र्य समाजशास्त्रांच्या जड नियमांनीं निश्चित न होतां एखाद्या दिव्य व प्रभातरल ज्योतीप्रमाणें केवळ स्वयंप्रेरणेनेंच तें सिद्ध व परिणत होतें. सर्वसामान्य लोकांच्या जीविताचें नियमन ज्या तत्वांनीं होतें त्या तत्वांना लोकोत्तर जीवनांचा स्वरूपाविष्कार होत नसतो.

ज्याच्या प्रज्ञाचक्षूला मानवी संस्कृतीच्या सोज्वल भवितव्याचा साक्षात्कार झालेला असतो, ज्याची प्रातिभा अतीत व वर्तमान कालाच्या मर्यादा मागें टाकून अनागत युगाचें चलच्चित्र स्थिरदृष्टीनें पाहूं शकते त्यांनाच अभिनव युगाचें प्रवर्तन शक्य असतें. भविष्यत्काल हा वर्तमानाचे निर्विशिष्ट रूपांतर नसून त्यामध्यें एकप्रकारचें आधिक्य व गुणवृद्धि असते, ह्यांचें कारण हें कीं लोकोत्तर विभूतीनीं आपल्या कर्तृत्वाच्या नवलाईची भर त्यांत घातलेली असते. स्वामी विवेकानंद हे अशाप्रकारचे लोकोत्तर महाभाग व नवयुगप्रवर्तक विभूति होते. त्यांच्या पवित्र नांवानें विभूषित झालेली ' नरेंद्र ग्रंथ संग्रह ' ही संस्था ' विवेकानंद जीवन रहस्य ' हा छोटासा ग्रंथ प्रसिद्ध करीत आहे. या प्रबंधाचें कर्तृत्व माझे स्नेही स्वामी गुणातीतानंद यांजकडे आहे.

स्वामीजींचें १४ भागांत प्रसिद्ध झालेलें भव्य व सर्वांगसुन्दर चरित्र उपलब्ध असतांना प्रस्तुत प्रकाशनाची इष्टता ही कीं स्वामी गुणातीतानंद यांनीं आपल्या निबंधांत स्वामीजींच्या जीवनाचें आन्तर रहस्य स्पष्ट केलें आहे. स्वामी गुणातीतानंद गेलीं पांच वर्षें नरेंद्र ग्रंथ संग्रहालयातर्फे दर रविवारी सकाळीं दादर येथील धुरु हॉलमध्यें ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत असतात. ते गेल्यावर्षी तीर्थाटणाकरितां बाहेरगांवीं गेले असतांना सुमारें दोन तीन महिने त्यांच्या व्यासपीठावरुन ज्ञानेश्वरींतील कांहीं प्रमेयांची चर्चा करण्याची मला संधि लाभली होती व तेव्हांपासून " नरेंद्र-ग्रंथ-संग्रहा "च्या, निस्वार्थी व उत्साही कार्यकर्त्यांचा परिचय झाला. रा. रा. शा. मु. कोवारकर व रा. रा. सि. चिं.

अशे ह्या दोघांनीं आपल्या सहायकांच्या मदतीनें "नरेंद्र-ग्रंथ-संग्रह" ही संस्था ता. ८ मार्च १९३० रोजीं स्थापन केली व तेव्हांपासून संस्थेमार्फत उपयुक्त लोककार्य घडत आहे. महाराष्ट्रांतील अनेक प्रथितयश विद्वानांच्या व पुढाऱ्यांच्या शिकवणींचा लाभ या संस्थेमुळें मुंबई व उपनगर येथील रहिवाशांस मिळत असतो. या संस्थेचें एक लहानसें ग्रंथालय आहे. ग्रंथालयाचा फायदा घेणारी बरीच मंडळी आहेत. संस्थेतर्फे गीताजयंती, विवेकानंदजयंती आणि इतर उत्सव साजरे केले जातात.

हिंदी भाषेचा प्रसार करण्याकरतां संस्थेनें प्रत्यक्ष कार्याला सुरवात केली आहे, व त्याकामीं संस्थेला यश मिळत आहे. संस्थेचें बाह्यस्वरूप व उपकरण-सामग्री अत्यंत मर्यादित आहे. पण प्रत्यक्ष जनताजागृतीचें कार्य खरोखर भव्य आहे. या संस्थेस सर्व प्रकारच्या सहाय्याची अपेक्षा आहे. महाराष्ट्रांतील संपन्न व विद्वान् सद्गृहस्थांनीं प्रस्तुत संस्थेच्या अवतारकार्यास शक्य त्या प्रकारें सहाय्य करावें अशी विनंति आहे. शेवटीं संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं निरपेक्ष बुद्धीनें सुरू केलेल्या या सेवासंस्थेची उत्तरोत्तर अधिकाधिक भरभराट होवो अशी त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

सूर्यमहाल<br>ठाकुरद्वार, मुंबई. } **धुंडिराज गोविंद विनोद**

स्थळ प्रत
क्र. ........ नं. ........
ता. ........

श्रीमत् स्वामी विवेकानंद



# श्रीमत् स्वामी विवेकानंद

## यांचें

## जीवन--चरित्र.

कलकत्ता शहरांतील शिमला नांवाच्या भागांतील सुप्रसिद्ध दत्त घराण्यांत या महा पुरुषानें जन्म घेतला. तीन पिढ्यापासून या घराण्यांत वकिलांचा धंदा चालत होता. यांच्या वडिलांचें नांव विश्वनाथ दत्त व आजोबाचें नांव दुर्गाचरण दत्त. दुर्गाचरण दत्तांनीं वकिलीच्या धंद्यांत उत्तम कीर्ति संपादन केली व ते आपल्या २५ व्या वर्षीच गृह, दारा, पुत्र, धन, मान इत्यादि मायिक, अनित्य पदार्थांचा त्याग करून संन्यासी बनले. याप्रमाणें वैराग्यवृत्ती स्वामीजींच्या घराण्यांत पहिल्यापासून होती. विश्वनाथ दत्तांनीं वकीलीच्या धंद्यांत बरेंच यश संपादन केलें, तरी त्यांचा उमद्या खर्चिक स्वभावामुळें व विशेषतः दया प्रेरित दातृत्वामुळें त्यांच्याकडून व्ययही फार होत असे.

लहान, सुंदर, गोंडस बालक दृष्टीस पडल्याबरोबर कांहीं वेळ कौतुक वाटतें व नंतर हे बालक कोणाचें असा साहजिक प्रश्न उद्भवतो. त्याचप्रमाणें जिच्या उदरीं स्वामी विवेकानंदासारखे महापुरुष आले ती जननी कोण, असा साहजिक प्रश्न उत्पन्न होतो. स्वामीजींच्या जननींचें नांव भुवनेश्वरी देवी. ही भोळ्या भावाची, सरळ अंतःकरणाची व करारी बाण्याची स्त्री होती. तिची प्रेमळ व दानशूर स्वभावाबद्दल ख्याती होती. गोरगरिबांवर दया करणें, मुक्त हस्तानें त्यांना सहाय्य करणें, ही तिची रोजची दिनचर्या होऊन बसली होती. जुन्या वळणाच्या साध्याभोळ्या भुवनेश्वरीमातेचे बरेच दिवस व्रतोपवासांत जात. घरची सर्व मंडळी, मुलें व मुली, नोकर-चाकर, सर्व जेवून तृप्त झाल्या-वांचून अन्नाचा घास न घेणारी अशी ती आदर्शभूत गृहिणी होती. रामायण, महाभारत हे ग्रंथ तिचे कंठस्थ होते. तिची स्मरणशक्ति आपल्या स्मरण-शक्तीहून कितीतरी तीक्ष्ण असल्याचें स्वामीजीच स्वतः मोठ्या डौलानें सांगत खऱ्या जातीच्या आर्य स्त्रीला, पुत्राला जन्म देऊन मातृपदावर आरुढ होण्याची

विलक्षण हौस असते. त्यांत तिला मोठें भूषण वाटतें. पुत्र मुखावलोकनावांचून गाडी-घोडे, नोकर-चाकर, धन-दौलत, सर्व कांहीं वैभव अळणी वाटूं लागतें. या स्वभावानुसार भुवनेश्वरी मातेला पुत्रमुखावलोकनाची तीव्र-उत्कंठा झाली. फल प्राप्तिवांचून जीव कंटाळवाणा वाटूं लागला. श्रद्धेनें तिनें नवस केले. काशीच्या वीरेश्वर शिवाला रोज धूपदीपादि पंचोपचार पूजा देण्याची व्यवस्था केली. रोज भक्तिभावानें प्रार्थना करण्यांस मात्र ती चुकत नसे. सरतेशेवटीं त्या साध्वीची श्रद्धा फळास आली; एका रात्रीं प्रत्यक्ष कैलासपति शिवराणा चंद्रमौळी तिच्या स्वप्नांत आले व तिला त्यांच्याकडून पुत्रवरदान मिळालें. दुसऱ्या दिवसापासून तिच्या अंतःकरणांत दिव्य आनंदाचा संचार होऊं लागला. त्याचें तेज तिच्या सर्व शरीरभर पसरून मुखकमळ उज्ज्वल दिसूं लागलें.

सन १८६३ सालीं पौष कृष्ण सप्तमीस संक्रमणाच्या दिवशीं प्रातःकाळीं जगांत धर्मविचाराचें संक्रमण घडवून आणणारा महात्मा जन्मास आला. वीरेश्वर शिवाच्या प्रसादानें त्याची प्राप्ति झाल्यामुळें भुवनेश्वरी मातेनें त्याचें नांव वीरेश्वर असें ठेवलें, व नामकरणप्रसंगीं नरेंद्र हें नांव त्याला देण्यांत आलें. मायेच्या गुणांत आपलें वीरत्व प्रगट करणारे नेपोलियन सारखे वीर या जगांत एकादे वेळी पुष्कळ मिळतील, पण मायेच्या पार होऊन मायेला कह्यांत ठेवणारे वीरेश्वर, स्वामीजींसारखे क्वचितच दिसून येतात. इंद्रियांची गुलामगिरी करीत, प्रजेच्या अन्नावर शरीर पुष्ट करून सिंहासन भूषित करणारे नरेंद्र अथवा चक्रवर्ति, जगाच्या इतिहासांत असंख्य आढळून येतील; पण ब्रह्मज्ञ होऊन नरांचा नारायण होण्याचा मार्ग दाखविणारा नरेंद्र स्वामीजीच म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

नरेंद्राच्या भावी कर्मयोगाला ज्याप्रमाणें प्राच्य व पाश्चात्य या दोन्ही संस्कृतींची संरक्षक शक्ति लाधली होती, त्याचप्रमाणें त्याच्या लहानपणांतल्या पुंडाईला दोन दाया ठेवाव्या लागल्या. वाढत्या वयाबरोबरच त्याचें शरीरसामर्थ्य, मनोविकास व बुद्धिवैभव हे एकाहून एक वाढत्या प्रमाणांत दिसून आलेले गुण त्याच्या समवयस्कांनांच नव्हे तर त्याच्याहून वयानें थोर असलेल्यांनाहीं झेपेनासें झालें. तसेंच लहानपणीं जरा कुठें रांगतां खेळतां येऊं लागल्याबरोबर

त्याच्या दोन्हीं बहिणींना त्याला संभाळतां नाकींनऊ आले. केव्हां केव्हां तर, क्रोधातिशयानें व हट्टानें नरेंद्र रडूं लागला व बालचेष्टांनीं सतावूं लागला ह्मणजे भुवनेश्वरी मातेला ब्रह्मांड आठवे. एके दिवशीं क्रोधानें लाल होऊन अनावर झालेल्या नरेंद्राला जबरीनें पाण्याखालीं बसवून ' शिव शिव ! हरहर ' असें ह्मणत थंड पाण्याची धार त्याच्या डोक्यावर धरतांच तो शांत झाला. त्या दिवसापासून माउलीला नरेंद्राला शांत करण्याचा अचूक उपाय मिळाला.

" मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात " अशी म्हण आहे. नरेंद्र खेळांत-देखील ' नरेंद्रच ' होता. इतर खेळगड्यापैकीं कोणी त्याचा प्रधान, कोणी कोतवाल, कोणी कैदी होई. असा मोठ्या थाटाचा खेळ नरेंद्र खेळे. न्यायासनावर बसून नरेंद्रानें निकाल द्यावा. नरेंद्र खेळतांना देखील इतका तन्मय व्हावयाचा कीं, त्याला आजूबाजूचेंच काय, परंतु स्वतःच्या शरीराचेंही भान राहत नसे. एके दिवशीं खेळतां खेळतां स्वारी दंग होऊन जिन्यावरून खालीं पडली व डोक्याला चांगलीच जखम होऊन बरेंच रक्त निघून गेलें; त्या व्रणाचा डाग शेवटपर्यंत राहिला. वयाच्या सहाव्या वर्षीं नरेंद्रास शाळेंत पाठविण्यांत आलें. पण तिकडे इतरांच्या सोबतीनें वाईट शब्द तो उच्चारूं लागला. हें विश्वनाथ दत्तांच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्याला शाळेंत पाठविण्याचें बंद केलें, व एका पंतोजीची घरीं नेमणूक केली. नरेंद्राची स्मरणशक्ति प्रथमपासूनच असामान्य होती व त्याबद्दल त्याच्या सर्व शिक्षकांना अचंबा वाटे. नंतर त्याला विद्यासागर महाशयांच्या मेट्रोपॉलिटन् विद्यालयांत शिकण्यास घातलें. लवकरच तो वर्गांत, शाळेंत, खेळांत, सर्वत्र आपल्या गुणांनीं चमकूं लागला; आणि वर्गांत, इतर विद्यार्थ्यांचा नेता बनला. त्याच्या सरळ, सदय व्यवहारामुळें सर्वांना तो मान्य व प्रिय वाटूं लागला. विनोदी स्वभावानें सर्वांचीं मनें त्याजकडे आकर्षिलीं जात.

अमरकोश, मुग्धबोधव्याकरण, कीर्तिवासी रामायण, हे सर्व ग्रंथ त्याचे लहानपणींच कंठस्थ होते. एके दिवशीं रामलीला पाहण्यास गेल्यावेळीं एका नटास त्यांतील कांहीं भाग सुचेना. तेव्हां लहानग्या नरेंद्रानें तो भाग भराभर म्हणून दाखवून सर्व जमलेल्या मंडळींनां आश्चर्यचकित करून सोडलें. लहान-पणापासून शारीरिक व्यायामाकडे त्याचें लक्ष असे. दांडपट्टा, मलखांब, कुस्ती, या सर्व मर्दानी खेळांत त्याचा नंबर पहिला असे. अनेक सामन्यांत या खेळांतले

आपलें प्रावीण्य त्यानें लोकांच्या निदर्शनास आणून दिलें होतें. अशा रीतीनें कसलेले पिळदार शरीर असल्यामुळें त्यांना इतका दांडगा विद्याव्यासंग, कठोर तपस्या, धर्मप्रचार इत्यादि कार्यें करितां आलीं.

आपल्या सोबत्याविषयीं प्रेम, समयसूचकता, साहस, धैर्य व करारीपणा, इत्यादि सद्गुण नरेंद्रांत लहानपणींच होते. त्याच्या खोडकर स्वभावामुळें आईनें त्याला घराच्या वरच्या मजल्यावरील खोलींत कुलूप अडकवून ठेवावें, आणि दारांत कोणी भिकारी भिक्षा मागण्याकरितां आला म्हणजे तेथूनच त्यानें आईच्या रेशमी लुगडीं व मौल्यवान जिनसा बिनचूक त्याच्या झोळींत टाकाव्या. घरच्या माणसांना तें समजून आल्यावर मोबदल्यांत बरीच रक्कम देऊन त्यांनीं त्या सोडवून आणाव्या. त्यांच्या अंगावर नवें धोतर, नवा अंगरखा घातला आणि एखादा गरीब भिकारी समोर आला कीं नरेंद्राचे अंतःकरण दयेनें उचंबळून येई व आपल्या जवळील सर्व कांहीं त्याला देऊन टाकी. एकदां सोबत्यासह नौकेंतून जातांना एका सोबत्याला ओकारी झाली व त्यामुळें ती होडी घाणेरडी झाली. नावाडी मुसलमान असल्या कारणानें त्यानें मुलांना दम भरला व होडी साफ करण्यांस सांगितलें. होडी साफ करण्याकरतां लागणारे पैसे दिले असतां-नाहीं तो त्यांना सोडीना. वेळेचें महत्व जाणून नरेंद्रानें त्याची दृष्टि चुकवून त्यानें होडींतून उडी मारली आणि पैलतीर गांठलें. तेथें हवा खात हिंडत असलेल्या दोघां यूरोपियनांबरोबर आपल्या अर्ध्यामुर्ध्या इंग्रजींत भाषण करून त्यांना परिस्थिती पटवून दिली. त्या गृहस्थांना त्याचें कौतुक वाटलें व त्यांनीं होडीवाल्याला दरडाविलें. अशा रीतीनें मुलांची सूटका झाली. लहानपणापासून नरेन्द्रनाथ ध्यानप्रिय होते. एक एक तास, दोन दोन तास डोळें मिटून ध्यानाला बसले म्हणजे काष्ठवत् स्थिर व्हावयाचे. आजूबाजूचेंच काय पण स्वतःच्या शरीरचेंही भान त्यांना रहावयाचें नाहीं.

स्वभावतःच हुषार असल्या कारणानें जरी दोन तीन वर्षें बाहेरगांवीं अभ्यासाशिवाय गेलीं होतीं, तरी नरेंद्र सोळाव्या वर्षीं प्रवेश परीक्षा पास झाला व त्यानें प्रेसिडेन्सी कॉलेजांत प्रवेश केला. तेथें एके दिवशीं कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सभेंत सुप्रसिद्ध वक्ते सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं

स्थळ प्रत
सं. निबंध... १५५३



नरेंद्रनाथानें इंग्रजींत भाषण केलें. सुरेंद्रनाथ त्याच्या वक्तृत्वानें मुग्ध झाले व त्यांनीं नरेंद्रनाथाची बरीच प्रशंसा केली.

नरेंद्राचा आवाज अति मधुर होता. तबला, मृदंग, सतार, इत्यादि वाद्यें वाजविण्यांत त्याचें चातुर्य दिसून येई. विश्वनाथ दत्तांनीं त्याला प्रिय असलेली गायन वादन कला शिकविण्यांस वस्ताद ठेविले होते. अर्थात गायन, वादन, अध्ययन, शास्त्रीय विषयावर संभाषण, अशा अत्यंत उपयुक्त विषयांत त्याचा काळ जाई. तो काळाचा अनर्थक अपव्यय करीत नसे. त्याला अनीतीची चीड असे, ह्मणून तो त्या वृत्तीच्या लोकांना काळा सारखा वाटे. भगवान् जसा दुष्टाना काळासारखा वाटतो, त्याचप्रमाणें ऐदी, दुराचरणी लोकांना नरेंद्र यमासारखा वाटे. तीक्ष्ण बुद्धि, सरळ व्यवहार, प्रेम व विनोदी स्वभाव, गोड आवाज व सुंदर रूप इत्यादि गुणांचा अपूर्व संयोग नरेंद्रांत झाल्यामुळें तो सर्वांना प्रिय वाटे.

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावा असें त्यानें ठरविलें म्हणजे तो विषय पूर्ण आपलासा केल्यावांचून त्याला चैन पडत नसे. पाश्चात्य दर्शनशास्त्रांचा अभ्यास करावा असे त्याला वाटलें कीं लगेच त्याविषयांवरचे मुख्य मुख्य ग्रंथ आणून त्यानें वाचून टाकावे. पाश्चात्य दर्शनाचे प्रोफेसर त्याच्याविषयी म्हणत कीं, इंग्लंड किंवा जर्मनी या देशांतही तत्वज्ञानाच्या विषयांत इतका तीक्ष्ण बुद्धीचा विद्यार्थि मिळणें असंभनीय !

त्या वेळीं इंग्रजी विद्येच्या पिशाचिकेनें तरुणांच्या डोक्यांत धर्माबद्दल भलत्याच कल्पना भरवून दिल्या होत्या. प्रचलित सनातन धर्म अत्यंत संकीर्ण स्वरूपाचा असून निरुपयोगी व अनर्थक आचारबाहुल्यानें दूषीत झाला आहे, अशा ठाम समजुतीनें राजा राममोहनरायानीं संस्थापित केलेला ब्राम्हधर्म महर्षि देवेंद्र नाथानीं पुष्ट केला. परंतु ब्रम्हानंद केशव चंद्रसेनांनीं त्याच्यांत आपल्या विशिष्ट मतांची भर टाकून त्याला किंचित् विकृत स्वरूप आणलें होतें. तरी केशव चंद्रसेनांच्या वक्तृत्वशक्तींत अशी कांहीं जादू भरली होती कीं, जशा पुंगीच्या मधुर नादानें जातीचे नागही वश होतात, तसे त्या काळचे तरुण केशव सेनांच्या वक्तृत्वाला भाळून गेले होते व आपले चरित्र नायकहि त्यांना भुलून ब्राम्ह बनले.

८३०२

त्या काळांत नरेंद्रनाथ रात्रीच्या रात्री ध्यानमग्न होऊन घालवी, तर केव्हां केव्हां आपल्या मधुर आवाजानें गाऊं लागला कीं श्रोत्यांचें देहभान हरण करीत असे; व स्वतः भावमग्न स्थितींत तन्मयतेनें आनंदांत रंगून जाई. त्याच्या घरीं येणाऱ्याजाणाऱ्यांची गर्दी असे म्हणून तेथून कांहीं अंतरावर असलेल्या एकांत जागेंत जाऊन तो ध्यानस्थ बसत असे.

सुरेंद्रनाथ मित्र नांवाच्या एका भक्तानें श्री रामकृष्ण परमहंसांना एकेदिवशीं आपल्या घरीं बोलावून आणलें होतें. परमहंसांना भजन ऐकण्याची फार आवड असे म्हणून आपल्या शेजारीच राहाणाऱ्या नरेंद्रनाथालाहि त्या दिवशीं गाण्याकरितां विनंति करून आणलें होतें. नरेंद्रनाथाची एक दोन गाणीं ऐकतांच परमहंसांना समाधि लागली.

नरेंद्रनाथाला पहातांच श्री रामकृष्ण परमहंसांना जणूं काय जुनी ओळख पटली. सुरेंद्रनाथ व त्यांचे दुसरे एक रामचंद्र दत्त नांवाचे भक्त तेथें होते. त्यांच्याकडून परमहंसांनीं नरेंद्रनाथाचा परिचय करून घेतला व त्याला एकेदिवशीं दक्षिणेश्वरीं येण्यास सांगून ते निघून गेले. कांहीं दिवसांनीं रामचंद्र दत्त नरेंद्रनाथाला घेऊन दक्षिणेश्वरीं गेलें. परमहंस नरेंद्राला पहातांच जणूं काय तो अति जुन्या ओळखीचा आहे अशा रीतीनें त्याच्याशी बोलूं लागले, व तो आज्ञा घेऊन जातांना मोठ्या सलगीनें त्याला पुन्हां येण्यास सांगितलें.

श्री रामकृष्णांत दिसून आलेल्या अपार ईश्वर भक्तीविषयीं नरेंद्राला राहून राहून मोठें आश्चर्य वाटे, त्यांचा बालकासारखा निष्पाप व सरळ व्यवहार पाहून तो स्तिमित होई. त्या दिवशीं रामकृष्णांनीं त्याला भजन करण्यास सांगितलें; भजन झाल्यावर "माझ्या मुला, इतक्या उशीरां का यावयाचें! यापूर्वीच कां आला नाहींस?" असे ते मोठ्या प्रेमानें म्हणाले. नंतर त्याला आपल्या खोलीच्या एका बाजूच्या ओटीवर घेऊन गेले व त्यांच्या डोळ्यांतून एकसारखे प्रेमाश्रु वाहूं लागले. अशा स्थितींत परमहंस त्याला म्हणाले, "तूं नारायणाचा अवतार असलेला नर नामक ऋषि आहेस. लोकांच्या उद्धाराकरितां या लोकीं आतां पुन्हा आला आहेस." नंतर रसगुल्ला, संदेश इत्यादि बंगाली मेवामिठाई त्याला परमहंस स्वतःच्या हातानें भरवूं लागले. हा सर्व प्रकार पाहून नरेंद्राला कांहींच

झाला. "देव देव करीत ह्या म्हाताऱ्यानें आपलें डोकें मात्र बिघडवून घेतलें आहे" असें नरेंद्राला वाटलें.

असें जरी वाटलें तरी नरेंद्राचें अंतःकरण पुन्हा पुन्हा त्या अद्भुत प्रेमी पुरुषास भेटण्याकरितां उत्सुक होई. त्याची इच्छा नसताही त्याचें शरीर तिकडे ओढलें जाई. कांहीं दिवसांनीं नरेंद्र दक्षिणेश्वरीं गेला असतां आतांपर्यंत भेट-लेल्या साधु महात्म्यांना जड वाटलेला त्याच्या मोठ्या आवडीचा प्रश्न त्यानें श्रीरामकृष्णांना केला. "ईश्वरावर आपला विश्वास आहे काय? असेल तर तो कां?" श्रीरामकृष्णांनाहीं आपल्या अनुभवाचा जशास तसा जबाब दिला. "होय मी तुला जसा प्रत्यक्षपणें पाहतो, त्याच्याहून किती तरी पटीनें अधिक प्रत्यक्षपणें मीं ईश्वराला पाहतो." श्रीरामकृष्णांच्या मोठेपणा नरेंद्राच्या आज अनुभवास आला. नरेंद्राला लहानपणापासूनच डोळे मिटलें कीं ज्योति दर्शन होत असे. त्याला वाटे कीं, हा अनुभव सर्व साधारणच आहे म्हणून त्या विषयीं त्या दिवसा-पर्यंत कोणाशींही तो बोलला नव्हता. तरी श्रीरामकृष्णांनींच त्याला प्रथम विचारलें कीं, "तुला एक ज्योतीचे दर्शन होतें काय?" नरेंद्राचें डोळे ताबड-तोब उघडले व ज्योतिदर्शन हा एक आध्यात्मिक उच्च भूमीकेवरचा अनुभव असून तो त्यानांच होतो इतरांना होत नाहीं, हे त्याच्या लक्षांत आलें. ही गोष्ट श्रीरामकृष्णांना न सांगतांहि समजली म्हणून त्याला मोठा अचंबा वाटला. इतक्यांत श्रीरामकृष्ण बसले होते त्या जागेवरून सरकत सरकत कांहींसे पुट-पुटत नरेंद्र जेथें होता तेथें आले, आणि त्याच्या खांद्यावर आपला पाय देऊन त्याच्या हृदयाला त्यांनीं स्पर्श केला. नरेंद्राला भोंवळ आल्यासारखें होऊन जणूं काय सारें जग, तारे, चंद्रसूर्य, आकाश त्याच्या डोळ्यासमोर चक्राकार फिरूं लागलें व सर्व ब्रह्मांड धावत आहे असें त्याला वाटलें. नरेंद्राचें देहभान हरपलें. इतक्यांत तो मोठ्या आवेशानें ओरडूं लागला. "अहो मला काय करतां? माझी आई, बहीण, भाऊ, हे सर्व घरीं आहेत" यावर श्रीरामकृष्ण जरा हंसले व "होय का तर इतकेंच पुरें." असें म्हणून पुन्हां एकदां त्याच्या हृदयास स्पर्श केला; त्याबरोबर नरेंद्र पुन्हां देहभानावर आला.

त्या दिवसापासून श्रीरामकृष्णाविषयीं नरेंद्र नाथाला अलोट प्रेम व आदर वाटूं लागला. नंतर नरेंद्र दक्षिणेश्वरीं वरचेवर जाऊं लागला. श्रीरामकृष्णांना

पुस्तकीज्ञान मुळींच नसतांही धर्मा संबंधीं वाटेल तो विषय ते सहज लीलेनें समजावूं शकत. त्यांचा आचार, व्यवहार, जुन्या सनातनी मताला धरून असे; पण त्यांची उदारता सुधारकांनाही लाजवी. त्यांचें जीवित ईश्वरमय झालें होतें. त्याविषयीं कोणी जरा बोलूं लागला कीं, त्यांचें देहभान नाहींसें होई. आतांपर्यंत पुस्तकांच्या राशीच्याराशी उलथ्या पालथ्या करून ईश्वराविषयीं नरेंद्राचें जें मत झालें होतें, तें श्रीरामकृष्णांच्या सहवासानें पार बदलूं लागलें. ईश्वर निराकारच असला पाहिजे, असें नरेंद्राचें ठाम मत होतें. पण रामकृष्णाकडे पहावें तर त्यांना ईश्वराचें साकार स्वरूपांतच प्रत्यक्ष दर्शन होई. दक्षिणेश्वराच्या कालीमातेशीं, जणूं काय ती त्यांची जन्मदात्री माताच आहे, अशा दृढ भावानें ते तासाचेतास बोलत बसत. केव्हां केव्हां ते वेड्यासारखे आपले नेसलेलें धोतर सोडून, बगलेस मारून हिंडत, तर केव्हां केव्हां जीवांच्या दुःखानें दुःखी होऊन त्यांना तत्वज्ञानाचा उपदेश देत. स्पर्श-मात्रें करून लोकांना समाधिसुखाचा आस्वाद देऊं शकत. तरी पण त्यांच्यांत अहंकाराचा लेशहि आढळून येत नसे. त्यांच्या शुद्ध व सरळ व्यवहारामुळें लोकांना ते जणूं काय पांच वर्षांचे बालकच आहेत असा भ्रम होई. त्यांचा अद्भुत त्याग, अपूर्व औदार्य व अगाध गांभीर्य पाहून नरेंद्रनाथ मुग्ध होऊन गेला. श्रीरामकृष्णाविषयीं त्याचें प्रेम व आदर दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं लागला. त्यांच्या बारीक सारीक कृत्याकडे देखील तो चौकस दृष्टीनें पाहूं लागला. त्यांचें प्रत्येक वाक्य, प्रत्येक शब्द त्याला बहुमोलाचा, गंभीर व अर्थपूर्ण वाटूं लागला. भावना प्रधानतेपेक्षां नरेंद्रांत चौकस बुद्धीचें प्रमाण जास्त होतें. आपल्या बुद्धीला पटल्यावांचून कोणत्याही गोष्टीवर अथवा मतावर ते विश्वास ठेवीत नसत. आपलें तीक्ष्ण चौकस बुद्धीचें मापनयंत्र त्यानें साध्या सरळ श्रीरामकृष्णांच्या आचारउच्चारांशीं लावून, ताडून पहाण्यांस सुरवात केली.

एकदां श्रीरामकृष्णांना तहान लागली असतां एका इसमानें पाण्याचा पेला भरून आणून दिला. ते पाणी पिण्याचा प्रयत्न करीत असूनही त्यांच्याकडून तें पिववेना. नरेंद्रनाथ गुप्त रीतीनें त्याचें कारण शोधून काढण्यांस निघाले. सरतेशेवटीं तो इसम चारित्र्यहीन असल्याचें पुराव्यानिशीं कळून आलें.

श्रीरामकृष्णांना पैशाचा स्पर्श सहन होत नसे. स्पर्श करतांच त्यांच्या हाताला आंकडे येत. ही त्यांची कृति मुद्दाम इच्छापूर्वक केलेली असते कीं काय हें पहाण्याकरतां नरेंद्रानें त्यांना न कळत एके दिवशीं बिछान्याखाली रुपया ठेविला. श्रीरामकृष्ण त्या बिछान्यावर येऊन बसतांच जणूं काय एखाद्या विंचवानें नांगी मारावी त्याप्रमाणें दचकून उठले. जवळच उभा असलेला नरेंद्र मनांत खजील झाला. अशा महाविभूतीला विनाकारण मी कष्ट दिले म्हणून तो खिन्न झाला, व श्री रामकृष्णांजवळ हात जोडून कृतापराधाबद्दल क्षमा मागूं लागला. श्री रामकृष्ण रागावले तर नाहींच, उलट नरेंद्राच्या चौकस बुद्धीची तारीफच करूं लागले. " गुरु करण्याच्या अगोदर त्याला पुष्कळ रीतीनें तावून सुलाखून शिष्यानें अवश्य पहावें, पाहिल्यावांचून विश्वास ठेवूं नये. " असें ते म्हणाले.

नरेंद्रनाथ बी. ए. झाल्यावर एका श्रीमंताची मुलगी त्याला सांगून आली होती. विश्वनाथ दत्तानीं त्या मुलींशीं नरेंद्राचा विवाह करून टाकावा असें ठरविलें. श्री रामकृष्णांना ही बातमी कळतांच ते रडून-रडून कालीमातेची प्रार्थना करूं लागले. " माते नरेंद्राला संसारी बनवूं नकोस. " सरतेशेवटीं नरेंद्रनाथासारखा लाखांतला मुलगा बायका पोरांचें पोट भरण्यांतच खपून व्यर्थ जावा, हे त्यांना असह्य वाटलें. अकस्मात एके दिवशीं विश्वनाथ दत्तांचीं हृदयक्रिया बंद होऊन ते कैलासवासी झाले. ह्या अचिंत्य योगामुळें विवाह घडून आला नाहीं; आणि अशा रीतीनें संसारपाशांतून मुक्त झाल्यामुळेंच पुढें जगदुद्धाराचें प्रचंड कार्य त्यांच्या हातून पार पडलें.

नरेंद्रनाथावर दारुण प्रसंग कोसळला. त्यांच्या वडिलांची मिळकत कमी नव्हती खरी, पण खर्चही अनावर होता, त्यामुळें शिल्लक कांहीं रहात नसे. दोघी बहिणी, दोन धाकटे भाऊ, आई, या सर्वांच्या अन्नवस्त्राची जबाबदारी नरेंद्रनाथांवर आली.

विश्वनाथ दत्तांच्या अन्नावर पुष्ट झालेल्या त्यांच्या एका नातेवाईकानें असह्य स्थितींत नरेंद्रनाथावर त्याच्या रहात्या घराच्या हिस्सेवारी करितां कोर्टांत दावा आणला. अगोदरच गरिबी, चार सहा माणसांच्या पोटापाण्याची काळजी व वर हा दावा, असे एकावरएक दारुण प्रसंग अननुभवी नरेंद्रावर आले.

इतक्यांतूनही स्वाभिमानी नरेंद्रनाथ अखेर बऱ्याच खटपटीनें यशस्वी होऊन पार पडला; पण दारिद्र्यानें लहानपणापासून सुखांत वाढलेल्या नरेंद्राची पिच्छा पुरविली. जोडे फाटले तर नवीन घेण्याची ऐपत नाहीं, अंगरखे सर्व फाटून गेले तरी नवीन करणें अशक्य. अनवाणी नुसती एक चादर अंगावर टाकून भर उन्हांतून वणवण करीत कित्येक कचेऱ्यांतून, शाळांतून एखादी जागा मिळाल्यास पहावी म्हणून नरेंद्राच्या येरझारा सुरूं झाल्या. कोठें कांहींच नोकरीचें जमेना. कधीं कधीं जेवावयास आपण घरीं राहिलों तर आपल्या भावाबहिणींना पुरेसें अन्न मिळणार नाहीं, असें पाहून कोणा एका मित्रानें जेवावयास बोलाविलें आहे असें सांगून पैशाचे चुरमुरे किंवा फुटाणें खाऊन दिवस काढावा व रात्रीं घरीं परत फिरावें. असे कित्येक दिवस त्यांना हाल सोसावे लागले. एकेदिवशीं असेच, सारा दिवस उपवास करून उन्हांत हिंडून हिंडून दमून निराशेनें संध्याकाळीं घरीं परत जाते वेळीं पावसाची झड आली म्हणून ते एका गृहस्थाच्या ओसरीवर विश्रांति घेण्याकरितां बसले. तेथेंच ग्लानीमुळें कळवळले व झोंपीं गेले. अशा हालांत नरेंद्रनाथाचे बरेंच दिवस गेल्यानें त्यांचें शरीर रोडावलें, तोंड सुकलें, तेज विरमलें; अशा स्थितींत एकदां दक्षिणेश्वरीं श्रीरामकृष्णांच्या दर्शनास गेले. त्यांच्या तोंडाकडे पाहून रामकृष्णांचें हृदय कळवळलें व भडभडून आलें. जवळपास कोणी पैसेवाले गृहस्थ होते, त्यांना उद्देशून ते म्हणाले, " नरेंद्र मोठ्या कष्टांत आहे; त्याला यावेळीं साह्य केल्यास तुम्हां सर्वांचें कल्याण होईल. " इतकें होऊन नरेंद्रनाथाचें तेज किंचितही कमी नव्हतें. त्याच्या करारी बाण्यामुळें रामकृष्णांनीं आपल्याकरितां दुसऱ्या समोर तोंड वेंगाडलें, हें नरेंद्राला मुळींच खपलें नाहीं. तेथें बसलेली सर्व मंडळी उठून गेल्यानंतर श्रीरामकृष्णांना नरेंद्र म्हणाला, " त्यांच्या समोर या सर्व गोष्टी कां उघडकीस आणल्यात ? " हें ऐकून रामकृष्ण कळवळून म्हणाले, " अरे नरेंद्र, मी तुझ्याकरितां प्रत्येकाच्या दरवाज्यांत जाऊन भिक्षा मागून आणूं शकेन. "

ज्या मुलीशीं नरेंद्राचें लग्न निश्चित झालें होतें, तिच्याशीं परिणीत होऊन, नरेंद्रनाथाला घरजांवई होऊन त्यांच्या मोठ्या इस्टेटीचें मालक होतां आलें असतें. पण मृगराज भुकेनें व्याकुळ झाला म्हणून तृण खाईल काय ? विश्वाच्या

कल्याणाकरितां मनानें त्यांनीं कामिनी व कांचनाचा त्याग केला होता, आणि श्रीरामकृष्णचरणीं आपलें तन–मन अर्पण केलें होतें. स्वामीजींनीं शिकस्त केली, पण आई भाऊ बहिणींच्या चरितार्थाची सोय कांहीं त्याला लावतां आली नाहीं. शेवटीं असहाय्य होऊन श्री रामकृष्णांचेच चरण नरेंद्रानें धरले. त्याला अशी खात्री वाटे कीं, श्रीरामकृष्ण जर कालीमातेला विनवून प्रार्थना करतील, तर हें सर्वकांहीं होऊं शकेल. त्याप्रमाणें त्यांनीं श्रीरामकृष्णांना सांगितलें. नरेंद्रनाथाला जाणें भीतिप्रद वाटत होतें ह्मणून तो जाण्यास कचरत असतांच श्रीरामकृष्णांनीं त्याला कालीमातेजवळ मागणी करण्याकरितां मुद्दाम पाठविलें. नरेंद्रनाथ मंदिराच्या गाभाऱ्यांत जाऊन उभा राहिला. आजपर्यंत जिला पाषाणमयी ह्मणून तो समजत होता, ती आज आपल्या चिन्मयतेजानें सारें मंदिर उज्वल करून हास्य वदनानें आपल्याकडे टवकारून पहात असल्याचें नरेंद्रानें पाहिलें. मी काय मागण्याकरितां आलों आहे, वगैरे जागतिक विचार नरेंद्राच्या मनांतून नष्ट झाले. " माते मला शुद्ध भक्ति दे, दुसरें कांहींच मला नको. " असें म्हणत नरेंद्र हात जोडून स्तब्ध राहिला, व त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. कांहीं वेळानें बाहेर येऊन श्री रामकृष्णांनीं विचारतांच आंत झालेला सर्व प्रकार नरेंद्रानें त्यांना सांगितला. आपल्या घरच्या मंडळीच्या उदरपोषणार्थ पैशाची जरूरी असल्याची त्याला आठवण देऊन त्याविषयीं मागणी करण्याकरितां रामकृष्णांनीं त्याला पुन्हां मंदिरांत पाठविलें. या खेपेसही ते जगताला भुलविणारें जगदंबेचें हास्यवदन पाहून नरेंद्र पहिल्या सारखेंच सर्व विसरला. तो जमीनीवर लोळण घेऊन पुन्हां शुद्ध भक्तीचीच त्यानें मातेजवळ मागणी केली. " आईनें काय सांगितलें " म्हणून विचारतांच पुन्हा तोच प्रकार घडला. ह्यानंतर श्री रामकृष्णांनीं पुन्हां आपल्या मागणीची आठवण करून देऊन मातेजवळ तिसऱ्या खेपेस नरेंद्रास पाठविलें. याही खेपेस तोच प्रकार पाहून श्रीरामकृष्ण प्रसन्न झाले व तुला पुढें कांहींही कमी पडणार नाहीं " असा त्याला आशिर्वाद दिला.

यानंतर कांहीं दिवसांनीं भगवच्चिंतनानें अति मृदु व कोमल बनलेल्या श्रीरामकृष्णांच्या शरीरांत सर्दी होऊन घशांत दुखूं लागलें. सरतेशेवटीं तें दुःख

वाढतां वाढतां त्याचें पर्यवसान रोहिणी रोगांत ( Cancer ) झालें. या दुखण्यानें ते बरेच दिवस आजारी होते. घरांतल्याघरांत हिंडणें फिरणें हें सुद्धां कमी प्रमाणांत होऊं लागलें. पातळ पदार्थावरच आहार होऊं लागला. डॉक्टरी उपाय व्हावा म्हणून श्रीरामकृष्णांना दक्षिणेश्वराहून कलकत्याजवळ काशीपुरच्या बगीच्यांत आणून ठेविलें होतें. त्यावेळीं सुप्रसिद्ध असलेले सर्व डॉक्टर, हकीम, वैद्य इत्यादिकांना दाखविण्यांस लागलेला सर्व पैसा खर्च करण्यांत, गिरीश घोष प्रभृती भक्तांनीं मुळींच कसूर केली नाहीं.

श्रीशारदा माता, श्रीरामकृष्णांचे नरेंद्रादी शिष्य यांच्यावर त्यांची सेवा करण्याची जबाबदारी येऊन पडली, व ती त्यांनीं आनंदानें पार पाडली. नरेंद्रनाथ घरचें काम व अभ्यास इत्यादि सर्व टाकून रामकृष्णांच्या सेवेंत व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें ध्यान भजनादिकांत गुंग होऊन गेले. या अखेरच्या दुखण्यानें श्रीरामकृष्ण जास्त दिवस या स्थूल शरिरांत काढणार नाहींत अशी बातमी सर्वत्र पसरल्यानें त्यांच्या दर्शनार्थ बरीच मंडळी येऊं लागली. त्यापैकीं कुणाला दृष्टिक्षेपानें, कुणास स्पर्श मात्रें करून, तर आणखी कुणाला उपदेश देऊन धर्मप्रवण केलें. अशा रीतीनें दुसऱ्यांत धर्मसंचार करून देण्याची त्यांची शक्ति अद्भुत होती. नरेंद्रनाथांच्या असीम शक्तिविषयीं व अतुलनीय ज्ञान–वैराग्याविषयीं आपल्या इतर शिष्यांना त्याची महती पटवून देऊन आपल्यानंतर सर्वांनीं त्याच्याच सल्लामसलतीनें वागावें, अशी आज्ञा त्यांनीं सर्वांना केली. नरेंद्राला शिष्य संप्रदाय परिपालन करणें, धर्मप्रचार करणें, सर्व धर्मांत आढळून येणाऱ्या ऐक्याचा साऱ्या जगांत प्रचार करणें इत्यादि महत्वाच्या कामगिरीविषयीं शिक्षण दिलें. महाप्रयाणाच्या दोन दिवस आधीं नरेंद्राला जवळ बोलावून, त्याच्यांत महायोग शक्तीचा संचार करून, आपण नाना साधनांच्या योगें मिळविलेली सर्व शक्ति नरेंद्राला देऊन, स्वतः फकीर बनल्याचें सांगून इ. स. १८८६ सालीं आगष्ट ता. १६ स. ते महासमाधि मग्न झाले.

भ्रमर जसे कमळाच्या आमोदानें गुंजारव करीत असतां एकत्रित होतात, व विकसित पद्मावर बसून मधुपान करूं लागले म्हणजे स्तब्ध होतात, त्याच-प्रमाणें श्रीरामकृष्णाचें शिष्य एकामागून एक जमा झाले व एका अलौकिक स्वर्गीय

प्रेमसूत्रानें त्यांचीं अंतःकरणें एकत्र निगडित झालीं. ईश्वरी आनंदांत सदा मग्न राहून पांच वर्षांच्या बालकाप्रमाणें पवित्र व प्रेमळ आचरणानें, सहज लीलेनें, साध्या गोष्टीच्या रूपानें, गहन आध्यात्मिक विषय ते समजावून देत. त्यांच्या मुखकमलाकडे पहातांच शिष्यगणाची तहानभूकच काय, परंतु त्रिविध ताप देखील निघून जात. अंतःकरण स्वर्गीय व शांतिसुखाच्या आस्वादानें तल्लीन होईन जाई. असें लीलावतारी भगवान रामकृष्ण आज त्या शिष्यांना बाहेर दिसत नसले तरी तेथें त्यांची मूर्ति स्थिरासन मांडून बसली होती. सुरेंद्रनाथ, मित्र, महेंद्रनाथ, गिरीशचंद्र, बलराम, बसू इत्यादि गृहस्थ भक्त, शशी, शरत, शस्वाल, बाबूराम, हरी, नरेंद्र इत्यादि संसारत्यागी शिष्य रोज एकत्र जमून आपल्या गुरुमाउलीविषयीं बोलण्यांत, त्यांच्या स्मरणांत, परस्पर भावपोषणांत कांहीं काळ घालविल्यावांचून रहात नसत. त्यायोगें त्यांचा आंतरिक आनंद वृद्धिंगत होई, आणि एकत्र विचारविनिमय व संवाद केल्यावाचून त्यांना चैनच पडेनासें झालें. सर्वांच्या योजनेनें कलकत्त्याजवळ वराह नगरांत गंगातीरीं एकांतांत असलेली एक इमारत भाड्यानें घेण्यांत आली, ती त्यांना थोड्या भाड्यांत मिळाली. सर्व गृहस्थ भक्तमंडळी तेथें येऊन जाऊन राहूं लागली. नरेंद्राथादि त्यागी शिष्य मंडळी, तेथेंच रामकृष्णांचा एक फोटो ठेवून, त्यांची पूजाअर्चा करीत, यदृच्छेनें प्राप्त होईल तो पदार्थ गुरुमाउलीला अर्पण करून व जी भात भाजी मिळेल ती तेथेंच सेवन करून राहूं लागली. विधात्याची विचित्र लीला ह्मणतात ती हीच. पुढें जगभर पसरणाऱ्यां श्रीरामकृष्ण मिशनचा हाच आरंभ होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या अंगच्या गुणांनीं, विद्येनें, योग्यतेनें, गुरुबंधूच्या प्रेमादरानें या सर्वांचें नेतृत्व नरेंद्राकडे आलें. नरेंद्राच्या भोंवतीं आतां सर्व मंडळी जमूं लागली. नरेंद्रनाथावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. आई, बंधुभगिनींचा संसार सोडला व इतर त्यागी गुरुबंधूंबरोबर संन्यास स्वीकारला. आणि विश्वबंधुत्वाचा अफाट संसार गळ्यांत अडकवून घेतला. तीव्र वैराग्य, असाधारण शास्त्रज्ञान, बळकट साधननिष्ठा व सर्वांना तल्लीन करणारें त्यांचें शास्त्रशुद्ध भक्तिपूर्ण अमृतस्त्रावी भजन इ. गुणांमुळें नरेंद्रनाथ तेथें जमणाऱ्या मनुष्यांचे आकर्षक केंद्र बनून राहिले. अनेक शास्त्री पंडित त्यांच्याकडे शास्त्र चर्चेकरितां, तर कित्येक साधक साधनपंथ समजून

घेण्याकरितां त्याच्याकडे येऊं लागले. अशा रीतीनें शास्त्रचर्चा, श्रवण, मनन, ध्यान, हरिगुण गायन, नामसंकीर्तन इत्यादि साधनप्रणालीनें गजबजून गेलेलीं चार वर्षे लोटल्यावर नरेंद्राला जनसंसर्गात राहणें आवडेनासें झालें. नंतर एके दिवशीं एकाकी तीर्थभ्रमण करण्याकरितां ते एकदम बाहेर पडले. काशी, अयोध्या, इत्यादि क्षेत्रें त्यांनीं पाहिलीं. ते कोठेही जावोत, त्यांची ब्रम्हतेजोमय मूर्ति लोकांचें चित आकर्षण केल्यावांचून रहात नसे. पूर्वपुण्याईनें त्यांचें दर्शन घडण्याच्या, त्यांच्याशीं दोन गोष्टी बोलण्याचा प्रसंग ज्यांना ज्यांना लाभला, त्यांना त्यांना तो एक अपूर्व लाभ झाल्यासारखें वाटून त्या सुखपूर्ण योगायोगाची स्मृति त्यांच्या चित्तांत अढळ होऊन राहिली. जनसंपर्कापासून आपण गुप्त रहावें म्हणून कोठें ‘ विविदिषानंद ’ तर कोठें ‘ सच्चिदानंन्द ’ असें नांव धारण करून ते फिरत असत. वृंदावनांत असतांना राधाकुंडावर स्नान करून जवळ असलेली कौपीन तेवढी धुवून वाळत टाकिली होती. इतक्यांत एक वानर येऊन ती घेऊन गेला. स्वामीजीं जवळ कौपीन शिवाय कांहींच नसल्याकारणानें भिक्षेस कसें जावें, हा प्रश्न त्यांना पडला. कौपीन देण्याविषयीं त्यांनी बरीच विनवणी केली, पण तो वानर ती कांहीं केल्या देईना. आता काय करावें ? अशा स्थितींत वैतागून, पुन्हां शहरांत पाऊल टाकावयाचें नाहीं, असा निश्चय करून रानाचा रस्ता धरला. थोड्या अंतरावर जातांत तों मागून कोणी हांक मारीत आहे असें त्यांनीं ऐकिलें. त्या हांका मारणाऱ्याच्या हातांत एक काशाय वस्त्र व वाढलेलें ताट होतें. स्वामीजी परत फिरले व अन्न–वस्त्राचा स्वीकार केला. भगवंताच्या अगाध करुणेविषयीं आश्चर्यानें विचार करीत राधाकुंडावर येऊन पहातात तों कौपिन ज्या जागेवर वाळत टाकिली होती तेथेंच त्यांना ती आढळून आली. असो.

त्यानंतर एकदां हात्रज स्टेशनावर एका कोपऱ्यांत स्वामीजी क्षुधाक्रांत होऊन बसले होते. त्यावेळीं तेथें स्टेशन मास्तर असलेल्या शरचंद्र गुप्त नांवाच्या गृहस्थानें त्यांना पाहिलें. त्याची भक्ति स्वामिजीवर बसली व त्यांना ते आपल्या घरीं घेऊन गेले. त्यांच्या सहवासांत स्वामीजींनीं तीन दिवस घालविले. जेव्हां त्यांच्या घरांतून पुढील प्रवासास स्वामीजी निघाले, तेव्हां

तेहि सर्व घरदार सोडून स्वामीजीं बरोबर निघण्यास तयार झाले. स्वामीजींनीं संन्यासाश्रमांत अति कष्ट असल्याचें बरेंच सांगून पाहिलें, तरी गुप्तांचा निश्चय कांहीं डळमळेना. तेव्हां स्वामीजींनीं त्यांच्या मनाची तयारी पाहण्याकरितां आपला कमंडलु त्यांना देऊन, कौपिन घालून त्यांच्या हाताखालच्या पोर्टर वगैरे नोकरांकडून भिक्षा मागून आणण्यास पाठविलें. त्याप्रमाणें त्यांनीं शांतपणानें भिक्षा आणली. परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर त्यांना संन्यास दिला, व त्यांचें नांव सदानंद ठेऊन त्यांना बाहेर निघण्यास आज्ञा केली. हे स्वामीजींचे दुसरे संन्यासी शिष्य होत.

नूतन शिष्य सदानंद यांना बरोबर घेऊन हिंडत हिंडत स्वामीजी हृषीकेशला गेले. तेथें ध्यानधारणेंत दिवस घालवूं लागले. सदानंदांचा पिंड लहानपणापासून सुखांत पोसला गेल्यानें हृषीकेशचे भिक्षान्न व तेथील कठोर रहाणी त्यांना झेपेना; क्षीण होऊन ते आजारी पडले. स्वामीजी हाथ्रज येथें सदानंदाना घेऊन आले व स्वतः मलेरियानें आजारी पडले. स्वामीजी त्या ठिकाणीं आहेत ही बातमी गुरुबंधूंना समजली व त्यांनीं वराहनगर मठांत येण्याविषयीं त्यांना विनंति केली. कांहीं दिवसांनीं स्वामी सदानंदही मठांत येऊन राहिले. पुढें कांहीं दिवसांनीं हल्लीं रामकृष्णमिशनच्या अध्यक्षपदारूढ असलेल्या स्वामी अखंडानंदाजींना बरोबर घेऊन हिमालयाच्या प्रवासाला स्वामीजी निघाले. वैजनाथ, काशी, अलमोरा, कर्मप्रधान इत्यादि ठिकाणीं प्रवास करून शेवटीं ते टिहरीला येऊन राहिले. तेथें त्यांच्या इतर गुरुबंधूंची मुलाखत झाली. कांहीं दिवस टिहरीस राहून ते केदारनाथ बद्रिकाश्रमाकडे वळण्याच्या बेतांत होते. इतक्यांत स्वामी अखंडानंदांची तब्बेत फार बिघडली. औषधोपचाराकरतां त्यांना डेहराडूनला जाणें भाग पडलें. तेथून हिमालयावर जाण्याचा बेत रहित करून ते परत हृषीकेशला आल. तेथे स्वामीजी बरेच आजारी पडले. दोन गुरुबंधू बरोबर होते, म्हणून सेवा शुश्रूषा झाली. तरीसुद्धां आजार इतक्या विकोपाला गेला कीं, सर्व शरीर गार पडून नाडीही बंद पडत चालली. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें एक साधु तेथें प्रकट झाला. त्याला औषधीज्ञान होतें व त्याच्या औषधानें स्वामीजींना गुण आला.

घेण्याकरितां त्याच्याकडे येऊं लागले. अशा रीतीनें शास्त्रचर्चा, श्रवण, मनन, ध्यान, हरिगुण गायन, नामसंकीर्तन इत्यादि साधनप्रणालीनें गजबजून गेलेलीं चार वर्षे लोटल्यावर नरेंद्राला जनसंसर्गात राहणें आवडेनासें झालें. नंतर एके दिवशीं एकाकी तीर्थभ्रमण करण्याकरितां ते एकदम बाहेर पडले. काशी, अयोध्या, इत्यादि क्षेत्रें त्यांनीं पाहिलीं. ते कोठेही जावोत, त्यांची ब्रम्हतेजोमय मूर्ति लोकांचें चित आकर्षण केल्यावांचून रहात नसे. पूर्वपुण्याईनें त्यांचें दर्शन घडण्याच्या, त्यांच्याशीं दोन गोष्टी बोलण्याचा प्रसंग ज्यांना ज्यांना लाभला, त्यांना त्यांना तो एक अपूर्व लाभ झाल्यासारखें वाटून त्या सुखपूर्ण योगायोगाची स्मृति त्यांच्या चित्तांत अढळ होऊन राहिली. जन-संपर्कापासून आपण गुप्त रहावें म्हणून कोठें ‘ विविदिषानंद ’ तर कोठें ‘ सच्चिदानन्द ’ असें नांव धारण करून ते फिरत असत. वृंदावनांत असतांना राधाकुंडावर स्नान करून जवळ असलेली कौपीन तेवढी धुवून वाळत टाकिली होती. इतक्यांत एक वानर येऊन ती घेऊन गेला. स्वामीजीं जवळ कौपीन शिवाय कांहींच नसल्याकारणानें भिक्षेस कसें जावें, हा प्रश्न त्यांना पडला. कौपीन देण्याविषयीं त्यांनी बरीच विनवणी केली, पण तो वानर ती कांहीं केल्या देईना. आता काय करावें ? अशा स्थितींत वैतागून, पुन्हां शहरांत पाऊल टाकावयाचें नाहीं, असा निश्चय करून रानाचा रस्ता धरला. थोड्या अंतरावर जातांत तों मागून कोणी हांक मारीत आहे असें त्यांनीं ऐकिलें. त्या हांका मारणाऱ्याच्या हातांत एक काशाय वस्त्र व वाढलेलें ताट होतें. स्वामी-जी परत फिरले व अन्न-वस्त्राचा स्वीकार केला. भगवंताच्या अगाध करुणे-विषयीं आश्चर्यानें विचार करीत राधाकुंडावर येऊन पहातात तों कौपिन ज्या जागेवर वाळत टाकिली होती तेथेंच त्यांना ती आढळून आली. असो.

त्यानंतर एकदां हात्रज स्टेशनावर एका कोपऱ्यांत स्वामीजी क्षुधाक्रांत होऊन बसले होते. त्यावेळीं तेथें स्टेशन मास्तर असलेल्या शरचंद्र गुप्त नांवाच्या गृहस्थानें त्यांना पाहिलें. त्याची भक्ति स्वामिजीवर बसली व त्यांना ते आपल्या घरीं घेऊन गेले. त्यांच्या सहवासांत स्वामीजींनीं तीन दिवस चालविले. जेव्हां त्यांच्या घरांतून पुढील प्रवासास स्वामीजी निघाले, तेव्हां

तेहि सर्व घरदार सोडून स्वामीजीं बरोबर निघण्यास तयार झाले. स्वामीजींनीं संन्यासाश्रमांत अति कष्ट असल्याचें बरेंच सांगून पाहिलें, तरी गुप्तांचा निश्चय कांहीं डळमळेना. तेव्हां स्वामीजींनीं त्यांच्या मनाची तयारी पाहण्याकरितां आपला कमंडलु त्यांना देऊन, कौपिन घालून त्यांच्या हाताखालच्या पोर्टर वगैरे नोकरांकडून भिक्षा मागून आणण्यास पाठविलें. त्याप्रमाणें त्यांनीं शांत-पणानें भिक्षा आणली. परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर त्यांना संन्यास दिला, व त्यांचें नांव सदानंद ठेऊन त्यांना बाहेर निघण्यास आज्ञा केली. हे स्वामीजींचे दुसरे संन्यासी शिष्य होत.

नूतन शिष्य सदानंद यांना बरोबर घेऊन हिंडत हिंडत स्वामीजी हृषीकेशला गेले. तेथें ध्यानधारणेंत दिवस घालवूं लागले. सदानंदांचा पिंड लहानपणा-पासून सुखांत पोसला गेल्यानें हृषीकेशचे भिक्षान्न व तेथील कठोर रहाणी त्यांना झेपेना; क्षीण होऊन ते आजारी पडले. स्वामीजी हात्रज येथें सदानंदाना घेऊन आले व स्वतः मलेरियानें आजारी पडले. स्वामीजी ह्या ठिकाणीं आहेत ही बातमी गुरुबंधूंना समजली व त्यांनीं वराहनगर मठांत येण्याविषयीं त्यांना विनंति केली. कांहीं दिवसांनीं स्वामी सदानंदही मठांत येऊन राहिले. पुढें कांहीं दिवसांनीं हल्लीं रामकृष्णमिशनच्या अध्यक्षपदारूढ असलेल्या स्वामी अखंड-नंदाजींना बरोबर घेऊन हिमालयाच्या प्रवासाला स्वामीजी निघाले. वैजनाथ, काशी, ्लमोरा, कर्मप्रधान इत्यादि ठिकाणीं प्रवास करून शेवटीं ते टिहरीला येऊन राहिले. तेथें त्यांच्या इतर गुरुबंधूंची मुलाखत झाली. कांहीं दिवस टिहरीस राहून ते केदारनाथ बद्रिकाश्रमाकडे वळण्याच्या बेतांत होते. इतक्यांत स्वामी अखंडानंदांची तब्बेत फार बिघडली. औषधोपचाराकरतां त्यांना डेहरा-डूनला जाणें भाग पडलें. तेथून हिमालयावर जाण्याचा बेत रहित करून ते परत हृषीकेशला आल. तेथें स्वामीजी बरेच आजारी पडले. दोन गुरुबंधू बरोबर होते, म्हणून सेवा शुश्रूषा झाली. तरीसुद्धां आजार इतक्या विकोपाला गेला कीं, सर्व शरीर गार पडून नाडीही बंद पडत चालली. इत-क्यांत कर्मधर्मसंयोगानें एक साधु तेथें प्रकट झाला. त्याला औषधीज्ञान होतें व त्याच्या औषधानें स्वामीजींना गुण आला.

त्यानंतर गुरूबंधूबरोबर कांहीं दिवस कलकत्याच्या बाजूस राहिले. पुन्हा कांहीं दिवसांनीं निर्जन अशा हिमालय पर्वतावर जाऊन एकाकी निस्संग राहून ध्यानधारणादिकांत दिवस घालवीत समाधिमग्न अवस्थेमध्यें राहण्याचा इच्छेनें ते निघाले; परंतु गुरुबंधू कांहीं केल्या त्यांना एकटे जाऊं देईनात जेव्हां जेव्हां त गंभीर ध्यानांत मग्न होऊन राहण्याची इच्छा करीत, तेव्हां तेव्हां कांहींना कांहीं विघ्न उपस्थित होऊन मनापासून स्वच्छंदपणें समाधि सुखाचा आस्वाद घेणें त्यांना दुरापास्त होई. समाधिसुखाकरितां ते जेव्हां आसन मांडून बसत, व मन अंतर्मुख होऊन समाधिसुखाच्या संधींत जाणार तोंच समस्त मानव–जातीची दुर्दशा, भारतराष्ट्राचे दारुण दारिद्र्य त्यांच्या मनःचक्षु पुढें उभें राहून त्यांच्या मनाला चंचळ व विषण्ण करून सोडी. शेवटी गुरुबंधूंच्या विनंतील न जुमानतां त्यांनींच दरडावून एकाकी निस्संग होऊन सारा भारत देश हिंड-ण्याच्या उद्देशानें स्वारी बाहेर पडली. लोकसमूहापासून त्रास न व्हावा म्हणून, नांव बदलणें इत्यादि त्यांनीं करून पाहिलें, पण दैव थोडेंच गप बस-णार ! त्यांची प्रतिभा, त्यांची विद्वता, त्यांचे प्रेम कांहीं केल्या त्यांना लपूं देईना. ते कोणत्याहि जागीं पोहचण्याच्या अगोदरच त्यांच्या तेजाचा प्रकाश तेथें पोंहोंचून जनजमूह त्यांच्या दर्शनाची चातकाप्रमाणें वाट पहात असे. शिक्षित, अशिक्षित, सर्व तऱ्हेचे लोक त्यांच्या वाणीपासून निघणारा रस चाखण्याकरितां आतुर असत. ते जेव्हां भक्तिरसानें ओथंबलेलीं गाणीं गावून तल्लीन होत, तेव्हां श्रोतृवर्गाची अंतःकरणें उंचबळू येत व स्वामीजीचें मुख-कमल दिव्य भावानें प्रफुल्लित होई. त्याचप्रमाणें ते ज्ञानचर्चा करूं लागले म्हणजे त्यांच्या प्रखर ज्ञानापुढें महान पंडित निस्तेज होत असत. अशा तऱ्हेनें अयोध्येपासून कन्याकुमारीपर्यंत भ्रमण करीत, राजेमहाराजांपासून तो दरिद्री शेतकरी, इतकेच काय महार चांभार, जे जे भेटतील त्यांना धर्माचा उपदेश देऊन, शांतीचा मार्ग स्वामीजी त्यांना खुला करून देत, आणि अशा रीतीनें सर्वांना हिंदु धर्माचें यथार्थ उज्वल स्वरूप पटवून देत.

" स्वामीजी आपण संन्यासी असून राजे महाराजांकडे कां जातां ? संन्या-शांना राजदर्शन निषिद्ध आहे. " असें कोणी विचारल्यांस ते असें उत्तर देत कीं एक राजा धार्मिक झाला तर हजारों लोकांचें धर्मरक्षण केल्या सारखे होतें. "

स.
ता.

ज्या एका सूत्रानें इतर हजारो लोक चालतात, तशा एका व्यक्तींत धर्मभाव संचारित केला म्हणजे हजारों लोकांत धर्मसंचार व त्यांच्या धर्मरक्षणाचा उपाय आपोआप होत असतो. याप्रमाणें स्वामीजींची कार्य करण्याची हातोटी दिसून येते.

असे हिंडत हिंडत छोट्यावड्या संस्थानांनीं भरलेल्या राजपुतान्यांत स्वामीजी आले. तेथील बऱ्याच संस्थानिकांची त्यांनीं गांठ घेतली; विचार व चारित्र्याच्या प्रभावानें त्यांना आपलें शिष्यत्व पत्करण्यास लावलें. अशा रितीनें पाश्चात्य संस्कृतीच्या मागें लागलेल्या अनेक राजेसाहेबांना ताळ्यावर आणलें. अलवारच्या महाराजांनीं तर त्यांना प्रथमदर्शनी असा सवाल टाकला कीं, आपण इतके विद्वान, तेजस्वी, बलिष्ठ असतांना देशाकरितां कांहींच काम वगैरे न करतां संन्यासी होऊन रिकामे कां हिंडतां? उलट स्वामीजींनी विचारलें कीं, "आपण ह्या संस्थानचे राजे प्रजेचें हित कशांत आहे याचा विचार करून तें साधण्याच्या मार्गास लागणें आपलें आद्य कर्तव्य असून, गोऱ्या लोकांचें अनुकरण करीत त्यांच्या मागे शिकार, खेळ, विलास इत्यादि छंदांत व्यर्थ आयुष्य कां घालवितां?" हे मर्मभेदी उत्तर ऐकून महाराज म्हणाले "मला त्याची आवड म्हणून दुसरें काय?" तर मग मलाहि संन्यासाची आवड म्हणूनच मी संन्यासी झालों," असा स्वामीजींनी उलट जबाब दिला. दुसऱ्या एका प्रसंगीं बोलणें मूर्तिपूजेविषयीं निघालें. तेव्हां राजेसाहेबांचें असें म्हणणें पडलें कीं मूर्तिपूजा आपणांस अमान्य असून ती अवनतिकारक आहे. तेव्हां स्वामीजी म्हणाले, ईश्वरावर विश्वास उत्पन्न झाला कीं झालें, मूर्तिपूजा केलीच पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं. अशाच रितीनें खेतरी, लिंमडी इत्यादि संस्थानचे राजेसाहेबही स्वामीजींचे शिष्य झाले.

अशा तऱ्हेचें उपदेशकार्य करून स्वामीजी दक्षिणप्रांतीं आले. दक्षिणेस धर्मप्रचार करीत परिव्राजक वेषांत फिरत असतांना दक्षिणेचे रामानंदचे राजेही त्यांचे शिष्य झाले.

स्वामीजींनीं साऱ्या भरतखंडांत प्रवास केला. राजे महाराजांच्या राजवाड्या-पासून शेतकरी व दीनदुबळ्या अस्पृश्यवर्गाच्या खोपटांपर्यंत जाऊन, सर्वांशीं समरस होऊन त्यांना त्यांची यथार्थ स्थिति समजावून दिली. साऱ्या भरत-

त्यानंतर गुरुबंधूबरोबर कांहीं दिवस कलकत्याच्या बाजूस राहिले. पुन्हा कांहीं दिवसांनीं निर्जन अशा हिमालय पर्वतावर जाऊन एकाकी निस्संग राहून ध्यानधारणादिकांत दिवस घालवीत समाधिमग्न अवस्थेमध्यें राहण्याचा इच्छेनें ते निघाले; परंतु गुरुबंधू कांहीं केल्या त्यांना एकटे जाऊं देईनात जेव्हां जेव्हां त गंभीर ध्यानांत मग्न होऊन राहण्याची इच्छा करीत, तेव्हां तेव्हां कांहींना कांहीं विघ्न उपस्थित होऊन मनापासून स्वच्छंदपणें समाधि सुखाचा आस्वाद घेणें त्यांना दुरापास्त होई. समाधिसुखाकरितां ते जेव्हां आसन मांडून बसत, व मन अंतर्मुख होऊन समाधिसुखाच्या संधींत जाणार तोंच समस्त मानव-जातीची दुर्दशा, भारतराष्ट्राचे दारुण दारिद्र्य त्यांच्या मनःचक्षु पुढें उभें राहून त्यांच्या मनाला चंचळ व विषण्ण करून सोडी. शेवटी गुरुबंधूंच्या विनंतीला न जुमानतां त्यांनींच दरडावून एकाकी निस्संग होऊन सारा भारत देश हिंड-ण्याच्या उद्देशानें स्वारी बाहेर पडली. लोकसमूहापासून त्रास न व्हावा म्हणून, नांव बदलणें इत्यादि त्यांनीं करून पाहिलें, पण दैव थोडेंच गप बस-णार ! त्यांची प्रतिभा, त्यांची विद्वता, त्यांचे प्रेम कांहीं केल्या त्यांना लपूं देईना. ते कोणत्याहि जागीं पोहचण्याच्या अगोदरच त्यांच्या तेजाचा प्रकाश तेथें पोंहोंचून जनजमूह त्यांच्या दर्शनाची चातकाप्रमाणें वाट पहात असे. शिक्षित, अशिक्षित, सर्व तऱ्हेचे लोक त्यांच्या वाणीपासून निधणारा रस चाखण्याकरितां आतुर असत. ते जेव्हां भक्तिरसानें ओथंबलेलीं गाणीं गावून तल्लीन होत, तेव्हां श्रोतृवर्गाची अंतःकरणें उंचबळून येत व स्वामीजींचें मुख-कमल दिव्य भावानें प्रफुल्लित होई. त्याचप्रमाणें ते ज्ञानचर्चा करूं लागले म्हणजे त्यांच्या प्रखर ज्ञानापुढें महान पंडित निस्तेज होत असत. अशा तऱ्हेनें अयोध्येपासून कन्याकुमारीपर्यंत भ्रमण करीत, राजेमहाराजांपासून तो दरिद्री शेतकरी, इतकेच काय महार चांभार, जे जे भेटतील त्यांना धर्माचा उपदेश देऊन, शांतीचा मार्ग स्वामीजी त्यांना खुला करून देत, आणि अशा रीतीनें सर्वांना हिंदु धर्माचें यथार्थ उज्वल स्वरूप पटवून देत.

" स्वामीजी आपण संन्यासी असून राजे महाराजांकडे कां जातां ? संन्या-शांना राजदर्शन निषिद्ध आहे. " असें कोणी विचारल्यास ते असें उत्तर देत कीं एक राजा धार्मिक झाला तर हजारों लोकांचें धर्मरक्षण केल्या सारखे होतें."

[stamp]

ज्या एका सूत्रानें इतर हजारो लोक चालतात, तशा एका व्यक्तींत धर्मभाव संचारित केला म्हणजे हजारों लोकांत धर्मसंचार व त्यांच्या धर्मरक्षणाचा उपाय आपोआप होत असतो. याप्रमाणें स्वामीजींची कार्य करण्याची हातोटी दिसून येते.

असे हिंडत हिंडत छोट्यावड्या संस्थानांनीं भरलेल्या राजपुतान्यांत स्वामीजी आले. तेथील बऱ्याच संस्थानिकांची त्यांनीं गांठ घेतली; विचार व चारित्र्याच्या प्रभावानें त्यांना आपलें शिष्यत्व पत्करण्यास लावलें. अशा रितीनें पाश्चात्य संस्कृतीच्या मागें लागलेल्या अनेक राजेसाहेबांना ताळ्यावर आणलें. अलवारच्या महाराजांनीं तर त्यांना प्रथमदर्शनी असा सवाल टाकला कीं, आपण इतके विद्वान, तेजस्वी, बलिष्ठ असतांना देशाकरितां कांहींच काम वगैरे न करतां संन्यासी होऊन रिकामे कां हिंडतां ? उलट स्वामीजींनी विचारलें कीं, " आपण ह्या संस्थानचे राजे प्रजेचें हित कशांत आहे याचा विचार करून तें साधण्याच्या मार्गास लागणें आपलें आद्य कर्तव्य असून, गोऱ्या लोकांचें अनुकरण करीत त्यांच्या मागे शिकार, खेळ, विलास इत्यादि छंदांत व्यर्थ आयुष्य कां घालवितां ?" हे मर्मभेदी उत्तर ऐकून महाराज म्हणाले " मला त्याची आवड म्हणून दुसरें काय?" तर मग मलाहि संन्यासाची आवड म्हणूनच मी संन्यासी झालों, " असा स्वामीजींनी उलट जबाब दिला. दुसऱ्या एका प्रसंगीं बोलणें मूर्तिपूजेविषयीं निघालें. तेव्हां राजेसाहेबांचें असें म्हणणें पडलें कीं मूर्तिपूजा आपणांस अमान्य असून ती अवनतिकारक आहे. तेव्हां स्वामीजी म्हणाले, ईश्वरावर विश्वास उत्पन्न झाला कीं झालें, मूर्तिपूजा केलीच पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं. अशाच रितीनें खेतरी, लिंमडी इत्यादि संस्थानचे राजेसाहेबही स्वामीजींचे शिष्य झाले.

अशा तऱ्हेचें उपदेशकार्य करून स्वामीजी दक्षिणप्रांतीं आले. दक्षिणेस धर्मप्रचार करीत परिव्राजक वेषांत फिरत असतांना दक्षिणेचे रामानंदचे राजेही त्यांचे शिष्य झाले.

स्वामीजींनीं साऱ्या भरतखंडांत प्रवास केला. राजे महाराजांच्या राजवाड्या-पासून शेतकरी व दीनदुबळ्या अस्पृश्यवर्गाच्या खोपटांपर्यंत जाऊन, सर्वांशीं समरस होऊन त्यांना त्यांची यथार्थ स्थिति समजावून दिली. साऱ्या भरत-

खंडांत दारिद्य व अज्ञान हेंच त्यांना प्रवासाच्यावेळीं दिसून आलें. एकजुटीनें कार्य करूं शकतील अशी आशा उरली नाहीं. ईर्षा व मत्सर ह्या दोन दुर्गुणांनीं सर्वांचीं अंतःकरणें विदीर्ण केलीं आहेत. धर्माच्या बाह्य स्वरूपालाच कवटाळून खऱ्या धर्माला आपले बांधव पारखे झाले आहेत. आत्मविश्वास पार लयाला जाऊन सारा समाज हीन दीन दुबळा झाला आहे; यामुळें कोणतेही कार्य करण्याची मनाची तयारी नसते. असें मत स्वामीजींचे साऱ्या भरतखंडांत प्रवास करून झाल्यानंतर बनलें होतें.

ज्या सभेंत भाषण केल्यानें स्वामीजींची किर्ति सर्व जगांत झाली, ती सर्वधर्म-महापरिषद अमेरिकेंमधील चिकागो शहरांत तिथल्या लोकांच्या खटपटीनें १८९३ सालीं झाली. जगतीतलावरच्या सर्व धर्मांचे, सर्व संप्रदायांचे लोक या परिषदेला आले होते. सर्व धर्मांत आपलाच खिस्ती धर्म श्रेष्ठ हे परिषदेद्वारां सिद्ध करावयाचें हा चालकांचा अंतस्थ हेतु होता. अशी सभा पहिलीच भरत असल्याकारणानें तिला विषेश महत्व होतें. भारतराष्ट्र हें जितराष्ट्र असल्याकारणानें इतर देशांत त्याची निर्भत्सना होत होती. जिथें राष्ट्राचीच ही गोष्ट तिथें त्याच्या संस्कृतीची, तत्वज्ञानाची काय किंमत? आर्यसंस्कृतीचा झेंडा तेथें मिरवून तिची महती त्यांना पटवून द्यावी व अशातऱ्हेनें सर्व राष्ट्रांचे डोळे प्रेमभरानें भारतवर्षाकडे लागतील असें सुंदर चित्र स्वामीजींच्या पुढें उभें राहिलें. विशेषतः पाश्चात्य राष्ट्रांना धर्माची महती व आवश्यकता समजावून न दिल्यास ती विषयकर्दमांतच बुडून नाहींशी होतील. अशा रीतीनें अतिंद्रिय शांति-सुखाला कायमची पारखीं होतील, असें स्वामीजींना वाटत होतें. भारतवा-सियांना पाश्चात्य राष्ट्रांतील पुरुषांचें अनुकरण करण्याची दुष्ट सवय जडली होती व ती जाण्याकरितां तेथेंच प्रचार करणें योग्य आहे असें स्वामीजीना वाटे, "स्वामीजी ह्या देशांत धर्मप्रचाराची आवश्यकता असतांना दुसऱ्या देशांत आपण कां गेला ?' असा प्रश्न त्यांना एकानें केला होता. त्याला स्वामजिीनें मोठे मार्मिक व विनोदी उत्तर दिले आहे. ते म्हणाले, 'मला जें कांहीं सांगावयाचें होतें तें मला तुमच्या कानांत सांगावयाचें होतें; व ते कान तुम्ही तेथें गहाण ठेविले होते म्हणून मला तेथें जावें लागलें.'

स्वामीजींनीं ह्या सर्वधर्म परिषदेला जावयाचें ठरविलें व त्याकरतां त्यांनीं सिलोनकडे मोर्चा वळविला. साऱ्या भरतखंडाचें दारिद्र्य, त्याची हीनदीन स्थिती पाहून त्यांचें अंतःकरण कळवळून आलें त्याबद्दल विचार करतां करतां त्या कन्याकुमारीच्या एका शिलाखंडावर त्यांना झोंप लागली. स्वप्नांत समुद्र ओंलाडून जाण्याविषयीं त्यांना श्रीरामकृष्णानीं दृष्टांत दिला. नंतर शारदामातेचा अनुज्ञा व आशिर्वाद मिळविला. मद्रासच्या होतकरू तरुणांनीं खेतरीच्या राजापासून पैशाची व्यवस्था करून दिली. स्वामीजी १८९३ सालीं सर्वधर्मपरिषदेकरितां हजर रहाण्यास ३१ मे ला अमेरिकेस जाण्यास निघाले.

स्वामीजी एकाएकीं असहाय्य स्थितींत कसेबसे अमेरिकेस पोंहचले. त्यांच्याजवळ फारसा पैसा नव्हता, कोणाची ओळख किंवा परिचयपत्रिका नव्हती. अशा बिकट परिस्थींतींत त्या मायापुरींत यःकश्चित् एका संन्याशाची दाद कोण घेणार ? शहराचे ठळक ठळक भाग स्वामीजी पहात पहात हिंडूं लागले. एका बाईला स्वामीजींचा चेहरा व त्यांचा पोषाख वगैरे पाहून कौतुक वाटलें व आपल्या हॉटेलमध्यें यांना घेऊन गेल्यास यांना पहाण्याकरतां, हिंदुस्थानाविषयीं अद्भूत गोष्टी ऐकण्याकरीतां लोकांच्या झुंडीच्या झुंडी येतील व त्यामुळें आपला फायदा होईल, असें त्या बाईला वाटून ती त्यांना घेऊन गेली. अशा रीतीनें हळू हळू तेथील लोकांस स्वामीजींची ओळख होऊं लागली. एके दिवशीं हार्वर्ट कॉलेजचे प्रो. राईटसाहेब तेथें आले. रत्नपारख्या वाचून रत्नाची परीक्षा होणें ज्याप्रमाणें दूरापास्त, त्याप्रमाणें आतांपर्यंत आलेल्या मंडळीपैकीं कोणालाही स्वामीजींची किंमत कळली नव्हती. प्रो. राईटसाहेबांना त्यांची किंमत कळली व त्यांनीं स्वामीजींना मिनतवारीनें चिकागो पार्लमेंटमध्यें हजर राहूं देण्याबद्दल तेथील अधिकारी मंडळीकडून आमत्रंण पत्रिका वगैरे गोष्टी मिळवून दिल्या. स्वामीजी कफनी, फेटा वगैरे परिधान करून परिषदेच्या दिवशीं हजर राहिले. हो ना करितां करितां स्वामीजींनी अध्यक्ष्यस्थानीं हिंदूधर्माचे प्रतिनिधी म्हणून सर्वांना ओळख करून दिली. भारतराष्ट्राचा ऋषिमुनिआचार्य वर्ग जणूं स्वामीजींच्या मागें उभा आहे. समोर पाश्चात्यराष्ट्राच्या नवशक्तीचा जणूंकाय सागरच, चंचल-

तेच्या हलकल्लोळानें गजबजलेला सभासदांच्या रूपानें दिसत होता. स्वामीजी भाषण करण्यास उठले. " अमेरिकन बंधु भगिनीनों, " असे शब्द स्वामीजींच्या तोंडून निघतात न निघतात तोंच विजेचा झटका बसल्यासारखें होऊन सर्व सभा टाळ्यांचा गजर करीत त्या दिवशीं उभी राहिली. सूर्योदयाबरोबर तारांचे तेज फिकें पडावें, त्याप्रमाणें इतर वक्त्यांचें तेज स्वामीजी समोर निस्तेज पडूं लागलें. स्वामीजी विजयी ठरले. त्यांचे भाषण लोकांना इतकें आवडूं लागलें कीं सभेंत चिक्कार गर्दी होत असली तरी शांत व स्तब्ध वातावरण असावें. अशा अद्‌भुतरीतीनें स्वामीजींनी हिंदुधर्माची विजयी पताका नव-युगांतल्या सुधारक राष्ट्रांत अग्रणी मानलेल्या अमेरिकेंत रोंवली. स्वामीजींच्या कीर्तिसुमनांचा सुवास सर्वत्र पसरला. अमेरिकेंतील सर्व पत्रांतून स्तुतीचा सारखा वर्षाव होऊं लागला. त्यांचें ओझरतें दर्शन तरी मिळावें म्हणून लोकांचे थवे तिकडे लोटूं लागले. स्वामीजींची वृत्ति सदा आनंदी, निरहंकारी, बालकाप्रमाणें सर्वांशी समभावानें वागणारी. त्यांना एकच ध्यास असे कीं, भरत भूमीची हल्लींची प्रेतकळा जाऊन तिच्या शरीरांत नवचैतन्याचा संचार कसा होईल ? स्वामीजींच्या वक्तृत्वानें अमेरिकनावर प्रभाव पडला. त्यांच्या विचा-रांत क्रांती केली. त्यांना हिंदुधर्म आवडूं लागला. स्त्रीपुरुष स्वामीजींच्या चरणीं लागून त्यांचे शिष्य बनले. उलट ख्रिस्ती मिशनरी इत्यादि संस्थाच्या नेत्यांना आपल्या धर्मावर, इतके दिवस अव्याहतपणें चाललेल्या मतांवर स्वामीजींनीं आपले वर्चस्व स्थापन करून आपल्या कळपांत फूट पाडून बऱ्याच मंडळींना आपल्याकडे खेचून घेतलें म्हणून त्यांना राग आला व ते त्यांचा मत्सर करूं लागले. त्यांनीं स्वामीजींची नालस्ती करावी म्हणून त्यांच्या विरुद्ध भलत्याच कंड्या पिकविल्या व त्यांच्या धवल कीर्तीला काळिमा फांसण्याकरितां वाटेल तो प्रयत्न केला, एकदां ते भाषण करीत असतां त्यांच्यावर गोळी झाडण्याचा निंद्य प्रयत्नहि करून पाहिला, पण ' देव तारी त्याला कोण मारी ' ह्या म्हणीप्रमाणें स्वामीजींना कांहींच झाले नाहीं. उलट सूर्यावर थुंकण्याचा प्रयत्न केला तर थुंकी आपणावरच पडते, त्याप्रमाणें त्या दुष्टांवरच ती बाजू शेकली व सर्वत्र छिः थूः झाली. असो. स्वामीजी १८९५ सालीं आपली पुढची धर्मप्रचाराची कामगिरी अमेरिकन शिष्यशिष्यीणींवर सोंपवून इंग्लंडला गेले. तेथें

5243

अगोदरच त्यांच्या कीर्तीचा डंका वाजून राहिला होता. तेथें गेल्यावर हिंदुधर्मावर त्यांची व्याख्यानें बरींच झाली. त्यायोगें बऱ्याच इंग्रज स्त्रीपुरुषांची मनें भारून गेलीं. मिशनरी लोकांनीं देखील स्वामीजींचे स्वागत करून त्यांना आपले चर्चमध्यें सार्वभौमिक वेदांतधर्मावर व्याख्यान देण्यास मुद्दाम आमंत्रण दिलें. तेथें बरेच स्त्रीपुरुष स्वामीजींचें शिष्य झाले. मार्गारेट् नोबल नांवाच्या सुशिक्षित सत्चारित्रवान् विदुषी स्वामीजीकडून सर्वस्वत्यागरूप महामंत्राची दीक्षा घेऊन त्यांच्याबरोबर हिंदुस्थानांत आली व ब्रह्मचर्य धारण करून सिस्टर निवेदिता ह्या यथार्थ नावानें सर्वांच्या परिचयाची झाली. तिनें कलकत्यास मुलींची शाळा काढून, तिच्या उन्नती करितां जीवापाड मेहनत करून, कष्ट सोसून शेवटीं त्याच कार्यांत देह ठेविला. मिस्टर व मिसेस सेव्हियर या जोडीनें आपले सर्वस्व भारतराष्ट्राच्या हिताकरितां वेंचलें.

इंग्लडांत कांहीं दिवस काढून स्वामीजी पुन्हा अमेरिकेस गेले. आपल्या कार्याला स्थायी स्वरुप यावें म्हणून कांहीं केंद्रें तेथें स्थापन करून, तेथील वाढत्याप्रमाणाचें प्रचारकार्य करण्याकरितां गुरुबंधु स्वामी शारदानंद व स्वामी अभेदानंद यांना कलकत्याहून अमेरिकेस बोलाविलें व त्यांना सर्व कार्याची महती सांगून, प्रसिद्ध माणसांची ओळख करून दिली. पुढील सर्व जबाबदारी त्यांच्यावर सोंपवून आपण स्वदेशीं येण्याकरितां निघाले. वाटेंत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथील सुप्रसिद्ध नामांकित मॅक्समुल्लर, पॉरट, डॉसन् इत्यादि दार्शनिक वैज्ञानिक पंडितांना भेटून आले. एका अल्पवयस्क वंगदेशाच्या युवकाला एका जीवनांत इतके ज्ञानभांडार हस्तगत कसें करतां आलें यांचे त्या पंडितांना मोठें आश्चर्य वाटलें. लघुलेखक गुडविनसाहेब हेही स्वामीजींचे शिष्य बनून हिंदुस्थानांत आले.

येतांना बोटींत स्वामीजींची एका मिशनऱ्याची गांठ पडली. धर्मासंबंधीं बोलणें होतां होतां हे गृहस्थ तर्क करूं लागले. स्वामीजी तर्क करण्यांत निष्णात होते. तर्कांत थोड्याच वेळांत हरून जाऊन कांहींच सुचेनासें झाल्यावर 'शेषं कोपेन पूरयेत्' या न्यायानें मिशनऱ्याची स्वारी बिथरली व हिंदुधर्माविरुद्ध तोंडाला येईल तें बरळूं लागली. यांच्याशी बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें जाणून स्वामीजी जागेवरून उठले व त्याचा गळा दोही हातांनीं दाबून म्हणाले 'बोल

माझ्या धर्माविषयीं कांहीं अद्वातद्वा बोलशील ? ' म्हणून दरडावून बोलले त्या मिशनऱ्याची पांचावर धारण बसली, त्याचें धाबें दणाणलें, डोळे पांढरे झाले, ' पुन्हां असें करणार नाहीं, मला सोडा ' असे विनविल्यानंतर स्वामीजींनीं गळा सोडला.

जवळ जवळ स्वामीजींनीं ४ वर्षें बाहेर काढल्यानंतर १५ जानेवारी १८९७ सालीं कोलंबो शहरांत पुन्हां पदार्पण केलें. आधिभौतिक सुधारणेच्या गर्वानें फुगलेल्या पाश्चात्यांना ज्यांनीं दैवीवाणीच्या प्रभावानें हिंदुधर्मासमोर गुडघे टेकून मस्तक अवनत करण्यास लावलें त्या पुण्यपुरुषाच्या दर्शनास अलोट जनसमूह लोटला. त्यांच्या वक्तृत्वपूर्ण उपदेशानें हिंदु-धर्माची महती लोकांना पटवून दिली. तीन एक दिवस कोलंबोस राहून रामनदला स्वामीजी आले. रामनदचे राजे परिवारासह आपल्या गुरूचे स्वागत करण्याकरितां बंदरावर हजर होते. स्वामीजी बोटीवरून उतरतांच राजानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून त्यांना साष्टांग नमस्कार घातला व मोठ्या समारंभानें पालखीत बसवून आपण स्वतः पायीं चालत थाटाच्या मिरवणुकीनें राजगृहीं आणलें.

राजगुरु, विश्वविजयी विवेकानंदाच्या आगमनानें सारें शहर आनंदोत्सवानें फुलून उठलें. भरतभूमीस परत येऊन ज्याठिकाणीं स्वामीजींचीं प्रथम पाऊलें उमटलीं त्याठिकाणीं रामनदच्या महाराजांनीं ४० फूट उंचीचा स्मृतिस्तंभ उभारला. स्वामीजींच्या आगमनाची वार्ता सर्व देशभर पसरली, स्वामीजींना पहाण्यास त्यांचें व्याख्यान ऐकण्यास प्रत्येकाचें अंतःकरण उत्सुकतेनें उचंबळूं लागलें, परमकुडी, मदुरा, कुंभकोणम् इत्यादि शहरांतून व्याख्यानें देत, मानपत्र घेत, स्वामीजी मद्रासेस आले. मद्रासजवळ एका लहानशा स्टेशनावर लोकांची गर्दी लोटली होती. पण लहान स्टेशन असल्याकारणानें गाडी कांहीं थांबली नाहीं, तेव्हां गाडी थांबविण्याकरितां कांहीं तरुण मंडळी रूळावर आडवी पडली. गार्डला गाडी थांबविणें भाग पडलें. मद्रासला तर स्वामीजींच्या आगमनार्थ शहरांत मुख्य मुख्य ठिकाणीं मोठीं तोरणें उभारून, अमोलिक जिनसांनीं शहराला सजवून लोकांनीं अपूर्व महोत्सव केला. स्वामीजींच्या जयजयकारानें दशदिशा निनादून सोडल्या. भरतभूमीचा मान गौरव द्विगुणित झाला असें

स्थल प्रत
सं. [illegible]
ता. ६।१९३३

वाटूं लागलें. मद्रदेशांत स्वामीजींनी नऊ दिवस वास करून आपल्या अभिनव वक्तृत्वानें तेथील तरुणांना पुढील कार्यास प्रोत्साहन देऊन बोटीनें कलकत्त्यास प्रयाण केलें. तेथे पोंचल्यावर तेथील लोकांचा उत्साह तर अवर्णनीय होता. हजारों लोकांच्या कंठांतून निघालेल्या स्वामीजींच्या नांवाचा जयघोष वैकुंठ-लोकीं क्षीरसागरीं शेषावर झोपीं गेलेल्या भगवान विष्णूच्या कानांत जाऊन त्याची झोंपमोंड सुद्धां कदाचित् झाली असेल ! उत्साही तरुणांनीं स्वामीजींना गाडींत बसवून गाडी स्वतः ओढीत नेली. भजनी मंडळी, कॉन्सर्ट पार्टी, नाना-तऱ्हेची वाद्यें यांच्या गजरांत मोठ्या थाटांत बागबझारच्या पशुपतिनाथ बसूंच्या मोठ्या वाड्यांत स्वामीजींना नेण्यांत आलें.

त्या दिवशीं तेथील लोकांच्या उत्साहामुळें त्या विशिष्ट आनंदातिशयामुळें कलकत्ता शहर जणु स्वर्गीय नंदनवनच भासल्यास नवल काय ?

शेकडों लोक भिन्न भिन्न उद्देशानें स्वामीजींची भेट घेण्यास येत. मोठमोठे शास्त्री पंडित त्यांच्याशीं शास्त्र विचार करण्यास, धर्मविश्वासु धर्मशिक्षणार्थ, भगवद्भक्त भक्तितत्त्व समजून घेण्यास, समाजसुधारक सामाजिक प्रश्नांचा उलगडा करून घेण्यास, वर्तमानपत्राचे संपादक त्यांची मतें समजून घेऊन आपल्या पत्रांत छापण्याकरितां, मुमुक्षु शिष्यत्व पत्करून आपला मोक्षमार्ग खुला करून घेण्या-करितां, त्यांच्याकडे येऊं लागले. स्वामीजींची उत्तरें, विषय समजावून सांगण्याची हतोटी, गूढ विषय देखील विनोदी भाषेनें सुगम करून देऊन मांडण्याची शिताफी पाहून लोक आश्चर्यचकित होऊन जात. जे जे म्हणून त्यांच्याकडे आपआपल्या भिन्नभिन्न विषयाविषयीं नानातऱ्हेच्या शंका घेऊन येत ते ते सर्व त्यांच्या उत्तरानें समाधान पावत.

ज्या वराहनगर मठांत श्रीरामकृष्णांच्या अवतार समाप्तिनंतर त्यांच्या शिष्यांनीं जमून साधनसंग्राम चालविला होता; जेथें हेगेल, हक्स्ले, कँट, स्पिनोझा, शॉपेन-हॉर यांच्या मतांची निरीश्वरवादी चार्वाक, बौद्धी यांच्याशींही शहानिशा होत असे. न्याय, मीमांसा, सांख्य, पातंजल, द्वैत, विषिष्टाद्वैत, अद्वैत इत्यादि दर्शन शास्त्राविषयीं अहोरात्र चर्चा होत असे. ज्या ठिकाणीं सर्व त्यागी गुरुबंधूंनीं विधियुक्त विरजा होम करून, सर्व वासनांना आहुति देऊन ‘ अभयं सर्व भूतेभ्यो ”

इत्यादि वैदिक मंत्रांनीं शास्त्रोक्त संन्यासाश्रम स्वीकारला, त्या पावन जागेंत परत आल्यावर स्वामीजींना जो आनंद झाला असेल, आपल्या गुरुबंधूंना भेटण्यांत जो हर्ष वाटला असेल, तो अवर्णनीय व अनुपमेय होय ! तें स्थान सोडल्यापासून पुनः येईपर्यंत स्वामीजींना कसेकसे दिवस काढावे लागले, साता-समुद्रापलीकडे जाऊन त्यांनीं एक क्षणही वाया जाऊं न देतां सतत चार वर्षे मेहनत करून हिंदुधर्माची धवलकीर्ति किती उज्ज्वल केली हें सर्वांनीं पाहिलेंच आहे. पाश्चात्य राष्ट्रांतील पुढील कामगिरी चालविण्याकरितां प्रथम शारदानंदाना व नंतर अभेदानंदानां बोलावून नेलेंच होतें. ते विलायतेंत असतांनाच त्यांच्या उपदेशानें उत्साहित व उत्तेजित होऊन स्वामी अखंडानंदानीं शिक्षण-प्रसाराचें, अनाथाश्रम स्थापन करण्याचें वगैरे जनसेवेचीं कार्यें हातीं घेतलीं होतीं. रामावतारांत जसे मारुतीराय तसे रामकृष्णावतारांत रामकृष्णानंद एकनिष्ठेनें गुरुसेवा करीत होते. बाकीचे सर्व गुरुबंधू एक एक करून सर्व परिव्राजक होऊन निघून गेले. तरी गुरु महाराज भगवान श्रीरामकृष्णाची तसबीर ठेवून त्यांची पूजाअर्चादि सेवा करण्याची जबाबदारी यांच्यावर होती. त्यांची ती निष्ठा पाहून स्वामी विवेकानंद प्रसन्न झाले. मद्रासच्या बाजूला अशाच स्वामींची अवश्यकता आहे असें वाटून स्वामीजींनी रामकृष्णनंदाना कार्य करण्याकरतां तिकडे पाठविलें. स्वामी शिवानंदांना धर्मप्रचाराकरीतां लंकेंत पाठविलें. लोक समूहापासून अलिप्त राहून ध्यानधारणेंत राहणें एवढेंच आपलें कार्य असें त्यांना वाटत होतें; पण स्वामीजींनी मोठ्या कळकळीनें आपल्या गुरुदेवांचा चैतन्यजागृतीचा संदेश सर्व देशभर पसरविणें, सर्व जग ईश्वरस्वरूप असल्यानें लोकांच्या उन्नत्यर्थ झटणें हीच त्याची खरी सेवा, प्रत्येक नर हा नारायणरूप असल्यानें त्याची शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक उन्नति करणें हीच परमेश्वर सेवा, हाच खरा कालानुसार साधनमार्ग. हा मार्ग स्वामीजींनी शिवानंदाना पटवून दिला व त्यांना कार्योन्मुख केलें.

सन १८९९ सालीं ज्यानेवारी महिन्यांत स्वामीजींच्या पाश्चात्य शिष्यवर्गाच्या सहाय्यानें कलकत्याजवळ बेलूर ग्रामांत गंगातटाकीं विस्तृत जागा घेऊन इमारत बांधण्यांत आली. हेंच रामकृष्ण मिशनचे आद्य व प्रमुख केंद्रस्थान होय. ही आज सर्व देशांची, सर्व राष्ट्रांची, सर्व धर्मांची तीर्थभूमि म्हणून गणली जात आहे.

हिचें दर्शन घेण्यास रशिया, जर्मनी, पोलंड, अमेरिका, बेल्जम, इंग्लंड, ऑस्ट्रे-लिया इत्यादि दूर दूर देशांतून यात्रेकरू येथें येत असतात.

विश्वव्यापि, सर्वमान्य व अत्यंत सुसंघटित अशी मानली जाणारी रामकृष्ण मिशनची स्थापना १८९९ सालीं मेच्या पहिल्या तारखेस, श्रीरामकृष्णांच्या गृहस्थ शिष्यांत प्रख्यात असलेल्या बलरामबसूंच्या घरीं स्वामीजींनीं सर्व शिष्यांची सभा भरवून मिशनची कायदेशीरपणें स्थापना केली. संघाची आवश्य-कतां सर्वांना पटवून दिल्यानंतर भिन्नभिन्न जागावर योग्य माणसांची नेमणूक करण्यांत आली. त्यानंतर संघाच्या सोईकरतां व तीचा विस्तार होण्याकरतां स्वामीजींनीं सभासदांकरितां कांहीं नियम आंखून दिले. संघाला ' रामकृष्ण मिशन ' हें नांव देण्यांत आलें, 'आत्मनो मोक्षार्थ जगद्धितायच' हें संघाचें ब्रीद-वाक्य ठरविण्यांत आलें.

उच्च वेदांतधर्माच्या दुंदुभी प्रत्येक घरांत, खेड्यांत, उघड्या मैदानांत, भर-लेल्या बाजारांत सर्वत्र ऐकवाव्या हा स्वामीजीचा उद्देश या संस्थेच्या द्वारें कितपत सिद्धीस जातो अथवा जाईल, हें भारतीय तरुणांवरच अवलंबून आहे. सर्वसंग परित्याग करून जनताजनार्दनसेवेस आत्मसमर्पण करणाऱ्या तरुणांना भाषा-ज्ञान, कला, वाङ्मय, दर्शनशास्त्र व इतर शास्त्रें यांचें ज्ञान करून देणारें शिक्षण विद्यार्थ्यांच्या योग्यतेनुसार संस्थेकडून शक्य तेवढें दिलें जातें. महामारी, प्लेग, भूकंप, महापूर, मोठें वादळ, दाह, इत्यादि आपत्तींच्या वेळीं मदत करणें, गरीब दुबळ्या रोग्यांची शुश्रुषा करणें, त्यांना अन्नवस्त्र पुरविणें, अस्पृश्य म्हणून दडपल्या जाणाऱ्या अशिक्षित मागसलेल्या वर्गास शिक्षण देणें, अनाथ बालकां-च्या पोटापाण्याची व शिक्षणाची सोय लावणें, इत्यादि ज्या ज्या ठिकाणीं आपल्या ऐपतींप्रमाणें जनतेच्या सहाय्यानें मोक्षाचे साधन म्हणून ही संस्था जनताजनार्दनाची सेवा करीत असते. असो.

अनेक भाषा, नाना धर्म, नाना पंथ अशा अनेकपरीनें विभागून गेलेलें आपल्या वैभवशाली पूर्वसंस्कृतीला पारखें झालेलें हें राष्ट्र पुनः ऊर्जित स्थितीस आणण्या-करीतां जी योजना, जी कामगीरी ते करून गेले; ती करण्यास त्यांना किती शारी-रिक व मानसिक श्रम सोसावे लागले असतील याचा अजमास करूं जातां, 'जावें

त्याच्या वंशीं तेव्हां कळे' असे म्हणून त्या वीरपुरुषांच्या चरणीं नम्र होण्यावाचून गत्यंतर नाहीं. एकाकी असहाय्य होऊन छातीला बाण लागलेल्या सिंहाप्रमाणें पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत परिभ्रमण केल्यानें त्यांचें शरीर विगलित झालें, तरी शेवटपर्यंत विश्रांति माहिती नव्हती. ही त्यांची राष्ट्राविषयीं व लोककल्याणाविषयीं कळकळ, त्यांचें विश्वव्यापी प्रेम पाहिलें म्हणजे " हें विश्वचि माझे घर । ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जहाला ॥ मग याहीवरी पार्थां । माझ्या भजनीं आस्था । तरी तयातें मी माथां । मुगुटकरीं ॥ " या ज्ञानेश्वरांच्या ओव्या त्यांच्या ठिकाणीं अक्षरशः सार्थ झाल्या होत्या हें दिसून येईल. असो.

अतिप्रयासामुळें, कठोरतपस्येमुळें, जर्जरित झालेल्या तनूस जरा स्वस्थता यावी म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्यावरून हवा बदलण्यास स्वामीजी दार्जिलिंगला गेले होते. त्याचवेळीं १८९८ सालीं कलकत्यास भयंकर प्लेगच्या सांथीनें पछाडलें. सर्वत्र हाहाकार उडाला. ही बातमी स्वामीजींना पोंहचतांच ते लगेच निघून कलकत्यास आले, व आपल्या गुरुबंधु व शिष्यमंडळीसहित लोकसेवेंत अर्थात् औषधोपचार, त्यांची जागा, त्यांचे कपडे साफसूप करण्यांत गुंतले. "यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । " या न्यायानें स्वामीजींना या कामांत उतरल्याचे पाहून बरीच उत्साही तरुणमंडळीही तें काम करण्यास पुढें आली. स्वामीजींनीं हातीं घेतलेलें काम वाढतां वाढतां इतकें प्रचंड झालें कीं, हजारों लोकांची सेवाशुश्रुषा करण्यास लागणारा पैसा कोठून येईल ? कसा येईल ? याची पंचाईत पडूं लागली. एकानें स्वामीजींना विचारलें देखील. " स्वामिजी, पैशाची पंचाईत पडली म्हणजे एवढें मोठें काम कसें निभावेल ?" स्वामीजींनीं लगेच उत्तर दिलें, "कां ? जरुर पडली तर सारी मठाची जागा, इमारतदेखील विकून टाकीन. म्हणजे एक लाख रुपये तरी मिळतील. " पण ईश्वरेच्छेनें तशी कांहीं वेळ आली नाहीं. स्वामीजींनीं कार्य हातीं घेतलें आहे हें समजतांच लोकांकडून मदत होऊं लागली आणि कार्य उत्तम रीतीनें पार पडलें. त्यानंतर स्वामीजी पाश्चात्यमंडळींना घेऊन नैनितालला गेले. या गौरकाय शिष्यांना साऱ्या हिंदुस्थानभर तीर्थांतून, क्षेत्रांतून हिंडवून त्यांना भारतदेशाची भौगोलीक, ऐतिहासिक माहिती करून देऊन

स्थळ प्रत
ग्रं.........
ता.........

त्यांना हिंदुधर्माच्या प्रचलित स्वरूपाची ओळख करून दिली. आतां या मंडळींना साधनभजनादि करण्यास योग्य व निवांत जागा शोधून काढण्याच्या उद्देशानें त्यांना घेऊन स्वामीजी हिमालयपर्वतावर हिंडूं लागले. शोधतां शोधतां मायावतीची जागा पसंत पडून सेव्हियरसाहेबांच्या खर्चानें तेथें इमारत विकत घेण्यांत येऊन अद्वैताश्रम स्थापन करण्यांत आला.

हिंदुधर्माची उच्चतत्वें हल्लींच्या लोकांना पटतील, समजतील अशा सोप्या, सुंदर भाषेंत मांडावी म्हणून कलकत्यास 'उद्बोधन' मासिकपत्र बंगाली भाषेमध्यें काढले व मद्रासेंत 'ब्रह्मविद' पत्र इंग्रजींत काढलें. पण पुढें तें पत्र तिकडे निघण्यास बरीच अडचण पडूं लागल्यामुळें तें नांव बदलून "प्रबुद्ध भारता" च्या रूपानें मायावतीहून ते मासिक काढण्यांत आलें. "प्रबुद्ध भारत" चांगल्या योग्यतेस चढून सर्वांच्या स्तुतीस पात्र होत आहे. परराष्ट्रांतसुद्धां त्या मासिकाचा बराच खप आहे.

काश्मीर प्रांतांत जेव्हां स्वामीजी परिभ्रमणार्थ गेले होते, तेव्हां तेथें क्षीरभवानी मातेच्या दर्शनार्थ गेले. त्या देवीचे मंदिर मागें एकेकाळीं हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत इस्लामीधर्माच्या अनुयायांनीं उध्वस्त केलें होतें. तें मंदिर पुनः बांधण्यांत आलें नाहीं. देवीची मूर्ती एका चौरस तलावाच्या मध्यभागीं लहानशा देऊळींत आहे. वर्षांतून एकदां तिची यात्रा भरून त्या लहानशा तलावांत खंडोगणती दूध ओतलें जातें. स्थान मोठे जागृत आहे. तेथें गेल्यावेळीं स्वामीजींच्या मनांत आले कीं, "मातेचें मंदिर क्रूर मुसलमानांनी उध्वस्त करून टाकलें. मीं जर त्यावेळीं येथें असतों, तर त्यांचा बराच समाचार घेतला असता. मातेच्या मंदिराचे रक्षण केलें असतें." इतक्यांत एक आकाशवाणी झाली. "अरे, तूं माझें रक्षण करतोस कीं मीं तुझें रक्षण करते ? माझें मंदिर परधर्मीयांनी भ्रष्ट करून अथवा मोडून टाकलें, तरी त्यांत माझें काय जातें ? मला इच्छा होईल तेथें मीं पुनःसुवर्ण मंदिर उठवूं शकेन." त्याचप्रमाणें अमरनाथाच्या यात्रेला गेल्यावेळीं अमरनाथाच्या दर्शनानें स्वामीजींना त्या गुहेंत भावसमाधि लागली. प्रत्यक्ष अमरनाथ शिव आपल्या मस्तकावर बसले आहेत, असा अनुभव त्यांना आला. हा अनुभव सतत तीन दिवस टिकला.

त्यानंतर स्वामीजींनी वेलूर मठांत येऊन मंडळींना शिक्षण देण्याचें काम सुरूं केलें. परंतु प्रकृतीचें स्वास्थ जास्तच बिघडत गेल्यामुळें डॉक्टरांनीं पूर्ण विश्रांतिकरतां समुद्रप्रयाण करण्यास सांगितलें व स्वामीजींनी १८९९ च्या जून महिन्यामध्यें पुनः अमेरिकेस जाण्याचें ठरविलें. अमेरिकेंत त्यावेळीं फक्त स्वामी अभेदानंद होते. रामकृष्ण मिशनचें जोखमीचे काम सांभाळण्याकरतां स्वामी शारदानंदाना इकडे आणण्यांत आले होतें. अमेरिकेंत प्रचारकार्य करण्याकरतां आणखी मंडळी पाहिजे आहेत, अशीं पत्रें सारखीं येतच होतीं. या खेपेस स्वामीजींनीं आपल्याबरोबर स्वामी तुरयानंदाना घेऊन जाण्याचे ठरविलें. पण तुरयानंद महावैराग्यवान असून त्यांचा कल पूर्ण निवृत्तिमार्गाकडे. भोगासक्त पाश्चात्य राष्ट्रांत जाण्यास ते तयार होईनात ? तेव्हां जगताच्या दुःखानें विव्हल होऊन त्यांच्या दुःखविमोचनार्थ अनेक कष्ट सोसून क्षीण काया झालेले स्वामीजी गळीं पडून लहान बालकाप्रमाणें ओक्साबोक्सी रडूं लागले. 'हरीभाई, मीं एकटाच ठाकूर रामकृष्णांचे काम करितां करितां माझा हा देह सापळ्यासारखा झाला आहे. मीं आतां जास्त दिवस जगत नाहीं. तुह्मी सर्व गुरुभाई मला या ठाकूराच्या कार्यांत हातभार लावीत नसाल, तर कार्य अर्धवट टाकूनच मला जावें लागेल. " असे हरीभाईला ( तुरियानंदाचे पहिले नांव ) म्हणाले. तें ऐकून तुरियानंदानांही रडें आवरून धरणें शक्य नव्हतें. नंतर ते स्वामीजींना म्हणाले, "आजपासून तुम्हीं सांगाल तसें वागण्यास मीं तयार आहें," असें म्हणून स्तब्ध झाले.

नंतर स्वामीजी तुरियानंद व निवेदिता यांना बरोबर घेऊन अमेरिकेस गेले. त्यांच्या व्याख्यानानें व स्वामी अभेदानंद व शारदानंद यांच्या प्रवचनानेंहि बऱ्याच अमेरिकन मंडळींचें चित्त हिंदुधर्माकडे ओढलें गेलें. धर्माचें मर्म समजून घेऊन साधन भजन, ध्यानधारणा, भजन, शिकण्याच्या उद्देशानें स्वामीजीकडे आतां बरीच अमेरिकन मंडळी येऊं लागली. त्यांना धडे देण्याकरतां स्वामीजी कॅलिफोर्निया शहरांत राहीले.

पॅरिस शहरीं १९०० सालीं सर्वधर्मसभा भरली. पण अमेरिकेंत अशीच सभा भरवून आपला ख्रिस्ती धर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न १८९७ सालीं करण्यांत आला. ह्याचीं कडू फळें परिषदेच्या चालकांना

चाखावीं लागलीं. ख्रिस्तीधर्म श्रेष्ठ ठरला नाहींच, उलट हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ठ, व्यापक, व सर्व आधिभौतिक सिद्धांतांना पुरून उरणारा आहे, असें ठरवून आपलीच मंडळी हिंदुधर्माचा उजळ माथ्यानें स्वीकार करूं लागली. या खेपेस सर्वधर्मांचा ऐतिहासिक विचार करण्यांत यावा असें ठरवून पॅरिसमध्येंही सभा झाली. ह्या सभेसही हजर राहण्याकरतां स्वामी विवेकानंद पॅरिस शहरीं आले. त्या सभेंत त्यांनीं हिंदुधर्माची ऐतिहासिक माहिती श्रोतृवर्गाला करून दिली. त्यानंतर युरोपांत जाऊन मोठमोठ्या वैज्ञानिक व दार्शनिक पंडितांना भेटून भारतीय विचारांची विचारप्रणालिका पटवून दिली. नंतर कांहीं दिवस प्रचार करून स्वामीजी डिसेंबरमध्यें परत बेलूर मठांत आले.

कांहीं दिवस विश्रांति घेतल्यानंतर डाका, चंद्रनाथ, कामख्या, गोहाटी वगैरे स्थानें पाहून झाल्यानंतर बुद्धगया, काशी ह्या यात्रा करून स्वामीजी परत मठांत आले. दिवसेंदिवस शरीरस्वास्थ्य खालावूं लागलें; औषधोपचार व पथ्यावर राहूं लागले. वैद्याच्या सांगण्यावरून ग्रीष्मकाळ असतांनाही पाण्याचा एक बिंदूही पोटांत जाऊं दिला नाहीं. यावरून स्वामीजींचा मनोनिर्धार साधारणपणें अजमावतां येतो. " चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ! " हेंच सत्य स्वामीजींच्या जीवनचरित्रांत रेखाटलेलें आपल्याला दिसून येतें.

सन १९०४ सालीं जुलै ४ था तारखेस शुक्रवारीं त्यांना अंमळ बरें वाटत होतें. त्यादिवशीं बराच वेळ एकासनावर बसून त्यांनीं ध्यान केलें. शिष्य मंडळींना संस्कृतचा धडा दिला. संध्याकाळीं मठाच्या आवाराबाहेर बरेच दूर हिंडून आले. आपल्या खोलींत जाऊन वाहत्या गंगेकडे तोंड करून ध्यानस्थ बसले. हेंच तें ध्यान सिद्ध नरकेसरी–नरेंद्रमहाविवेकी—विवेकानंदाचें शेवटचें महाध्यान होय. त्याच रात्रीं देशकालाची मर्यादा ओलांडून, कार्यकारणाच्या अतीत असलेल्या " यद्गत्वा न निवर्तते " अशा त्या परम धामांत प्रविष्ट झाले. जीवन्मुक्त स्थितींतून विदेह मुक्त झाले. नर नारायणस्वरूपीं विलीन झाले. धन्य त्यांचें जीवन ! आणि धन्य त्यांचें चारित्र ! हिंदी तरुण त्यांच्या शिकवणीप्रमाणें कार्यास लागतील, तर लवकर आपले भारतराष्ट्र उन्नत होऊन इतर राष्ट्रांच्या गुरुस्थानीं विराजमान होईल. जगन्नियंता त्यांना तशी बुद्धि व सामर्थ्य देवो अशी त्याच्या चरणीं प्रार्थना करून हें छोटेसें चरित्र त्यांनाच अर्पण करतों.

# श्रीमत् स्वामी विवेकानंद-जीवनरहस्य.

या पृथ्वींत अलौकिगुणगणमंडित असामान्य व्यक्ति, देशकालपरत्वे दीर्घ-कालांतरानें कालप्रकट होत असतात. त्यांच्या अंगच्या प्रचंड सामर्थ्यामुळें ते राष्ट्राचे विहित मार्गदर्शक होतात. ते आपल्या जीवनदशेंत जातात, तेथें अद्भुत विचारक्रांति घडवून आणतात. असे महात्मे केव्हांही या जगांत विरळच असावयाचे. अशांनाच युगप्रवतक ही पदवी पूर्णपणें साजते. अशा युगप्रवर्तकांचि प्रतिभा अत्यंत उज्वल असते. त्यांच्या धारावाहक विचारशक्तींत व **अगम्य** क्रीयाशक्तींत पुढें राष्ट्रांत परिणत होऊन प्रकट होणाऱ्या स्थित्यंतराचें बीज असतें. त्यांची इच्छाशक्ति इतकी प्रबल व अमोघ असते कीं, जे जे आपल्या पूर्वपुण्याईनें अशा महात्म्यांच्या संपर्कांत येतात, त्यांच्या त्यांच्यांत सुप्तस्थितींत असलेल्या दैवीशक्तीचा उद्भव होतो, त्यांच्यांत दैवीशक्तीचा संचार होतो. ही दैवीशक्ति त्यांच्या मुखानेंच कार्य करूं लागते. म्हणून महापुरुषांचें जीवनचरित्र केवळ त्यांच्या जीवनकाळांत त्यांच्यांत प्रगट झालेल्या विचारांत व क्रियासामर्थ्यांतच लुप्त होत नसून पुढच्या पिढीच्या तरुणांत विशेष रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतें. याचकरितां अशा, युगप्रवर्तक महापुरुषांच्या चरित्रांची समालोचनें करणें अत्यंत कठीण. त्यांनीं संचरित केलेली प्राणशक्ति अजून किती हताश झालेल्यांना आशापूर्ण, व प्राणहीन झालेल्यांना सप्राण करील व त्यायोगें राष्ट्रांत अभिनव प्रकाश पाडील; अशीं महच्चरित्रें चिंतन करण्यास अत्यंत योग्य होत. अशा पवित्र चरित्रांच्या लेखनानें व पठणानें लेखक व पाठक दोघेही धन्य होतात. यांत दोघांचाही फायदा असतो.प्रत्येक राष्ट्राचें ध्येयही भिन्न असतें. युरोप, अमेरिका, इत्यादि पाश्चात्यराष्ट्रें भौतिक शास्त्रांत हल्लीं इतकीं गढून गेलेलीं दिसतात कीं, त्यांची संस्कृति आमच्या संस्कृतीहून पूर्व पश्चिम दिशांइतकी विरुद्ध दिसून येते. हिंदुस्थान वेदकाळापासून ब्रह्मवादांत गढून गेलेला दिसतो. आत्मवादामुळें भौतिक दृष्ट्या हीनता आली, तरी तिच्याकडे काणाडोळा करण्याची आमची प्रवृत्ति, तर पाश्चात्यांची जडवादामुळें पूर्ण नास्तिकपणा मिरविण्यांत धन्यता मानून घेण्याची प्रवृत्ति. खा, प्या, चैन करा हेंच त्यांचें ब्रीद वाक्य. "अनित्यम

स्थळ प्रत
नं. ........
ता. ........

सुखं लोकम् । इमम् प्राप्य भजस्व माम् ।" अथवा "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या । जीवो ब्रह्मैव नापरः ॥" हीं भारतीयांची ब्रीदवाक्यें. पाश्चात्य इहसर्वस्व म्हणजे इंद्रियसुखांतच धन्यता मानणारे व आम्हीं परसर्वस्व अतींद्रियसुखांत सुख मानणारे. पौर्वात्य व पाश्चात्य यांची मूळ मनोघटनाच एकमेकाहून विरुद्ध असल्यामुळें बहुतेक सर्व भौतिक शोध पाश्चात्यराष्ट्रांनीं घडविले व आध्यात्मिक शोध भरतखंडांतच लागले, हें सर्व प्रसिद्ध आहे. कर्मधर्मसंयोगानें हिंदी राष्ट्र हीनबल होऊन जेव्हां इंग्लंड व हिंदुस्थान यांचा राजा,-प्रजा असा संबंध जुळून आला, तेव्हां राजाचा अंमल प्रजेवर साहजिकच चालूं लागला. असें होतां होतां आर्यसंस्कृतीवर आंग्ल संस्कृतीचा पगडा बसूं लागला. आंग्लसंस्कृतीनें आपलें आपात मनमोहनरूप धारण करून भारतापुढें नाच करण्यास आरंभ केला; आपल्या पूर्ण कचाट्यांत आणून त्याला नेस्तनाबूत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारताची पूर्वपुण्याई फार मोठी म्हटली पाहिजे कीं, त्यानें पाश्चात्यसंस्कृतीच्या नटव्या फसवेगिरीला वेळींच ओळखलें, त्यानें आपल्या उच्च संस्कृतीची जाणीव पूर्णपणें बुजूं दिली नाहीं. आपल्या दृढ निश्चयापासून आपलें मन त्यांनें च्युत होऊं दिलें नाहीं. त्याला ऐन आणीबाणीच्या परीक्षेंत उत्तीर्ण होण्यास जें धैर्य, जी बुद्धिमत्ता, जी दैवीशक्ति पाहिजे होती, ती स्वामी विवेकानंदाच्या रूपानें १९ व्या शतकाच्या शेवटीं प्रकट झाली. या अलौकिक व्यक्तींत प्राच्य व पाश्चात्य दोन्ही संस्कृतींचा सुंदर मिलाफ झाला होता. दोघांमध्यें अनंतकाळापासून विरोध असला, तरी जगाच्या दृष्टीनें दोन्ही संस्कृतींचें मधुर मीलन होणें अत्यावश्य होतें, तें ईश्वरी संकेताप्रमाणें स्वामीजींच्या रूपानें घडून आलें. कोणत्याही राष्ट्राचा विशेष कल कोणत्याहि एकाच शास्त्राकडे असला म्हणजे त्याहून अन्य शास्त्राच्याबाबतींत केव्हांही तें अपूर्णच असणार. अर्थात् एकाच बाजूनें त्याची उन्नति होणार; पण तसे झाल्यानें त्याची सर्वांगीण उन्नति होणें दुरापास्त होय. म्हणून सर्व राष्ट्रांची सर्वांगीण उन्नति होण्याकरतां प्रत्येक राष्ट्रानें आपल्याच तोऱ्यांत राहण्याचा एकलकोंडेपणा सोडून देऊन, इतर राष्ट्रांशीं सलोख्यानें, सहानुभूतीनें व उदार मित्रभावानें वागण्यास शिकलें पाहिजे. असें केल्यानेंच आपल्या मिळकतीचा फायदा इतर राष्ट्रांना तें देण्यास तयार होईल व 'देवाण व घेवाण' या प्रकृतीच्या कायद्याप्रमाणें इतर

राष्ट्रांपासूनहि त्यांच्या मिळकतीचा व ज्ञानाचा फायदा त्याला होऊन, त्यांचेंही कल्याण होईल. इतर पूर्वशतकांपेक्षां १९ व्या शतकांत भरतखंड व इतर राष्ट्रांचा संबंध सर्वतोपरि विशेष निकट झाला होता. इतर राष्ट्रें आपापल्यापरि जगाच्या ज्ञानांत भर टाकण्याचा व स्वतःची किंमत इतर राष्ट्रांत वाढविण्याचा अटोकाट प्रयत्न करीत होतीं. तेव्हां हिंदी राष्ट्राला इतरांच्या तोंडाकडे केवळ केविलवाण्या नजरेनें पहात बसणें शोभत तर नव्हतेंच, पण शक्यहि नव्हतें. इतर राष्ट्राप्रमाणें हिंदी राष्ट्रांतही जीव आहे. इतर राष्ट्रांपासून आधिभौतिक शास्त्रांचें ज्ञान संपादन करण्याचा पूर्ण अधिकार जसा त्यास आहे, तसेंच त्याच्या अंगीं इतर राष्ट्रांना त्यांच्या दानाहून अमोलिक, अत्यवश्य, निरतिशय आनंदायी अशा इतर सर्व ज्ञानाहून श्रेष्ठ अशा 'आत्मज्ञानाचें' दान देण्याचें सामर्थ्य अजून पूर्वी सारखेंच आहे. हें त्यानें भगवान श्रीरामकृष्ण व श्रीमत्स्वामी विवेकानंद या अद्भुत जोडीला या भारत देशांत अवतार घेण्यास लावून सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिलें. या बाबतींत हिंदी राष्ट्र इतर सर्व राष्ट्रांना गुरुस्थानींच केव्हांही असणार, हें १८९३ साली चिकागो येथें भरलेल्या सर्वधर्मपरिषदेंत स्वामी विवेकानंदानीं सिद्ध केल्याचें आतां जगप्रसिद्धच आहे. त्या प्रसंगाचे हृदयंगम वर्णन स्वामीजींची शिष्या भगिनी निवेदिता यांनीं स्वामीजींच्या समग्र ग्रंथास जोडलेल्या प्रस्तावनेंत केलें आहे, तें जिज्ञासूंनीं समग्र वाचावें. त्याची किंचित कल्पना यावी ह्मणून त्यांतला खालील उतारा वाचकांस सादर करतों.

"आपल्या धर्माहून उच्च धर्म नाहीं ही कल्पना त्यांस ( तेथें जमलेल्या श्रोतृसमूहास ) एका बाजूस ओढीत असतां, कुतूहल त्यांस दुसऱ्या बाजूस ओढीत होतें. स्वामीजी आपणांस नवीन असें काय सांगणार तें ऐकण्यास त्यांच्या पुढील श्रोतृगण अत्यंत उत्सुक झालेला दिसत होता. स्वामीजी समोर अशा प्रकारचा श्रोतृसमूह असतां त्याचवेळीं त्यांच्या पाठीमागें अत्यंत शांत व ज्ञानानें तृप्त झालेला असा प्राचीन ऋषिसमूह होता. हा समूह केवळ चैतन्यरूप असल्यामुळें अर्थातच बाह्य नेत्रांस गोचर होत नव्हता. हा चैतन्यसागर अत्यंत प्राचीन आहे; इतका कीं, त्याच्या तुलनेनें बौद्धधर्महि परवांचा असें म्हणतां येईल. या सागरस्वरूप सनातन धर्मांत अनेक शाखा आणि पंथ यांचा समावेश झाला आहे. थोडक्यांत

या पृथ्वींत अलौकिक गुणगणमंडित असामान्य व्यक्ति, दीर्घकालांतरानें प्रकट होतात. त्यांच्या अंगच्या प्रचंड सामर्थ्यामुळें ते राष्ट्राचे विहित मार्गदर्शक होतात. ते आपल्या जीवनदशेंत जातील तेथें अद्भुत विचारक्रांति घडवून आणतात. असे महात्मे केव्हांही या जगांत विरळच असावसाचे! अशानांच युगप्रवर्तक ही पदवी पूर्णपणें साजते. अशा युगप्रवर्तकांची प्रतिभा अत्यंत उज्वल असते. तिचा विकास सर्वतोमुखी असतो. त्यांच्या धारावाहक विचार-शक्तींत व अद्भुत क्रियाशक्तींत पुढें राष्ट्रांत परिणत होऊन प्रगट होणाऱ्या स्थित्यंतराचें बीज सामावलेलें असतें. त्यांची इच्छाशक्ती इतकी प्रबल व अमोघ असते कीं, जे जे आपल्या पूर्वपुण्याईनें अशा महात्म्यांच्या संपर्कात येतात, त्यांच्या त्यांच्यांत सुप्तस्थितींत असलेली दैवीशक्ति जागृत होते. त्यांच्यांत दैवीशक्तीचा संचार होतो. ही दैवीशक्ति त्यांच्या मुखानेंच कार्य करूं लागते. म्हणून महापुरुषांचें जीवनचरित्र केवळ त्यांच्या जीवनकाळांत त्यांच्यांत प्रकट झालेल्या विचारांत व क्रियासामर्थ्यांतच शेष होत नसून पुढच्या पिढीच्या तरुणांत विशेष रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतें. याच करितां अशा युगप्रवर्तक महापुरुषांच्या चरित्राची समालोचना करणें अत्यंत कठीण! त्यांनीं संचारित केलेली प्राणशक्ति अजून कितीतरी हताश झालेल्यांना आशापूर्ण, व प्राणहीन झालेल्यांना सजीव करील व त्यायोगें राष्ट्रांत अभिनव प्रकाश पावेल हें कोणी सांगावें? अशीं महच्चरित्रेंच चिंतन करण्यास अति योग्य, अत्यंत वर्णनीय व महदुपकारी होत! अशा पवित्र चरित्रांच्या लेखनानें व पठणानें लेखक व पाठक दोघेहीं धन्य होतात. यांत दोघांचाही फायदा असतो. प्रत्येक राष्ट्राचें वैशिष्ट्य त्याच्या संस्कृतीवर अवलंबून असतें. पाश्चात्य राष्ट्रें भौतिकशास्त्रांत हल्लीं इतकीं गढून गेलेलीं दिसतात कीं, त्यांची संस्कृति आमच्या संस्कृतीहून पूर्व-पश्चिम दिशाइतकीच विरुद्ध दिसून येते. हिंदुस्थान वेदकाळापासून ब्रह्मवादांत गढून गेलेला दिसतोः आत्मवादामुळें भौतिकदृष्ट्या हीनता आली तरी तिच्याकडे कानाडोळा करण्याची आमची प्रवृत्ति, तर जडवादामुळें पूर्ण नास्तिकपणा मिरविण्यांत धन्यता मानून घेण्याची पाश्चात्यांची प्रवृत्ति. खा, प्या, चैन करा, हेंच त्यांचं ब्रीदवाक्य! "अनित्यमसुखं लोकम्। इमम् प्राप्य भजस्व माम्।" अथवा "ब्रह्मसत्यं

जगन्मिथ्या । जीवो ब्रह्मैव नापरः ॥" हीं भारतीयांचीं ब्रीदवाक्यें ! पाश्चात्य इहसर्वस्व, म्हणजे इंद्रियसुखांतच धन्यता मानणारे व आम्ही परसर्वस्व अतींद्रिय सुखांतच सुख मानणारे. पौर्वात्य व पाश्चात्य यांची मूळ मनोघटनाच एकमेकाहून विरुद्ध असल्यामुळें, बहुतेक सर्व भौतिकशोध पाश्चात्य राष्ट्रांनीं लावले व आध्यात्मिक शोध भरतखंडांतच लागले हें सर्व प्रसिद्ध आहे. कर्मधर्म-संयोगानें हिंदीराष्ट्र हीनबल होऊन जेव्हां इंग्लंड व हिंदुस्थान यांचा राजा–प्रजा असा संबंध जुळून आला, तेव्हां राजाचा अंमल प्रजेवर साहजिकच चालू लागला. असें होतां होतां, आर्यसंस्कृतीवर आंग्लसंस्कृतीचा पगडा बसू लागला. आंग्लसंस्कृतीनें आपलें आपाद मनमोहनरूप धारण करून भारतापुढे नाच करून आपल्या पूर्ण कचाट्यांत त्याला आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारताची पूर्वपुण्याई फारच मोठी म्हटली पाहिजे कीं, त्यानें पाश्चात्य संस्कृतीच्या नटव्या फसवेगिरीला वेळींच ओळखलें. त्यानें आपल्या उच्च संस्कृतीची जाणीव पूर्णपणें बुजूं दिली नाहीं. आपल्या दृढनिश्चयापासून आपलें मन त्यानें च्युत होऊं दिलें नाहीं. त्याला ऐन आणिबाणीच्या परिक्षेंत उत्तीर्ण होण्यास जें धैर्य, जी बुद्धीमत्ता, जी दैवीशक्ति पाहिजे होती, ती **स्वामी विवेकानंदांच्या** रूपानें १९ व्या शतकाच्या शेवटीं प्रकट झाली. या अलौकिक व्यक्तींत प्राच्य व पाश्चात्य दोन्ही संस्कृतीचा सुंदर मिलाफ झाला होता. दोघांमध्यें अनंतकाळापासून विरोध असला तरी जगाच्या दृष्टीनें दोन्ही संस्कृतींचें मधुरमिलन होणें अत्यावश्य होतें. तें ईश्वरी संकेताप्रमाणें स्वामीजींच्या रूपानें घडून आलें. कोणत्याही राष्ट्राचा विशेष कल कोणत्याहि एकाच शास्त्राकडे विशेष असला म्हणजे त्याहून अन्य शास्त्राच्या बाबतींत केव्हांहि तें अपूर्णच असणार. अर्थांत एकाच बाजूनें याची उन्नती होणार. पण तसें झाल्यानें त्याची सर्वांगीण उन्नति होणें दुरापास्त होय. म्हणून सर्व राष्ट्रांची सर्वांगीण उन्नति होण्याकरितां प्रत्येक राष्ट्रानें आपल्याच तोऱ्यांत राहण्याचा एकलकोंडेपणा सोडून देऊन इतर राष्ट्रांशीं सलोख्यानें सहानुभूतीनें व उदार मित्रभावानें वागण्यास शिकलें पाहिजे. असें केल्यानेंच आपल्या ज्ञानाचा फायदा इतर राष्ट्रांना तें देण्यास तयार होईल, व 'देवाण व घेवाण' या प्रकृतीच्या कायद्याप्रमाणें इतर राष्ट्रांपासूनहि त्यांच्या मिळकतीच्या व ज्ञानाचा फायदा त्याला होऊन

त्याचेंहि कल्याण होईल. पूर्व शतकांपेक्षां १९ व्या शतकांत भरतखंडाचा व इतर राष्ट्रांचा संबंध सर्वतोपरि विशेष निकट झाला होता. इतर राष्ट्रें आपआपल्यापरि जगाच्या ज्ञानांत भर टाकण्याचा व स्वतःची किंमत इतर राष्ट्रांत वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतीं. तेव्हां हिंदी राष्ट्राला इतरांच्या तोंडाकडे केवळ केविलवाण्या नजरेनें पहात बसणें शोभत तर नव्हतेंच, पण शक्यहि नव्हतें. इतर राष्ट्राप्रमाणें हिंदी राष्ट्रांतही जीव आहे, इतर राष्ट्रांपासून आधिभौतिक शास्त्राचें ज्ञान संपादन करण्याचा पूर्ण अधिकार जसा त्यास आहे, तसेंच त्याच्या अंगीं इतर राष्ट्रांना त्यांच्या दानाहून अमौलिक, अत्यवश्य, निरतिशय आनंदायी अशा इतर सर्वज्ञानाहून श्रेष्ठ अशा ' आत्मज्ञानाचें ' दान देण्याचें सामर्थ्य अजून पूर्वींसारखेंच आहे, हें त्यानें भगवान श्रीरामकृष्ण व श्रीमत्स्वामी विवेकानंद या अद्भुत जोडीला या भारत देशांत अवतार घेण्यास लावून सर्व जगाच्या निर्दशनास आणून दिलें. या बाबतींत हिंदीराष्ट्र इतर सर्व राष्ट्रांच्या गुरुस्थानींच केव्हांही असणार, हें १८९३ सालीं शिकागो येथें भरलेल्या सर्वधर्म-परिषदेंत स्वामी विवेकानदांनीं सिद्ध केल्याचें आतां जगप्रसिद्ध आहे. त्या प्रसंगाचें हृदयंगम वर्णन स्वामिजींची शिष्या भगिनी निवेदिता यांनीं स्वामिजींच्या समग्र ग्रंथास जोडलेल्या प्रस्तावनेंत केलें आहे, तें जिज्ञासूंनीं समग्र वाचावें. त्याची किंचित्कल्पना यावी ह्मणून त्यांतला खालील उतारा वाचकांस सादर करतों.

" आपल्या धर्माहून उच्च धर्म नाहीं; ही कल्पना त्यांस ( तेथें जमलेल्या श्रोतृसमूहास ) एका बाजूस ओढीत असतां, दुसऱ्या बाजूस कुतूहल ओढीत होतें. स्वामीजी आपणांस नवीन असें काय सांगणार, तें ऐकण्यास त्यांच्या पुढील श्रोतृगण अत्यंत उत्सुक झालेला दिसत होता. स्वामीजींच्या समोरच्या बाजूस अशा प्रकारच्या श्रोतृसमूह असतां त्याचवेळीं त्यांच्या पाठीमागें अत्यंत शांत व ज्ञानानें तृप्त झालेला असा प्राचीन ऋषीसमूह होता. हा पाठीमागचा समूह केवळ चैतन्यरूप असल्यामुळें अर्थातच नेत्रांस गोचर होत नव्हता. हा चैतन्यसागर अत्यंत प्राचीन आहे. तो इतका कीं, त्यांच्या तुलनेनें बौद्धधर्महि परवांचा असें ह्मणतां येईल. या सागरस्वरूप सनातनधर्मांत अनेक शाखा आणि पंथ यांचा समावेश झाला आहे. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं,

स्वामिजींच्या पाठीमागें सहस्रावधि वर्षांचा ज्ञानवृद्ध आणि तपोवृद्ध असा भारतीय राष्ट्रपुरुष उभा होता. दोन चैतन्यसागर तेथें एकमेकांस भेटूं पहात होते. अत्यंत प्राचीन व अत्यंत अर्वाचीन संस्कृतीचा संगम होण्याची ती वेळ होती. आणि हें कार्य स्वामिजींच्या हस्तें व्हावयाचें, या ईश्वरी संकेताची तेथें पूर्तता होत होती. ”

स्वामीजींच्या उज्वल चरित्रांत घडून आलेल्या अनेक घटना जणूं काय अभिनव दर्शनग्रंथाची सामुग्रीच म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या विषयीं लिहितांना एके ठिकाणीं श्री. शशिभूषण घोष यांनीं असें म्हटलें आहे कीं, “ त्यांचें जीवन, वर्तमान जगताचें सूत्राकार दर्शन व भविष्यत् जगत्, त्यांच्या जीवनाचें भाष्य व त्यांच्या जीवनाचें उपादान हें सर्व अशा दर्शनग्रंथास साजेसेंच होतें. ” हें वर्णन किती अर्थपूर्ण आहे ?

त्यांचें लालनपालन पाश्चात्य संस्कृतीची जी साक्षात्क्रीडाभूमि कलकत्ता शहर तेथें झालें. त्यांचें शिक्षण आंग्ल भाषेंत झालें. हक्सले, कँट, स्पेनर यांचा पूर्ण परिचय करून घेऊन संस्कृतीची सांगोपांग माहिती मिळविली. तेथल्या नामांकित विद्वान व्यक्तींना भेटून त्यांच्याशीं विचारविनिमय केला. आपल्या परिपक्व बुद्धीच्या साहाय्यानें त्यांच्या बऱ्या वाईट बाजूंची त्यांनीं शहानिशा केल्यामुळें पाश्चात्य संस्कृतीची त्यांना पूर्ण ओळख झाली. त्याप्रमाणें त्यांचें बालसंगोपन, दयाळू, धर्मपरायण, सत्यनिष्ठ व करारी अशा भुवनेश्वरीमातेनें केलें. तारुण्यांत त्यांचें मन चिकित्सक धर्माचा पिच्छा पुरवूं लागलें. पूर्वसंचितामुळें धर्ममूर्ति वेदप्राण **सर्व धर्मसमन्वयावतार श्रीरामकृष्ण परमहंस** यांच्या पदकमलांचा आश्रय त्यांना मिळाला. अशा अपूर्व गुरुदेवांचा वरदहस्त त्यांना लाभला. त्यांच्या अद्भुत प्रेमाची जोड त्यांना लाभली. त्यांच्या अश्रुतपूर्व सिद्धसाधनांचा अगाध ठेवा त्यांच्या निःसीम प्रेमानें स्वामीजींच्या हस्तगत झाला. परिव्राजकावस्थेंत अनेक साधुसंतांचें व तीर्थक्षेत्रांचें त्यांनीं यथेच्छ दर्शन घेतलें; सर्व दर्शनग्रंथाचा आपल्या तीक्ष्ण बुद्धिनें विवेचक अभ्यास केला; खडतर साधना–तपस्या बळानें धर्मगिरीच्या उत्तुंग अशा ब्रम्हशिखरीं ते आरुढ झाले. लोकोद्धारार्थच त्यांचा जन्म होता. लोकसंग्रह हेंच एक त्यांचें कार्य होतें. लोकांना मार्ग दाखविण्याकरितांच ते या लोकीं आले होते. अंधभक्ति, भोळा

मराठी ग्रंथ संग्रहालय

विश्वास, फाजील स्तोम माजविण्याची साहाजिक प्रवृत्ति यांना साफ झुगारून निर्भेळ सत्य विवेचक दृष्टीनें स्वामीजींच्या अलौकिक जीवनाचा, त्यांच्या शक्तीचा, प्रतिभेचा, अध्यात्मिक अनुभवाचा, तेजाचा व त्यांच्या झालेल्या कार्याचा, विचार केल्यास तेच एक ' युगाचार्य ' या पदवीस पात्र ठरतील. त्यांचे विचार किती उदार, जीवन किती उदात्त ? हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्वाचा पाया धर्माच्या आधारावरच प्रस्तुत काळांत कसा घालतां येईल हें त्यांनीं दाखविलें. त्यांच्याच जीवनांत धर्मप्राण अशा या भरतखंडाच्या राष्ट्रीय जीवनाचें बीज पेरलें गेल. तेंच बीज आतां त्यांच्या देहावसानानंतर विस्तृत वृक्षरुपानें परिणत झालेलें दृष्टीस पडतें. पौर्वात्य व पाश्चिमात्य तात्विक दर्शनशास्त्राचें विवेचक व तुलनात्मक ज्ञान, त्यांनीं आपल्या अलौकिक बुद्धीनें आपलेसें करून घेतलें. पूर्णावतार सद्गुरूंच्या कृपाप्रसादानें निर्विकल्प समाधिपर्यंत आत्मानुभवाची मजल मारली. पूर्व पश्चिम गोलार्धात प्रवास करून व्यावहारिक ज्ञानांतही पूर्णता संपादन केली. या विविध ज्ञानौषधीपासून आपल्या उज्वल प्रतिभेच्या साहाय्यानें सर्व जगाचा त्रिताप हरण करणारी दिव्यज्ञान गुटिका निर्माण केली. त्यांच्या स्फुर्तिदायक ग्रंथांत, त्यांच्या दैवी वाणींत ही शक्ति आहे कीं नाहीं याबद्दल प्रत्येक तरुणानें तिचें पथ्यपूर्वक सेवन करून ध्यावीं. विशेषतः भारतीय तरुणांनीं या अमृत गंगेमध्यें निमज्जन करून तिचें यथेष्ट पान करून आळशावर आलेल्या या गंगेचा पूर्ण फायदा ध्यावा ह्मणजे त्यांचा स्वतःचा उद्धार होऊन जगाचेंही हीत साधण्याचा खरा मार्ग त्यांना स्पष्ट दिसेल.

स्वामीजींची देशभक्ति पराकाष्ठेची होती. हल्लींच्या राष्ट्रीय भावनेचा उगम त्यांच्या स्वदेशाबद्दलच्या उत्कृष्ट प्रेमांत दिसून येतो. त्यांच्या प्रत्येक प्राणस्पंदनाबरोबर राष्ट्रीय भावनेचा प्रचंड प्रवाह त्यांच्या शरिरांतून बाहेर निघत असे. देशाकरतां त्यांनीं आपले प्राण वेंचले, देशाच्या चिंतनांत दिवसाचे दिवस व रात्रीच्या रात्री घालीवल्या. अमेरिकेंत असतांना स्वामींजींना एका अमेरिकन नवकोटनारायणानें आपल्या घरचा पाहुणचार घेण्याकरतां अभ्यर्थना केल्यावरून स्वामीजी त्याच्या घरीं गेले. जेवणखाण आटोपल्यावर त्या रात्रीं आपल्या महनीय अतिथीकरितां अतिसुंदर मौल्यवान् चीजांनीं सुशोभित केलेल्या शयनगृहांत त्या गृहस्थानें बिछाना तयार करविला. फारच सुंदर शोभायमान अशा पलंगावर

परांच्या उंच उंच अतिमऊ गाद्यागिर्द्याची भपकेदार शय्या स्वामी महाराजां-करितां तयार करण्यांत आली होती. अशा चैनीबाज सुखशय्येवर निजण्या-करतां कित्येक विषयीं लोक, धनिक युवक, वृद्ध, श्रीमान्, विद्वान, मूर्ख लाळ-घोटीत असतात. पण देशगतप्राण स्वामीजींना ह्या शय्येवर अंग टाकतांच विंचवानीं नांगी मारल्यासारख्या वेदना झाल्या; त्यांच्या दृष्टीपुढें हीनदीन झालेल्या आपल्या मायभूमीचें चित्र खडे राहिलें; तिच्या बद्दलच्या विचा-रानें त्यांच्या डोक्यांत काहूर माजलें; त्यांच्या डोळयांतून अश्रुधारा वाहूं लागल्या; त्या पुण्याश्रुप्रवाहानें त्या खोलीतली जमीन सर्व भिजून गेली. स्वामीजी त्या एकांतांत मध्यरात्रीच्या वेळीं बिछाना सोडून खालीं जमि-नीवर लोळूं लागले. श्रीजगदंबा कालीमातेला आळवून स्फुंदू लागले. " माते काय ही अमेरिकन लोकांची श्रीमंती ? भरतखंडाच्या लोकांच्याच वाट्याला मात्र असें अठराविश्वे दारिद्र्य कां ? माझ्या देशबांधवांना चांगले दिवस केव्हां येतील ? " स्वामीजींची स्वदेशभक्तीची व्याख्या व तिच्याबद्दलचे त्यांचें स्वतःचें विवेचन त्यांच्या समग्र ग्रंथांत जागोजागीं दिसून येतें. त्यांतल्यात्यांत मद्रासमध्यें दिलेल्या एका व्याख्यानांत ग्रथित झालेले विचार फारच परिणाम-कारक असल्यामुळें सबंध उतारा देतों. हा उतारा भारतीय तरुणांना नित्य-पाठांत ठेवण्यालायक आहे. सोन्याच्या पत्र्यावर हिऱ्याच्या भरींव अक्षरांनीं लिहिल्यानें त्याचें खरें चीज होईल असें मला वाटत नाहीं, तरी तरुण पवित्र अलांछित अंतःकरणावर चिन्मय अक्षरांनीं जेव्हां हा उतारा खोदला जाईल, तेव्हांच त्याचें खरें चीज होईल. हा उतारा " भावी कार्याची रूपरेषा " या व्याख्यानाचा शेवटचा भाग होय. ( कर्नाटक प्रिंटींग प्रेस, खंड ४ था. )

"देशभक्ति हा शब्द सध्यां आपल्या बराच परिचयाचा झाला आहे. याचा घोष बऱ्याच ठिकाणाहून आपल्या कर्णपथावर येत असतो. देशभक्ति मलाही प्रिय आहे, आणि देशभक्तिची खरी व्याख्या काय, याचाहि थोडा बहुत विचार मी आपल्या मनाशीं केला आहे. जगांत ज्याला कांहीं पुरुषार्थ संपादा-वयाचा आहे त्याला तीन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे अंतःकरण जागृति ही होय. अमूक गोष्ट करावीशी वाटली तर त्या वाटण्याचा उमाळा थेट अंतःकरणाच्या तळापासून निघाला पाहिजे. अशा कामीं विवेचक

बुद्धि लंगडी आहे. अमूक एक गोष्ट केवळ विवेचक बुद्धीला पटली म्हणून ती करावयाची असें होतां कामा नये. कारण बुद्धीचा प्रदेश फार आकुंचित आहे. याकरितां कोणत्याही कार्याला अंतःकरणांत खरा उमाळा उत्पन्न झाला तर कार्याची सहज स्फूर्ती निर्माण होते. खऱ्या प्रेमाच्या उभाळ्याचा जोर असा विलक्षण आहे कीं, अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही सहजासहजी होऊन जातात. या विश्वांत जीं अनंत रहस्यें भरलीं आहेत, त्या साऱ्यांच्या किल्या एका प्रेमाच्या, भक्तीच्या हातीं सांठविलेल्या आहेत. माझ्या भावी सुधारक बंधूंनो, प्रथम अंतःकरणें जागृत करा. माझ्या प्रीय देशभक्तांनो, तुम्हीही प्रथम अंतःकरण-जागृतीच्या मागें लागा. तुह्मी तोंडानें ज्या कांहीं गोष्टीं बोलतां त्यांचा प्रतिध्वनीं तुमच्या अंतःकरणांच्या खोल दरींत कोठेंतरी उठत आहे काय ? देवाचें आणि ऋषीचें वंशज आज पशूंच्या राज्यांत सामील व्हावयास योग्य झाले आहेत असें तुह्मांस खरोखर वाटतें काय ? लक्षावधीं लोकांच्या पोटाच्या दामढ्या वळल्या आहेत, याबद्दल तुमच्या अंतःकरणाला थोडातरी ओलावा येतो काय ? कित्येक शतकें लक्षावधीं लोक एकसारखे कंगाल स्थितींत राहिले आहेत, याबद्दल तुमच्या अंतःकरणाला कांहीं द्रव येतो काय? काळ्याकुट्ट ढगांनीं आकाश भरलें ह्मणजे ज्याप्रमाणें उदासीन अंधकार सर्वत्र पसरतो, त्याप्रमाणें आज्ञानाच्या उदासीन काळोखांत आमची मातृभूमी बुडून राहिली आहे, याबद्दल तुमच्या अंतःकरणांत कांहीं कालवाकालव होते काय ? या साऱ्या परीस्थितीमुळें तुमच्या अंतःकरणांत विलक्षण अस्वस्थता उत्पन्न होते काय ? यामुळें तुमचीं कधीं झोपमोड झाली आहे काय ? या साऱ्या स्थितीची कहाणी तुमच्या रक्तांत भिनून साऱ्या देशभर फिरत आहे काय ? तुमच्या हृदयाच्या प्रत्येक ठोक्याबरोबर या दुर्दैवाच्या कहाणीचा ध्वनी उमटत आहे काय ? अद्यापि तरी तुम्ही जवळ जवळ वेडे होण्याच्या मार्गास लागला आहां काय ? आपल्या मातृभूमीच्या अवनतिशिवाय बाकीच्या साऱ्या कल्पना तुह्मीं विसरला आहां काय ? कीर्ति, बायका-पोरें, घरदार, फार काय प्रत्यक्ष्य देह सुद्धां तुम्ही विसरलां आहां काय ? तुम्हास या साऱ्यांचा पुरा विसर पडला आहे काय ? तुह्मांस देशभक्त व्हावयाचें असेल तर त्या मार्गांतलीं ही पहिली पायरी; पण ही अगदीं पहिलीच पायरी आहे हें विसरूं नका. महाधर्मपरि-

षदेंत भाषण करावें ह्मणून मी अमेरिकेस गेलों नाहीं. हें तुम्हांपैकीं पुष्कळांस ठाऊक असेल. पण माझ्या छातींवर आतांच सांगितलेल्या विचारांचें विलक्षण दडपण पडलें होतें, आणि तें कमी करण्याचा कांहीं उपाय पहावा म्हणून मी देशांतर केलें. हिंदुस्थानांत बारा वर्षें मी फिरलों. या अवधींत माझ्या देशबांधवांच्या उपयोगीं पडण्याचा कांहीं मार्ग मला दिसेना. हा मार्ग शोधण्यासाठीं मी अमेरिकेस गेलों. त्यावेळीं मला जे ओळखीत होते, त्यांना ही गोष्ट खास आठवत असेल. महाधर्मपरिषदेची पर्वा मला काय आहे ? माझ्याच हाडामासांचे माझे बांधव प्रत्येक दिवशीं अधिकाधिक खालीं जात आहेत; हें पाहात असतां अमेरिकनांसंबंधी नुसता विचारही माझ्या चित्तांत येणार नाहीं. मी अमेरिकेला गेलों त्याचें खरें कारण हें आहे. तिकडे जाण्यास माझ्या कार्याची पहिली पायरी मी चढलों. याकरितां अंतःकरणाची तयारी प्रथम पाहिजे, पण सध्या नुसती बडबड करण्यांत जो कालाचा अपव्यय तुम्ही करीत आहां, त्यापेक्षां चालू स्थितींत बदल पाडण्याचा एखादा प्रत्यक्ष मार्ग तुम्ही शोधून कां काढीत नाहीं ? आपल्या देशबांधवांचीं अंतःकरणें दुःखाच्या डागण्यांनीं पोळलीं आहेत, हें पाहून त्यांजवर अपशब्दाचे आणखी डाग देण्यापेक्षां गोड शब्दांनीं त्यांचें सांत्वन करणें हें युक्त नाहीं काय ? मृत्यूच्या दाराशीं बसलेल्या आपल्या बांधवावर तरवार उगारण्यापेक्षां त्यांना हातीं धरून जीवंत सृष्टींत परत आणणें तुम्हांला बरें वाटत नाहीं काय ? नुसती शब्दांचीं रणें माजविण्यापेक्षां असें करण्याचा प्रत्यक्ष मार्ग तुम्हीं शोधून का काढूं नये ? इतकें तुम्ही केलें तर तुमचे घोडे गंगेंत न्हाले असें तुम्ही समजूं नका ? पर्वतप्राय अडचणीही उल्लंघून जाण्याची तुमची तयारी आहे काय ? सारें जग हातीं तलवार घेऊन ऊभें राहिलें तरी आपल्या चित्ताला जें बरें वाटेल तेंच करण्याची तुमची तयारी आहे काय ? बायकोपोरांनीं सोडलें, घरादाराचें वाटोळें झालें, कीर्ति बुडाली आणि भीक पदरीं पडली, तरी स्वतःच्या अंतःकरणानें प्रवृत्तीलाच चिकटून बसावयाची छाती तुम्हास आहे काय ? अव्यभिचारी भक्तींत अंतर पडूं द्यावयाचें नाहीं, असा तुमचा दृढ निश्चय आहे काय ? राजा भर्तृहरी म्हणतो, " वानोत निंदोत सुनीतिपंथ । चलो असो वा कमलागृहांत । हो मृत्यु आजींच घडो

युगांती । सन्मार्ग टाकोनि भले न जाती'' ॥ हें भलेपण तुमच्या आंगीं दृढ झालें आहे काय ? हे गुण तुमच्या आंगीं खरोखर बाणले असतील, तर तुमच्यापैकीं प्रत्येकाच्या हातून खरोखरच चमत्कार घडतील. मग तुम्हाला वर्तमानपत्रांत चऱ्हाटें वळण्याचें कारण नाहीं, आणि व्याख्यानें देत फिरण्याचें कारण नाहीं. तुमच्या चेहऱ्यावर उमटलेलें नुसतें तेज तुमचें सारें काम करील अशा स्थितींत तुम्ही एखाद्या डोंगराच्या दरींत जाऊन बसला तरी तुमचें विचारतरंग तीं दगडी कपाटें फोडून साऱ्या जगभर प्रवास करतील. त्यांना रहावयास योग्य असें मेंदूचें वसतिस्थान मिळेपर्यंत ते प्रवास करीत रहातील, आणि योग स्थान सांपडतांच तेथें शिरून तेथून प्रत्यक्ष कार्यास सुरवात करतील. अत्यंत शुद्धमनोभावाच्या ठिकाणीं एवढें सामर्थ्य असतें.

मित्रहो, माझें हें लांबलचक चऱ्हाट ऐकतां ऐकतां तुम्ही कंटाळलां असाल अशी मला भीति वाटते. तथापि, आणखी क्षणभरच कळ काढा. सज्जनहो, देशबांधवहो, माझ्या लाडक्या लेंकरानों, आपलें हें राष्ट्रीय जहाज कोट्यावधीं जीवांस आपल्या पोटांत घेऊन कालसमुद्रांतून प्रवास करीत आहे. आज कित्येक शतकें त्यांचा प्रवास अखंड चालू आहे. त्यांच्या पोटांतून लक्षावधि जीवांनीं सुखरुपपणें प्रवास केला आहे, आणि ते परतीरी आनंद भूमीवर जाऊन बसले आहेत. सध्या, कदाचित् तुमच्या गुणांमुळें हें जहाज थोडें खिळखिळें झालें आहे. ह्याला एक लहान छिद्र पडून गळतें झालें आहे, पण याकरितां त्याला शाप देणें तुम्हांस उचित आहे काय ? जगांत जें कार्य कोणीही केलें नाहीं, तें कार्य आजपर्यंत ज्यानें बिनबोभाट बजाविलें त्याला शिव्या देणें उचित आहे काय ? या जहाजाला भोकें पडलीं असतील तर तीं बुजविण्याचें काम तुमचें आहे. आपण हीं भोकें बंद करूं या. आमच्या हृदयाच्या रक्तानें हीं भोकें बंद होण्यासारखीं असलीं, तर तें रक्त देऊन तीं बंद करण्याचें आपलें काम आहे. हें काम करण्यांत आपणाला आनंद वाटला पाहिजे. आमच्या हातून हें कार्य होण्यासारखें नसेल तर आपण सुखानें देहपात करूं नका. कांहीं झालें तरी शिव्याशाप देण्याचें साहस मात्र यापुढें करणें नको. आपल्या समाजाबद्दल वाईट अक्षरही तोंडावाटे काढूं नका. पूर्वकाळाच्या त्याच्या वैभवाबद्दल माझ्या अंतःकरणांत अपूर्व शक्ति बसत आहे.

मित्रांनों, तुम्हां सर्वांवर माझें इतकें प्रेम आहे, याचें कारण हेंच कीं, तुम्ही देवदेवतांचीं लेंकरें आहांत. तुम्हीं आपल्या महानुभव पूर्वजांचें वंशज आहांत. अशा तुम्हाला शाप देण्याचें भलतेंच धाडस मी कसें करूं ? छे ! छे ! कधींही मी असें करणार नाहीं. परमेश्वराचा तुम्हां सर्वांवर वरदहस्त आहे. बाळांनों, पुढील बेत काय आहेत, हें सांगण्यासाठींच मी येथें आलों आहे. तुम्हांला पसंत पडले तर तुमच्याबरोबर कंबर बांधून काम करण्यास मी तयार आहे. तुम्हांला ते पसंत न पडले आणि लाथा मारून तुम्ही मला घालवून दिलें, तरी पुन्हां हेंच सांगेन कीं, बाबांनो, तुम्ही बुडत आहां, मी आतां कायमचाच तुमच्यांत येऊन बसलों आहे. आपण बुडावें अशीच भवितव्यता असेल तर आपण सारे बरोबरच बुडूं या, पण बुडत असतांही अपशब्द मात्र तोंडावाटे काढूं नका. "

वरील एकाच उताऱ्यावरून स्वामीजींची प्रगल्भ प्रतिभा, त्यांची देशाविषयींची कळकळ, त्यांचा आम्हांस पितृतुल्य उपदेश करण्याचा अधिकार, मातृतुल्य निश्वार्थ प्रेम, त्यांचा गंभीर व निश्चयी बाणेदारपणा व अलौकिक उदारता स्पष्ट दिसून येतात. तसेंच मार्मिक वाचकांना यांत त्यांच्या थोरपणाचें बीजही दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

कित्येकदां देशप्रेमानें स्वामीजी गंभीर होत, तर कित्येकदां हें प्रेम त्यांना मत्त करीत असे. स्वदेशप्रेम हें त्यांच्या बाबतींत अध्यात्मिक साधनांचें एक अंगच होऊन बसलें होतें. हिंदुस्थानच्या गरीब दुबळ्या लोकांची पराधीनता, पोटाच्या काळजींतच केस पिकून पांढरे होण्यासारखी कंगाल स्थिती, त्यांच्या मनश्चक्षुपुढें उभी राहिली म्हणजे त्यांना चैन पडत नसे, त्यांचें अंतःकरण उचंबळून उठत असे. ध्यानाला बसले कीं चित्त दयेनें तीळ तीळ तुटूं लागे. ध्यान धारणा वगैरे सर्व गुंडाळून ठेवून, कार्यास लागण्याचीच प्रचंड स्फूर्ति त्यांना आंतून होत होती. यामुळेंच ते बारा वर्षेपर्यंत एकसारखे परिव्राजक होऊन सारा देश हिंडले. दारिद्र्यानें पीडित अशा गरिबांच्या पर्णकुटिरांत जाऊन त्यांच्या दुःखानें स्वामीजींचें अंतःकरण समदुःखी झालें. रांजलेल्या गांजलेल्या लोकांची स्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्यावर आधींच कोमल असलेल्या व त्यांत अध्यात्मिक साधनांनीं युक्त असलेल्या स्वामीजींच्या अंतः-

करणाला पाझर कां न फुटावा ? " जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा, देव तेथेंचि जाणावा ॥ "

स्वामीजींना व्यक्तिमात्रांत परमेश्वर पाहण्याची दिव्यदृष्टी प्राप्त झाली होती. प्रत्येक रांजलेल्या गांजलेल्या प्राण्यांत परमेश्वरच दिसत होता व त्यांच्या सर्व उणिवा नाहींशा करणें हेंच त्यांना आपलें पवित्र कर्तव्य वाटलें. हें कर्तव्य योग्य रीतीनें बजावणें ह्मणजेच खरी परमेश्वराची पूजा करणें, अशी त्यांची खात्री झाली. प्रत्यक्ष नारायणच विश्वरूपानें नटल्याची स्वानुभवपूर्ण प्रचीति त्यांना आल्यामुळें गरीब लोकांना उद्देशून बोलतांना " दरिद्र नारायण " असे ते म्हणत. त्यांची सेवा म्हणजेच नारायणाची सेवा, असा त्यांचा भाव होता. याच भावनेनें अखेरपर्यंत त्यांनीं काम केलें व इतरांनांही अशाच तऱ्हेची देवपूजा करण्यास उपदेश केला. देवस्थानांत जाऊन प्रतिष्ठित मूर्तींची सेवा करण्यापेक्षां प्रत्यक्ष सजीव मूर्तींचींच सेवा केल्यानें चिन्मय परमेश्वर लवकर प्रसन्न होईल व असें केल्यानें राष्ट्राचाही विशेष फायदा होईल हें त्यांनीं जाणलें.

भिन्न भिन्न जाती, भिन्न भिन्न वर्ण, नाना मतें व आचार, निरनिराळीं धर्ममतें हिंदुस्थानांत प्रचलित असल्यानें व शेंकडों वर्षांपासून परकीय राजसत्येचा अंमलच या देशावर चालत आल्यामुळें सर्व लोकांत कुसंस्कार व दुर्गुणांचा प्रभाव होऊन खऱ्या धर्माविषयीं जनतेंत घोर अज्ञान व पूर्ण अनास्था माजली. या सर्वांचा घातुक परिणाम म्हणजेच हल्लींची या देशाची दुर्गती अथवा अवनती होय.

या स्थितीचें सर्वांत मूळ कारण म्हणजे हिंदी राष्ट्रांत एकराष्ट्रीय भावनेचा पूर्ण आभाव हें होय. ह सत्य स्वामीजींनीं पूर्ण ओळखलें. याजकरितां राष्ट्रीयभावना विकसीत करण्याकरितांच त्यांनीं जीवापाड मेहनत घेतली. आमच्या हिंदीराष्ट्राचा मूळपाया काय आहे, आमच्या राष्ट्राचा प्राण कोणत्या दिशेनें वाहतो आहे, हें आपल्या तीक्ष्ण परिशीलनानें व अंतर्दृष्टीनें जाणून त्याचप्रमाणें राष्ट्राच्या अंगीं मुरून गेलेला स्वभाव जाणून सुलभ मार्गांनें प्रयत्न केला असतां देशांत लवकरच तेज चमकूं लागेल, व त्यायोगें हिंदीराष्ट्राची सर्वांगीण भरभराट होईल, हें स्वामीनीं जाणलें. धर्मप्राण अशा हिंदभूमींत उत्तुंग हिमालयादि पर्वत शिखरापासून उगम पावलेल्या पवित्र पतितपावन गंगादि नद्या, गिरनारादि पुराणप्रसिद्ध

दंडक, नैमिल्यादि अरण्यें, शष्यश्यामला अशि अति रमणीय भूमी, काशी पुष्करादि प्रसिद्ध क्षेत्रें, यांनीं या राष्ट्राला, त्याच्या राष्ट्रियत्वालाच काय पण त्यांतल्या संपूर्ण वातावरणाला देखील, धर्म सदृढ व धर्म स्निग्ध केलें आहे. भरतखंड प्रचलीत बहुविध धर्म व विविध मतवादामुळें विशेषतः अज्ञान-जनित विरोधामुळें छिन्न विछिन्न झाले असले, तरी त्यांत एकराष्ट्रीय भावना, सर्व धर्मांचा समन्वय झाल्यास जागृत होईल असें श्रीरामकृष्ण परमहंसाच्या सेवेंत व सहवासांत राहून त्यांनीं खात्री करून घेतली होती. गुरुमहाराजांचे सर्व धर्मसमन्वयकारी, कठोर साधनव्यापी दिव्य चारित्राच्या चिंतनानें व प्रत्यक्ष दर्शनानें त्यांचें हें मत दृढतर झालें. बारा वर्षे साधन करून या सर्व धर्मसमन्वयरूपी सिंहासनावर ते आरूढ झाले. अशा रीतानें अवश्य तें सामर्थ्य आपल्या अंगीं आणून घेऊन भारतीय राष्ट्रीय जीवनाचा सत्य मार्ग जनतेला आंखून देण्याचें मोठ्या जबाबदारीचें पवित्र कार्य करण्यास ते तयार झाले. जो जो उपदेश त्यांनीं दिला, त्याला त्यांच्या स्वानुभवाचा भक्कम आधार होता. त्यांनीं सर्व धर्मांची खिचडी करण्याचा अथवा सर्वांना एकाच धर्मांचें अथवा विशिष्ट संप्रदायाचे अनुयायी करण्याचा प्रयत्न केला नाहीं. ते स्वतः स्वातंत्र्याचे भोक्ते होते. ते विवेचक बुद्धिचे पक्षपाती होते. अमुक अमुक असें असें म्हणतो म्हणून तुम्ही आपल्या विवेचक बुद्धीला फांटा देऊन निमूटपणें मानूं नका, असें त्यांचें अगत्याचें सांगणें असे. जगांत असंख्य मतें, असंख्य धर्म असणारच " जितकीं मतें तितके मार्ग " मग आपलाच सांप्रदाय काय तो सत्य म्हणून इतरांहून श्रेष्ठ, असें म्हणणें सपशेल वेडेपणाचें असून आपआपल्यालाच संकुचित करून घेऊन आपला विकास होऊं न देतां बंधन मात्र सदृढ करणारे आहे असें त्यांचें मत होतें. हा सांप्रदायीक आग्रह दूर करण्याचा एकच उपाय म्हणजे धर्मतत्वांची प्रत्यक्षानुभूति, तिच्या वांचून अन्य सर्व उपाय या बाबतींत निष्फळ आहेत, असें त्यांचें मत होतें. देशाचार, लोकाचार, धर्माचें बाह्यांग, यांच्याबद्दल वाद घालण्याचा व अशा रीतीनें परस्परांत विकृष्टता वाढवून धर्मांच्या नांवावर रणें माजविणाऱ्यांचा त्यांनीं पूर्ण निषेध केला आहे.

प्रत्येक धर्मावलंबी पुरुषानें आपल्या धर्माचें मूळ ग्रंथ काळजीपूर्वक वाचून अर्थ समजून घेऊन त्यांतला उपदेश आपल्या आचरणांत उतरविण्याचा यत्न केला तर विरोधास कारण रहाणार नाहीं. हिंदुधर्मियांना वेदांत धर्माचे, उपनिषदांचें, श्रीमद्भगवद्गीतेचें अध्ययन करण्यांस सांगितलें. कारण वेदांचें सार म्हणजेच उपनिषदें व उपनिषदांचें सार गीता होय. उपनिषदें व गीता या अमोलिक आद्य ग्रंथांत प्रतिपादित तत्वविचारच हिंदुस्थानांत राष्ट्रीय भावना उत्पन्न करून त्यांच्यातलें सुप्तचैतन्य करतील. हल्लीं पददलित, आत्मविश्वासहिन अश्रद्धापरायण झालेल्या या राष्ट्राच्या उद्धाराचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याची उमेद, स्वातंत्र्याच्याच आस्वाद, स्वातंत्र्याची बळकट अभिरुची उत्पन्न करणें होय; म्हणूनच त्यांनीं देशबांधवांना नाचिकेताप्रमाणें श्रद्धावान होण्यास उपदेश केला. आपल्या सत्यस्वरूप "अजोनित्यः शाश्वतोयं पुराणो" अशा आत्मस्वरूपाचें चिंतन सतत करण्याविषयीं उपदेश केला. अनंत मंत्रमहोदधींतून, औपनिषदिक रत्नखाणींतून त्यांनीं निवडून काढलेल्या मंत्रापैकीं "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्नि बोधत" हा मंत्र त्यांच्या फार आवडीचा होता. देशाच्या हल्लींच्या अवनत स्थितींत हाच मंत्र विशेष कार्यक्षम होण्यासारख्या असल्यानें त्याचाच ते नेहमी उपयोग करीत. आपल्या मेषभावापन्न देश बांधवांना "तुम्ही सिंहाचे छावे आहां, अमृतपुत्र आहां, आनंदमयीचीं लेंकरें आहां' असें सांगून त्यांना उत्तेजक उक्तीचें स्मरण करून देत. जगांत पाप, ताप, शोक, रोग वगैरे कांहींच नसून जे कांहीं पाप म्हणून असेल तर तें हें 'भय' होय. भीति हीच सर्व पापाची व दुःखाची जननी होय. म्हणून स्वामीजी आपल्या देशबांधवांना उपयुक्त अशा 'अभीः' मंत्राची दिक्षा देण्यास तयार झाले होते. औपनिषदिक प्रमेयें गिरिकंदरीं राहणाऱ्या मूठभर संन्याशांचीच संपत्ति करून न ठेवतां खेड्यापाड्यांत, बाजारांत, मंदिरांत, भजनी मंडळांत शाळांत सार्वजनिक बागबगिच्यांत, तीर्थ क्षेत्रांत वगैरे सर्वत्र त्यांचा यथेच्छ प्रचार करण्यास त्यांनीं उपदेश केला आहे. युगाचार्य श्रीमत्स्वामी विवेकानंद महाराज असें म्हणत कीं, या महातत्वसमुहाची अल्पप्रमाणांत जरी कृतीत परिणती होईल तर विषेश मंगलकारी होईल, व तसें केल्यानें देशांत आत्म-

तत्वाची ओळख होईल. आत्मविश्वास वाढेल. स्वामीजींचा अद्वैत वेदांतावर विशेष भर होता. त्याचा प्रचार करून तें राष्ट्रीयजीवनांत कार्यकारी करण्याविषयीं त्यांचा आग्रह होता. हिंदुस्थानांत एक राष्ट्रीयभावना, एकत्व भावना, एकत्व ज्ञान उत्पन्न होण्यास " विश्वाचि माझें घर " " स्वदेश भुवनत्रयम् " अशी व्यापक दृष्टि जागृत झाली पाहिजे; आणि तसें होण्यास अद्वैत वेदांतासारखा दुसरा रामबाण उपाय नाहीं. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, ' अद्वैत ज्ञान गांठीस बांधून पाहिजे तें कर ' श्रीरामकृष्णांच्या सूत्ररुप वाणीचें स्वामीजीनें जापलें चरित्र म्हणजे त्यावर रचिलेलें भाष्यच होय असें म्हटल्यास जास्त समर्पक होईल.

आमच्या राष्ट्रांत ऐक्य घडवून आणावयाचे असेल तर एका अद्वैताच्या पायावरच ऐक्याची इमारत उभारली पाहिजे. नाहींतर एक भाषा अथवा समान हक्क इत्यादि उण्याअधिक स्वार्थी तत्वावर ही राष्ट्रीयऐक्याची इमारत टिकूं शकणार नाहीं, व तीच इमारत अद्वैताच्या भक्कम पायावरच उभारली गेल्यास हिंसा, द्वेष, इतर अनेक स्वार्थमूलक आकुंचित मनोवृत्तीचे दोष व विशृंखलता या भारतवर्षापासून नष्ट होतील, व लवकरच आमचें राष्ट्र बलिष्ठ होईल. स्वामीजींनीं ओळखल्यामुळें त्यांनीं मुक्तकंठानें देशबांधवांना, ' सहानुभूतिनें अथवा दयेनें प्रेरित होऊन नव्हे तर नारायणज्ञानानें जगज्जीवांची सेवा करण्यास उपदेश केला. ते पुनः पुनः म्हणत कीं, तुमच्या दारी प्रभुनारायण दरिद्री, शोकी, तापी अशा रुपानें तुमची सेवा घेण्याकरितां आला आहे. तुम्ही धन्य ? ईश्वर भावानें भूतमात्रांची सेवा केल्यास सेव्य व सेवक दोघेही महनीय होतात, दोघेही एका अकृत्रिम बंधनानें बद्ध होतात. याच मार्गानें या जगांत सर्वत्र प्रेमाचें राज्य होण्याचा संभव आहे. भारताच्या हल्लींच्या परिस्थितीचा विचार करितां या एकाच मार्गाशिवाय ' नान्यः पन्थाः विद्यतेऽयनाय ' असेंच म्हणावें लागतें. इतकेंच नव्हे तर या काळांत आमच्या राष्ट्राची इहपर उन्नती खास होणार. अद्वैत सिद्धांताच्या आधारानें हिंदू, यवन, क्रिश्चन प्रभृती इतर सर्वधर्मीयांचें मिलन होऊन या चित्रविचित्र राष्ट्राचें अनायासें एकीकरण होण्यासारखें आहे.

'सर्वं खल्विद ब्रह्म,' 'अहं ब्रह्मास्मि,' 'तत्वमसि,' 'प्रज्ञान ब्रह्म' इत्यादि महावाक्यें हिंदूच्या उपनिषद-ग्रंथांत आहेत खरीं, पण हिंदूम्हणविणाऱ्यांना त्यांचा विसर पडला आहे. महम्मदी प्रभृती इतर धर्मांत हिंदू धर्माइतकें बिशद रीतीनें आत्मतत्वाचें उदार अनुशिलन झालें नसले तरी इतर धर्मीय व्यवहारिक, कार्यक्षेत्रांत आत्म विश्वासानें आपल्या बांधवांत समभावानें राहत. उच्चनीच भेद विरहीत राहूं शकतात. हिंदुस्थान देशाचें सर्व निरीक्षण करून दूरदृष्टीसंपन्न स्वामीजी एका पत्रांत म्हणतात, Future India which I am dreaming of will consist of Islamic body and Vedantic brain' माझ्या कल्पनासृष्टींतल्या भविष्यकालाच्या भारत देशांत इस्लामी शरीर व वेदांती मेंद् यांचा मिलाफ झाला पाहिजे. हिंदूंचे आत्मतत्वज्ञान, मुसलमानांचा नित्य व्यवहारांत दिसून येणारा प्रकाश यांचा मिलाफ किती आश्चर्यकारक होईल बरें ? म्हणूनच व्यवहारिक वेदांताचा यथेच्छ प्रचार करून हिंदूसमाजांत बल व विश्वास वाढवावे. तात्विक वेदांताच्या प्रचारानें मुसलमानीं समाजांत सहिष्णुता व विचार प्रणवता वाढवावी, असें केल्यानें हिंदु मुसलमानांची एकी होऊन जगांत हिंदीराष्ट्र आदर्शभूत होईल.

हिंदुस्थानांत एक राष्ट्रियत्व घडवून आणण्याकरतां स्वामीजींची दुसरी सूचक शिकवण म्हणजे त्याला वैराग्याची जोड होय. "त्यागेनैकेनात्मृत्वमाशः" "अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येणच गृह्यते" पण विवेकी त्यागपरायण झालेल्या अनुभवी व्यक्तीचे "सर्व वस्तु भयान्वितं भुविनृणां वैराग्यमेवाभयम्" इत्यादि वचनांचें आमच्या आर्यावर्तांला जन्मतांच बाळकडू पाजलें असल्याकारणानें खऱ्या त्यागी, बैरागी संन्यासी लोकांच्या येथें भारत देशांत ज्यास्त मान व त्यानांच इतर राष्ट्रापेक्षां इथें किंमत जास्त मिळतें. त्याग हा आम्हां हिंदूच आदर्श. त्यागावाचून अमृतत्वाचा लाभ होणें शक्य नाहीं, त्यागासारखी अभयप्रद या जगांत दुसरी वस्तु नाहीं. त्यागांतच उन्नतीचें बीज आहे व त्यागानेंच मानवी आयुष्याचें चीज होतें. सर्व मंगलधाम अमृताची प्राप्ति करून घ्यावयाची असेल तर आम्हांला त्यागांचीच कांस धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं, याची प्रचीति तीनच शतकापूर्वी महाराष्ट्रांत शिवरायाची प्रार्थना करून

समर्थांचा भगवा झेंडा राष्ट्रभर फिरवून आणून दिली. त्या दिव्यत्वाची प्राप्ती आम्ही करून घ्यावयाची असेल तर 'शान्तं शिवं सुंदर' अशा अखंड त्यागावाचून आत्मतत्वाचाच साक्षात्कार झाला पाहिजे आणि हें अद्वैततत्व त्यागावाचून प्राप्त होणार नाहीं. अनन्ताचा सान्तांत पूर्ण प्रत्यय होणें शक्य नाहीं. अनन्त आत्मतत्वाचा आस्वाद मनुष्याला इंद्रियातीत स्थितींतच प्राप्त होणारा आहे. म्हणून इंद्रिय भोगांपासून मन पराङ्मुख करून त्याला त्यागाभिमुख केलें पाहिजे. यांचेंच नांव वैराग्य. इंद्रिय भोगासक्ति मनुष्याला वद्ध आकुंचित करिते. विषयासक्तिमुळें उच्च आत्मतत्वापासून मनुष्य च्युत होऊन होऊन शेवटीं बुद्धिनाशात्प्रणश्यति अशा रसातळास जातो. इंद्रियलोलुपता मनुष्याला बलहीन करून त्याचा सत्यानाश करिते. भोगलालसेमुळें मनुष्य पतन पावतो. म्हणून मर्मरंध्री सळसळ विषय काळसर्पापासून अत्यंत सावध राहून आपला जीव बचावणें मानवी प्राण्याचें आद्य कर्तव्य आहे. विषयांचा सतत मारा इंद्रियद्वारांतून एकसारखा चालू असल्यामुळें प्राणहीन झालेला जीवात्मा क्षुद्र स्वार्थी अहंकाराचा बाहुले बनला आहे. या क्षुद्र अहंकाराच्या सेवेच्या राजिनामा देऊन शेंकडो नव्हे हजारों बांधवांची विश्राम सेवा जेव्हां जीवात्मा पत्करेल त्याचवेळीं त्याच्या हृदयाचा विकास होण्यास प्रारंभ होईल. त्याचाच आदर्श सर्व आदर्शांत श्रेष्ठ होय. आमचें प्रत्येक कृत्य, आमची प्रत्येक हालचाल, आहार विहारादि सर्व गोष्टी या आदर्शाला धरून चालल्या पाहिजेत, अर्थात आमचे कायिक, वाचिक व मानसिक व्यापार स्वार्थपर न होतां परार्थ झाले पाहिजेत. निरिच्छपणें जनतारुप जनार्दनाची सेवा करणें, परसेवार्थ आपले शरीर झिजविणें, स्वतःच्या मुक्तीची इच्छा देखील नसतांना परहितार्थ झटणें यालाच कर्मयोग म्हणतात. अशाच कर्मयोगाचा आदर्श स्वामीजींनीं हिंदुस्थानांपुढें ठेवला. ज्यावेळीं मानव स्वार्थ गंधहीन होऊन यथार्थ कर्मयोगाचें आचरण करूं शकेल, त्याचवेळीं त्यांच्या क्षुद्र अहंकाराचा लोप होऊन तो महनीय, ब्राम्हमय होऊन जाईल. राष्ट्रीयजीवन अशा त्यागानेंच संघटीत होईल तर राष्ट्रांत शांतीचें व प्रेमाचें राज्य होण्यास विलंब लागणार नाहीं. जडवादग्रस्त पाश्चात्य राष्ट्रें युक्तप्रत्यय गोचर पंचभूतात्मक विषयापासून शक्य तें सुख प्राप्त करून घेण्यांत गढलीं

स्थळ प्रत
सं. ... 
ता. ८-११-४९

आहेत. पाश्चात्य मन, आजपर्यंत भोगलेल्या अनेक भौतिक सौंधांनीं तृप्त न होतां दिवसोंदिवस प्रचंड घृताहुतीनें वढावणाऱ्या अति प्रचंड अग्निज्वालेप्रमाणें जास्तच क्षुब्ध झालें. अशा राजकीय प्रकृतीमुळें आश्चर्यकारक गगनोड्डाण, जलपर्यटण, संदेशवाहनादि प्रापंचिक विलासांत भर टाकणारे रमणीय भौतिक शोध लागले खरे, पण यामुळें शांतिसुखाचा भरंवसा नाहींसा झाला. पाश्चात्यांत नास्तिकता वाढली. विचित्र, आपातरमणीय प्रकृतीच्या पंचभौतिक विषयांतच त्यांचें चित्त विशेष आकर्षिलें जात आहे. त्यांची भोगपिपासा फोंफावली आणि त्यांना भोगैकपरायण, स्वार्थी, व दांभिक केलें. जेणेंकरून स्वतःस दुसऱ्यांपेक्षां जास्त विषयसुख भोगतां येईल त्याच दिशेनें त्यांचे प्रयत्न होतात. हिंसा, द्वेष, परस्वाहरण हींच त्यांची साधनें. कोणत्या उपायानें भोगसाधनांची वृद्धि करितां येईल ते सर्व उपाय अमलांत आणण्यांत ते सर्वदा यत्नशील; त्यांची समाजव्यवस्था याच तत्वावर उभारलेली असते. त्यांच्यांत सहयोगिता, परस्पर विश्वास, सहानुभूति इत्यादि सद्गुणसमूह दिसून आला तरी तो स्वार्थप्रतिष्ठीत व स्वार्थपूरित असल्यामुळें तेथें मनःशांतीचा आस्वाद मिळत नाहीं. इतकेंच नव्हे तर, पाश्चात्य राष्ट्रांत हिंसा, द्वेष, रक्तपात चालले आहेत. स्वामीजींनी पाश्चात्याच्या भोगादर्शास लाथ मारून भारताला वेळींच सावध करण्याकरितां, आपला सनातन त्यागादर्श आपल्या चरित्रांत सुदृढ सुप्रतिष्ठित करण्यास उपदेश केला.

जातिभेदासंबंधी स्वामीजींचे मतही असेंच स्पष्ट होतें. ते म्हणत कीं, "ज्या दिवशीं आमच्या देशांत 'म्लेंच्छ' शब्दाची उत्पत्ति झाली त्याच दिवसापासून त्याला अवनत कळा लागली." विद्या, धर्म व शास्त्र या बाबतींत सर्वांना सम अधिकार दिल्यावांचून आतां हिंदुस्थानांत राष्ट्रीय भावना सुदृढ होणें शक्य नाहीं. हिंदी-समाजांत जातिमत्सर व दुष्ट पक्षपात यांची वाढ झाल्यामुळेंच इस्लामी धर्मानें सर्वांना समानाधिकार देऊन एक पंचमांश दरिद्री हिंदूंना आपल्यांत ओढून घेतलें. याच तत्वाच्या अवलंबनानें क्रिस्तीही आपली संख्या वाढविण्याच्या खटपटींत आहेत. आमची वर्णाश्रम व्यवस्था, स्वाभाविक गुणकर्मविभागावर प्रतिष्ठित होती. अस्वाभाविक वंशगत अधिकारावर तिची उभारणी पूर्वयुगांत कधीहीं नव्हती. याबद्दल स्वामीजी म्हणत कीं, "सत्य-

युगाच्या प्रारंभीं एकमात्र ब्राह्मणवर्णच होता. नंतर भिन्न भिन्न लोक निरनिराळ्या वृत्ती अवलंबन करूं लागले. आगामी सत्ययुगांत सर्व जाती पुनः ब्राह्मणवर्णांत परिणत होतील." वर्णाश्रम विभागाचा उद्देश हीन वर्णियांना क्रमाक्रमानें उन्नत स्थितीप्रत नेण्याचाच होय. आणि सर्वांच्या उच्चनीचतेचा निर्णायक निर्बंध म्हणजे, जो जितक्या मानानें स्वधर्म रक्षण करूं शकेल व जो देहबुद्धीला जिंकून आत्मप्रवण आत्मप्रतिष्ठित होईल तितक्या मानानें तो उन्नत होय. नीच जातीच्या लोकांना धर्मशिक्षण, संस्कृत भाषेचें ज्ञान व विद्यादान देऊन त्यांना उन्नत-विशुद्धचित्त-होण्यास उच्चवर्णीयांनीं सहाय्य करणें त्यांचें कर्तव्य आहे. असें केल्यानें हिंदी समाज विशिष्ट व आदर्शणीय होईल, अशी स्वामीजींची वर्णाश्रम विभागासंबंधीची शिकवण होती.

स्वामीजींच्या अमोलिक शिकवणींत स्वावलंबनाला केव्हांही उच्च स्थान असे. स्वावलंबनानें अन्य साधनांना दृढता येते. स्वावलंबनानें आपल्या अवनतीचें अथवा दोषांचें खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडून मोकळे होण्याची दुष्ट प्रवृत्ति नाहींशी होते. स्वावलंबनानें मनुष्य आपली जबाबदारी ओळखून कार्यास तत्पर होतो. स्वावलंबनानें आत्मविश्वास दृढ होऊन राष्ट्रांत कार्यकारी शक्तीचा विकास होतो. त्यामुळें आपली संस्कृति दृढ होऊन सहसा अन्य संस्कृतीचा पगडा आपणांवर बसूं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर, दुसऱ्यांत असलेलें आपल्या उन्नतीस उपयोगी पडणारे गुण पैदा करून आपली उन्नति क्रमाक्रमानें साधून घेण्याची हातोटी त्याला प्राप्त होते.

उद्धरेदात्मनात्मानम् नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

ही भगवान श्रीकृष्णाची शिकवण त्यांच्या हृदयांत दृढ प्रतिष्ठित होती. " त्याला आपल्या उन्नतीकरितां अन्याच्या तोंडाकडे पहात बसणें अथवा दुसऱ्या एखाद्या हिमालयावरच्या बड्या दाढीवाल्या महात्म्याच्या आगमनाचें निरीक्षण करणें लाजिरवाणें वाटतें. "

स्वावलंबनानें दुसऱ्यांच्या पायांशीं लुडबुडून स्वाभिमान रहित होऊन परकीयांचे पाय चाटण्याची निंद्य प्रवृत्ति लय पावते, व आत्मप्रकाशाला अवसर

५२५३

मिळतो; ते पाश्चात्य संस्कृतीच्या बाह्य चकचकाटानें भाळून जाऊन त्यांचें अंधानुकरण करण्यांत नियुक्त असलेल्या स्वदेशबांधवांना सर्व बाजूनें स्वावलंबनाच्या दृढ पायांवर प्रतिष्ठित होण्यास व आहार, विहार, पोशाख, सभ्यता, इत्यादिकांच्या बाबतींत अन्यांचें अनुकरण सर्वथैव न करण्यास सांगत असत. ते दुसऱ्यांवर दोष लादण्याच्या दुष्ट संवयींचा पूर्ण निषेध करीत; तसेंच अन्य बाह्य शक्तीवर अथवा राजशक्तीवर विसंबून न राहतां, देशांत स्वोन्नत्यर्थ स्वावलंबन, सुदृढता, धर्मप्रवणता वाढवून राष्ट्रीय भावनोद्दीपक ऐक्य घडवून आणण्यांत यत्नशील असत.

संघशक्तीशिवाय राष्ट्रीय भावनेचा उत्कर्ष होणें शक्य नाहीं. हिंसा, द्वेष, असूया इत्यादि निद्यगुणांच्या प्रभावानें छिन्नविच्छिन्न झालेल्या देशांत सहयोगिता, सहानुभूति, प्रेम इत्यादि सद्गुणांचा विकास होण्यास संघशक्तीची जरूरी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीकरितां अगोदर शक्तीचें अर्जन केलें पाहिजे. म्हणूनच संघशक्तीला चालना देऊन तिला देशांत सर्वत्र जागृत करण्याचा त्यांनीं खटाटोप केला. राष्ट्रीयतेचा आदर्श लोकांच्या डोळ्यापुढें रहावा म्हणून असा आदर्श घडवून आणण्याच्या प्रयत्नास ते लागले. अशी संघशक्ति एकदां प्रतिष्ठित केली कीं काम झालें असे नव्हे तर, ती संघशक्ति पुढें चालविण्याची पात्रता आमच्यांत असली पाहिजे. हंसतमुखानें आज्ञापालन करण्याचा सद्गुण आपण पैदा केला पाहिजे, तरच त्या संघशक्तीचा उपयोग. असें सामर्थ्य राष्ट्राच्या होतकरू तरुणांशिवाय अन्य कोठेंच असूं शकणार नाहीं, हें स्वामीजी पूर्णपणें जाणून होते. त्यांचा विश्वास होता कीं त्यांना शंभर त्यागी, मेधावी, बलिष्ठ, आदर्शभूत तरुण ब्रह्मचारी-संन्यासी मिळतील तर देशाला उद्बुद्ध करून भारतदेशांत नवचैतन्य शक्तीचा संचार करितां येईल म्हणूनच त्यांनीं आदर्शभूत चरित्रवान् व्यक्ति निर्माण करण्याच्या हेतूनें भारतदेशांतील मुख्य मुख्य ठिकाणीं मठ स्थापन केले. हे मठ म्हणजे कोणत्याही एका विशिष्ट पंथाचा आग्रह, धर्मवेड असलेल्या माणसांकरितां नसून, समन्वयवादी, त्यागी, स्वावलंबी, मेधावी युवकांना तयार करण्याकरितां व त्यांना अवश्य तें शिक्षण देऊन त्यांना देशाच्या—राष्ट्राच्या—नव्हे जगाच्या कार्याकरितां तयार करण्याकरितां आहेत. तेथें त्याग व सेवा या दोन तत्वांचा आदर्श दृष्टीपुढें ठेवून आत्मज्ञानपरायण

तरुण, नैष्ठिक ब्रह्मचारी अथवा संन्यासी होऊन देशाच्या नव्हे तर जगताच्या सेवेंत आपलें सर्वस्व वेंचणारे राहतील. या तरुणांचे चरित्र, त्यांचे कार्य, व त्यांची संघशक्ति राष्ट्राच्या आदर्शाला प्रस्फुटित करतील. असे मठ राष्ट्रांत जागोजाग स्थापिले जातील, आणि त्यामुळें देशांत जागृति होईल. हे सर्व मठ नरनारायणाच्या सेवेचा भार ग्रहण करून अन्नदान, विद्यादान, धर्मज्ञानद्वारा देशांत आर्थिक व आध्यात्मिक उन्नति घडवून आणतील. प्रत्येक दुसऱ्याकरतां प्राण देण्यास तयार होऊन सर्वत्र प्रेमाचे राज्य होईल, असें स्वामीजींना वाटत होतें. त्यांना असें सुखस्वप्न पडले होतें. हें त्यांचे स्वप्न खरें करून दाखविण्याची संधि व जबाबदारी आम्हां भारतीय सज्जनांवर आहे. आतां सर्वत्यागी, बलिष्ठ, मेधावी, स्वावलंबी चरित्रवान् संन्याशांची भारतदेशांत अत्यंत जरूरी आहे. म्हणूनच स्वामीजी म्हणत असत, "मला माणसें पाहिजेत, माणसें पाहिजेत." देशोद्धारार्थ त्यांचे प्राण व्याकुळ झाले होते. व अशीं मनुष्यें मिळविण्याकरतां ते देशोदेशीं, गांवोगावीं हिंडले. आपल्या गुरुदेवांच्या कृपेनें धन्य झालेले असे त्यांचे गुरुबंधू जरी मूठभर होते तरी त्यांच्या सहाय्यानें आपलें स्वप्न दृश्य सृष्टींत येईल असा त्यांना विश्वास वाटे. कारण श्रीरामकृष्ण म्हणत, " अरे गुलाबाची कळी उमलली कीं तिचा वास आपोआप सर्वत्र पसरतो. "

त्यांना माहित होतें कीं, गोरगरिबींत दिवस काढणाऱ्या खेडापाड्यांत राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या झोंपडींत सर्व राष्ट्राचें खरें अस्तित्व असतें. अशा लोकांत आत्मजागृति उत्पन्न केल्यानेंच राष्ट्र जागृत होईल. अगोदर त्यांच्या पोटापाण्याची, स्वास्थ्याची व्यवस्था केली पाहिजे. त्यांना शिक्षण देऊन उच्च विचारांची धारणा करितां येईल अशी ताकद त्यांच्यांत उत्पन्न केली पाहिजे आणि नंतर धर्मज्ञानानें, अध्यात्मज्ञानानें, त्यांच्यांत आत्मजागृति होऊन त्यांचें जीवन सुखमय व स्वतंत्र होईल. याजकरितां स्वामीजींनी मठांच्या युवकवृंदास दुःष्काळ, महामारी, महापूर, इत्यादि आकस्मिक संकटांच्या वेळीं गरीब दुबळ्या देशबांधवांची सेवा करण्यास बद्धपरिकर होण्याची आज्ञा केली.

स्वतः पूर्ण होऊन दुसऱ्यांना पूर्ण करण्याच्या मार्गास लागणारे वीर्यवान् पुरुष देशांत कसे उत्पन्न होतील हाच एक विचार स्वामीजींच्या मनांत असे. अज्ञानग्रस्त दिसणाऱ्या भारत-देशांत नवचैतन्य येऊन सर्वत्र ज्ञानदीपाच्या

स्थळ प्रत
नं.
ता.



प्रकाशानें आत्मसामर्थ्य व आनंदीआनंद पुन्हा कसा प्रकट होईल याचीच ते चिंता करीत असत. हल्लींच्या पाश्चात्य धर्तीच्या शिक्षणानें देशाचें रक्त शोषित होऊन नामर्दांची संख्या वाढत आहे, म्हणूनच ते राष्ट्रीय शिक्षणाचे पक्षपाती होते. त्यांची राष्ट्रीय-शिक्षणाची कल्पनाहि तशीच विशाल, दूरदर्शी, सर्वोन्नतिकारक होती. ती थोडक्यांत येथें दिल्यानें अस्थानीं होणार नाहीं. अतिप्राचीन काळापासून हिंदुस्थान देशाचें वैशिष्ट्य त्याच्या सर्वग्रासी, सर्वव्यापक अशा आर्यधर्मांतच असल्यामुळें येथील प्रत्येक प्रचलित गोष्ट धर्मप्रतिष्ठित असली पाहिजे. या भारतभूमींत धर्मबाबतींत मतमतांतरें इतकीं असंख्य आहेत कीं, त्यांची एखादी सम्मीलन-भूमि असूं शकेल असें वाटत नाहीं. तरी शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त, साकार, निराकारवादी अशा सर्व मतवाद्यांना एकत्र करण्यासारखें सर्वश्रेष्ठ "प्रणवः सर्ववेदेषु । तस्य वाचकः प्रणवः" इत्यादि स्मृतींनें गाईलेलें "ॐ" चें प्रतीक सर्वमान्य होण्यासारखें आहे. म्हणून स्वामीजी म्हणत, सर्वसाधारण असें धर्ममंदिर तयार करून त्यांत "ॐ" प्रतीकाची प्रतिष्ठा करावी. तेथें सर्वमत-पंथवाल्यांना त्याच्या त्याच्या धर्मतत्वाचें सारभूत शिक्षण मिळण्याची तरतूद असावी. त्यांच्यांत असलेल्या क्षुल्लक मतभेदास गाळून टाकून समन्वयकारी सर्वसाधारण अशा मुख्य मुख्य तत्वावर विशेष जोर देऊन, त्या त्या विशिष्ट मतसांप्रदायाचें शिक्षण तेथें दिलें जावें. कोणत्याहि मतवाल्यांना येथें मनाई नसावी; परंतु येथें विशिष्ट मतविरोधावर अन्य सांप्रदायांशीं तंटाविवाद करण्याचा मात्र निषेध असावा. या सार्वजनिक मंदिराजवळ त्यास संलग्न असें एक विद्यालय असावें. तेथें शिक्षक व प्रचारक तयार करण्यांत यावेत; त्यांनीं धर्म व विद्या या दोहोंचा सारखाच प्रचार करावा. सामान्यभावें सर्वांना शिक्षण द्यावें. जसजसें प्रचारकार्य वाढत जाईल, तसतशी प्रचारकांची संख्या वाढती ठेवावी. याप्रमाणें हिंदुस्थानभर सर्वत्र एकसारखा विद्याप्रसार करावा. धर्माच्या मूलतत्वांचा मातृभाषेंत प्रसार करून ती सर्वसाधारण लोकांच्या गळीं उतरवून सोडावी; आणि उच्च विचार, उच्च तत्वें यांची धारणा होण्यास संस्कृत भाषा सर्वांना शिकविण्यांत यावी. इतिहास, भूगोल, कृषि, शिल्प, शास्त्रीयविज्ञान, उद्योगधंद्याचें शिक्षण इत्यादि सर्व विषयांचें ज्ञान संपादन करण्यास पाश्चात्य देशांत तरुण होतकरूंना पाठविण्यांत यावें. त्यांनीं

परत स्वदेशीं आल्यावर वैज्ञानिक उपायेंकरून या सर्व विषयांचे ज्ञान आपल्या देशबांधवांना पूर्ण उत्साहानें द्यावें. अशा रीतीनें इतिहास, भूगोल इत्यादि प्रयोजनीय विषयांचे ज्ञान, गोरगरीबांत, अशिक्षित समाजांत नकाशे, मॅजीक लँटर्न इत्यादि उपकरणांच्या सहाय्यानें देण्यांत यावें असाही त्यांचा अभिप्राय होता.

अनेक व्यक्ती मिळून एक देश होतो. अनेक देशांचें एक राष्ट्र; अनेक राष्ट्रें मिळून हें विश्व झाले आहे. अर्थात प्रत्येक राष्ट्र विश्वाचें एकेक अंग असल्यामुळें विश्वाचें कल्याण साधित करणें असेल, तर त्याच्या प्रत्येक अंगाचें कल्याण अगोदर साधलें पाहिजे. कोणत्याहि एका अंगांत कांहीं न्यूनता अथवा निष्काळजीपणामुळें रोगव्याधी उत्पन्न झाल्यास, जसें सर्व शरीरास दुःख भोगावें लागतें, तसेंच एखादें राष्ट्र अपूर्ण राहिल्यास विश्वाचाच तोटा होतो. शरीराच्या प्रत्येक अवयवाची शरीराच्या सुस्थितीकरितां आवश्यकता असून, प्रत्येक अवयवाची विशिष्ट क्रिया असते. त्याचप्रमाणें विश्वांतर्गत प्रत्येक राष्ट्राचीही विशिष्ट विश्वकल्याणभूत क्रिया असते. हेंच त्याचें विशिष्टत्व, हाच त्याचा प्राण. राष्ट्राची ही प्राणशक्ति उद्‌बुद्ध झाली कीं, विश्वसंपत्तीत भर पडून सर्व विश्वाचेंच कल्याण होतें. अर्थात विश्वांगभूत प्रत्येक राष्ट्रांत इतर दुसऱ्या राष्ट्राला कांहींना कांहीं देण्यासारिखें असतेंच. भारत देशाचा प्राण धर्म-प्रतिष्ठित असल्यामुळें जगाला धर्मदान करण्याचा अधिकार विशेषतः त्याचाच असें इतिहास सिद्ध करूं शकतो. ही कामगिरी भारतराष्ट्रानें आजपर्यंत चालविली; या पुढेंही तें चालवील. येथें एक गोष्ट सांगावी असें वाटतें कीं, अन्योन्य राष्ट्रांच्या साह्यानें विश्वांतर्गत प्रेम, सहयोगिता, समान भावाची मैत्री उत्पन्न झाल्याशिवाय देयग्राह्याचें आदानप्रदान सरळ भावानें होत नाहीं. प्रत्येक राष्ट्रांत स्वाभिमान, आत्मविश्वास नसेल तर इतर राष्ट्रांशीं देवाण-घेवाणाच्या व्यवहारांत त्याचा समान दर्जा रहाणार नाहीं आणि इतर राष्ट्रांपासून त्याच्यांत घेण्यासारखें जें असेल, तें आपणांस प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर इतर राष्ट्रांनाही त्याबद्दल कांहीं देण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं असलें पाहिजे. समान भूमीवर राहिल्यानेंच 'दे घे' करण्याचा समान व्यवहार हस्तांदोलनाप्रमाणें प्रौढपणें करतां येतो. कांहींच किंमत न देतांना दुसऱ्यांकडून कांहीं घ्यावयाचें असेल, तर अशा भिक्षांदेहि प्रवृत्तीमुळें आपल्याला हीनता प्राप्त होते. भिकारी म्हणण्याला दुखाची ओळख

नसते. त्याला जें जें कांहीं त्याच्या जीवधारणेपुरतें मिळूं शकतें. त्याबरोबर सर्वत्र त्याचा तिरस्कारही होतो. कितीही मोठी देणगी त्याला मिळाली तरी त्या मिळकतीच्या पाठीमागें तुच्छतादर्शक दया व तिरस्कार यांची जोडी असते. भिकारी म्हणजे तुच्छ व कवडी किंमतीचा असें दात्याला वाटणारच. म्हणून भिकाऱ्याला कितीही संपत्ति मिळाली तरी सुख त्याच्या नशिबीं नाहींच. "भिक्षापात्र अवलंबणें, जळो जिणें लाजिरवाणें !" हें अनुभवपूर्ण सत्य आहे. याजकरितां पाश्चात्य राष्ट्रांपासून भौतिक ज्ञान, राजकारण, उद्योगधंदे, शिक्षण इत्यादि राष्ट्रोन्नतिकारक ज्ञान आम्हाला संपादन केलेंच पाहिजे. तरच आमचा प्रस्तुत कालचक्रांत टिकाव लागणार, आणि तें ज्ञान परकीय राष्ट्रांपासून मिळवावयाचें असेल तर त्यांनाही अत्यवश्य असलेलें धर्मज्ञान दान करण्याची आमची तयारी असली पाहिजे. याजकरितां स्वामीजींनीं भारत संतांना ही कामगिरी बजावण्याची विनंति केली आहे.

जीवनसंग्रामांत जो टिकाव धरूं शकतो तोच जगणार व तोच जगण्यास योग्य हा नियम जसा व्यक्तीला लागू आहे तसा तो राष्ट्रालाहि लागू आहे. परंतु पाश्चात्य मनोघटनेनुरूप त्यांची समजूत अशी होऊन बसली आहे कीं अन्य राष्ट्रांना पादाक्रांत करून त्यांच्यावर जें राष्ट्र जुलमी राज्य चालवूं शकेल, तेंच राष्ट्र दीर्घायुषी व सुखी होय. म्हणून त्यांचा आदर्श स्वार्थप्रतिष्ठीत होऊन बसला आहे. परंतु आमचा भारतवासीयांचा आदर्श त्यांच्याहून अत्यंत भिन्न. आमचा आदर्श पुरातन कालापासून निस्वार्थपर. प्रेम हाच आमचा बीजमंत्र. स्वतःस जितक्या मानानें दुसऱ्यांच्या उपयोगीं पडतां येईल, तितक्या मानानें आम्हीं स्वतःस धन्य मानतो. " परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् " हेंच आमचें शास्त्रवाक्य. प्रेमानेंच प्रेम वर्धित होतें. प्रेमानेंच जीवित सुखमय होतें. आपण लोकांवर प्रेम करूं लागलों तर लोकहि आमच्यावर प्रेम करूं लागतील. अन्योन्य प्रेमानें अन्योन्यांच्या सुखांत भर पडते. "ॐ सहनाववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै " हा आमचा शांतिपाठ. हें राष्ट्रहितकारी प्रेम मात्र स्वार्थी असतां कामा नये. सर्वांना सारखें बंधुप्रेमानें वागविणारें, एकमेकांविषयीं प्राण देण्यास तयार असणारें, वीरवृत्तीचें, शुद्ध प्रेमच प्रेम या नांवाला साजेसें असतें. तसेंच प्रेम व्यक्तीचा अथवा राष्ट्राचा उद्धार

करूं शकतें. अशा निःस्वार्थ प्रेमामुळें राष्ट्रांत अमोघ शक्तीचा संचार होऊं लागतो आणि राष्ट्रांत शांति नांदू शकते. वणिक वृत्तीचा लेश नसून कोणत्याहि मोबदल्याची आकांक्षा न ठेवतां गंगाजलाप्रमाणें निर्मल, फलपूर्णवृक्षाप्रमाणें विनीत, शूर शिपायाप्रमाणें अज्ञाधारक होऊन भारतीय तरुण त्यागाचा झेंडा झळकावित राष्ट्रमातेच्या सेवेकरितां ज्यावेळीं प्राण वेंचण्यास तयार होतील, तेव्हां आमच्या भाग्यसूर्याचा अरुणोदय होईल. म्हणून आपलें चरित्र उज्वल करून आपल्या जीवनांत, अंतर्यामांत स्वतंत्र होऊन जनतारूपी जनार्दनाकरितां प्रेमानें आत्माहुति दिल्यानें आत्यंतिक सुखाचा लाभ होऊन भारतराष्ट्री हां हां म्हणतां स्वतंत्र व आदर्शभूत होऊन शोभणार नाहीं काय ? भारतदेश जगांत असा वंद्य आदर्शभूत व्हावा म्हणूनच स्वामीजींनी अखंड प्रयत्न चालविला.

स्वामीजींनीं राष्ट्रांत दृढता, ऐक्य, स्वावलंबन, त्याग, शुद्ध प्रेम अशा राष्ट्रोद्धारक सद्गुणांची वाढ व्हावी व राष्ट्र उन्नतीच्या व पूर्णतेच्या मार्गास लागावें म्हणून जे विचार मांडून ठेविले आहेत, ते हल्लींच्या तरुण भारताला अत्यंत मार्गदर्शक आहेत. त्या मार्गाचा अवलंब करून वाट चालूं लागणें हें आम्हां भारतीयांचं कर्तव्य आहे. जो हें कर्तव्य श्रद्धा-ज्ञानयुक्त अंतःकरणानें पार पाडण्यास जितक्या मानानें समर्थ होईल तो तितक्या मानानें आत्मकल्याणकारक व राष्ट्र-हितकारी होईल, यांत संदेह नाहीं.

आम्हांला व्यासपीठावरून व्याख्यानें देणारे अथवा वर्तमानपत्रांत लेख लिहिणारे देशभक्त नकोत, तर हाडांचे तुकडे झाले तरी पर्वा न करणारे, प्रत्यक्ष काळालाही न भिणारे, तोंडाची वटवट बंद करून हातानें कार्य करून दाखविणारे वीर पुरुष पाहिजेत. वैभवशाली, बुद्धिवान, सहृदय, ज्ञाते, कार्य-कर्ते, समाजनेते पुढारी पाहिजेत.

राष्ट्राच्या उन्नतीचें पुण्य जोडण्याकरितां पशाची अत्यंत जरुरी आहे. भारत-वर्षाकरितां श्रीमान पांढरपेशा लोकांकडून जो पैसा अनवश्यक ठिकाणीं वेंचिला जातो, तो आपल्या राष्ट्राच्या उन्नतीसाठीं, धर्मासाठीं वेंचिला गेल्यास खऱ्या राष्ट्रकार्यास मदत होईल.

नैतिक, व्यवहारिक व धार्मिक शिक्षणाच्या अभावामुळें राष्ट्रांत स्वतंत्र विचार, कल्पकता, वगैरे सद्गुण नाहीसे होतात. बहुजनसमाजांत धर्माच्या बाबतींत

बावळटपणा वाढतो. पिशाच्चाला देव समजून त्याचेच देव्हारे माजविण्यांत येतात. याचा परिणाम असा होतो कीं, बहुजनसमाज अध्यात्मिक दृष्ट्या व इतर दृष्ट्याही रसातळास जातो; आणि त्याच्या या अवनत दुस्थितीपासून त्याचा उद्धार होणें दुर्घट होऊन बसतें. भलताच भोंदू समाजांत साधू म्हणून नांदू लागतो. अशा भोंदूच्या ढोंगीपणाच्या पायीं समाजाचा किती पैसा चूर होतो याकडे समाजसुधारकांचें लक्ष ओढावें तसें ओढलें गेलें नाहीं. धर्माचा गोंधळ, भोंदू साधूंचा धुमाकूळ या वेडामुळें समाज बलहीन होत चालला आहे. धर्माचें अज्ञान व नैतिकबलाचा अभाव या दोन कारणांमुळें समाजांत धर्माच्या नांवाखालीं अश्लील आचार व अधार्मिक तत्वांचा विचार होत असलेला दिसून येतो. ही स्थिति भारतवर्षाला अत्यंत गर्हणीय व अश्लाध्य आहे. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं हें पाहून कोणत्या विचारी माणसांचे मन खिन्न व उद्विग्न होणार नाहीं ? आपल्या उन्नतीकरितां नामस्मरणाचीच जोड असली पाहिजे. भक्ती म्हणजेच प्रेम. प्रेम म्हणजेच ईश्वराचे निर्गुण स्वरूप; त्यांचे मीलन होऊन तेंच प्रेम भक्तीच्या अत्यंत शेवटच्या पायरीपर्यंत गेलें म्हणजे परमेश्वरप्राप्ती. हाच सत्य सिद्धांत होय. ह्याच मार्गाचें अवलंबन भारतवर्षानें करावें. अन्य कोणत्याही मार्गाचें अवगाहन न करतां सत्य व शास्त्रप्रणीत मार्गच धरावा. स्वामी रामकृष्ण, स्वामी विवेकानंद, श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, श्रीसमर्थ, एकनाथ महाराज इत्यादि खऱ्या संतांच्या खऱ्या त्यागपूर्ण विजयशाली निर्भयतेच्या शिकवणीकडे भारतवासीयांचे लक्ष जाऊन आपल्या उन्नतिकारक मार्गाचें अवलंबन करण्याचें भाग्य त्यांना लाभो हेंच परमेश्वराजवळ इच्छितों.

शुभं भवतु । ॐ शांतिः शांतिः शांतिः

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२४३
मराठी ग्रंथ संग्रहालय

REFBK-0005243